


जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, रविवार २५ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४

## दुष्काळात दिवाळी कशी साजरी करावी या चिंतेने संपवले जीवन

# आर्थिक विवंचनेतून शेतक-याची आत्महत्या

**चंद्रपूर/प्रतिनिधी-** वर्षानुवर्षे काळ्या मातीत घाम गाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्याच्या वाट्याला नापिकी, कर्जबाजारीपणा आणि भविष्याची चिंता आली, तर जगण्याचा आधारच डळमळीत होतो. यंदाही दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झाल्याने कर्जाची परतफेड कशी करायची आणि दिवाळीचा सण कसा साजरा करायचा, या विवंचनेत असलेल्या राजुरा तालुक्यातील चिचबोडी येथील ७५ वर्षीय श्रीरंग केशव ठावरी यांनी आत्महत्या केली. शुक्रवारी रात्री शेतात गेलेल्या ठावरी यांचा मृतदेह शनिवारी, २४ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतातील शेवग्याच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला. या घटनेमुळे चिचबोडी गावावर शोककळा पसरली आहे.

प्राप्त माहितीनुसार, श्रीरंग ठावरी यांच्याकडे शेती होती. मात्र, सातत्याने होत असलेली नापिकी आणि यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे त्यांच्यावरील कर्जाचा भार वाढत गेला. मोठा खर्च करून पेरणी केली आणि मेहनतीने पीक उभे करण्याचा प्रयत्न केला; मात्र अपेक्षित उत्पन्न मिळण्याची आशा



यंदाही धुळीस मिळाली. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने कर्जाची परतफेड कशी करावी, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला होता. गेल्या काही दिवसांपासून ते अस्वस्थ असल्याचे सांगण्यात येते.

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असताना घरातील आर्थिक विवंचना त्यांना अधिक सतावत होती. एका बाजूला डोक्यावर कर्जाचा डोंगर आणि दुसऱ्या बाजूला उत्पन्नाची अनिश्चितता, अशा कात्रीत ते सापडले होते. शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या पाच हजार रुपयांच्या मदतीतून या संकटाचा सामना कसा करायचा आणि दिवाळीचा खर्च कसा भागवायचा, अशी चिंता त्यांना भेडसावत होती. शुक्रवारी रात्री उशिरा ते शेतात गेले. शनिवारी सकाळी शेतात गेलेल्या गावकऱ्यांना त्यांचा मृतदेह शेवग्याच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत दिसला. त्यानंतर विरूर स्टेशन पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन घटनेची नोंद घेतली असून, पुढील तपास सुरू आहे. श्रीरंग ठावरी यांच्या मृत्यूमुळे शेतीतील संकटांचे भयावह वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या शेतकऱ्याच्या वाट्याला उतारवयातही आर्थिक विवंचना आणि असुरक्षितता आली. सणासुदीच्या दिवसांत घराघरांत आनंदाची तयारी सुरू असताना चिचबोडीतील एका कुटुंबावर मात्र दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे गावकऱ्यांमधून हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, विरूर स्टेशन पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## फायनान्सच्या तगाद्याने परभणीतही आत्महत्या

फायनान्सरच्या जाचामुळे नांदेडमधील ४० वर्षीय शेतक-याने जीव गमावल्याची घटना ताजी असतानाच परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यात मायक्रो फायनान्सच्या कर्जाला कंटाळून एका ३२ वर्षीय तरुण शेतक-याने शेतात गळ्याला दोर लावून आत्महत्या केली. लहू लाडाने असे मृत शेतक-याचे नाव असून या दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मानवत तालुक्यातील केकरजवळा शिवारात लिंबाच्या झाडाला लहू लाडाने यांचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. अवघ्या ३२ व्या वर्षी तरुण शेतक-याने टोकाचे पाऊल उचलल्याने लाडाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**आठवड्याभरात दुस-या शेतक-याची आत्महत्या**

अवघ्या काही दिवसांपूर्वी कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही, असा व्हीडीओ करून बोरगाव येथील एका शेतक-याने गळफास घेतला. यानंतर माळकौठा येथील या शेतक-याने थेट फायनान्सच्या कार्यालयातच आपली जीवनयात्रा संपविली. केवळ १० हजारांच्या कर्जासाठी एका शेतक-याचा जीव गेल्याने खाजगी सावकारीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## पाकिस्तान आपल्याला वाचवतोय - फारूक अब्दुल्ला

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारूक अब्दुल्ला यांनी एक अत्यंत वादग्रस्त विधान केले आहे. ते काश्मिरी जनतेला चिथावण्याचे काम करताना दिसत आहेत. 'आपला शेजारी देश (पाकिस्तान) आपल्याला वाचवत आहे, नाहीतर यांच्या (भारताच्या) भावना चांगल्या नाहीत, असे वादग्रस्त विधान त्यांनी केले आहे. ते जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला येथे कलम ३७० च्या मुद्द्यावर बोलत होते. बारामुल्ला येथे एका कार्यकर्ता संमेलनाला संबोधित करताना फारूक अब्दुल्ला यांनी काश्मीरला कलम ३७० पुन्हा बहाल करण्यासंदर्भात भाष्य केले. ते म्हणाले, 'तुम्ही दिल्लीकडून काय अपेक्षा कराल? तुम्ही यांच्याकडून न्यायाची अपेक्षा कराल? हिंमत ठेवा त्यांचा सामना करण्याची. नाही ठेवली तर तुमचे नाव आणि निशाणही मिटून जाईल. हे आज गप्प आहेत कारण जगात जोर आहे. आणि आपला शेजारी यांच्या मागे लागलेला आहे. तो आपल्याला वाचवत आहे अन्यथा यांच्या भावना चांगल्या नाहीत.'



**उपराज्यपालांवर निशाणा -** याच कार्यक्रमात फारूक अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरच्या विद्यमान प्रशासनावर आणि उपराज्यपालांवरही भाष्य केले. आरोग्य क्षेत्राता संदर्भात बोलताना ते म्हणाले, काश्मीरमधील विद्यार्थ्यांना दोन वर्षे रुग्णालयांमध्ये सेवा द्यावी लागते, अन्यथा राज्याला ४० लाख रुपयांचा दंड भरावा लागतो. या नियमांसंबंधीची फाईल गेल्या एक वर्षापासून उपराज्यपालांकडे पडून आहे, पण त्यावर कोणताही निर्णय घेतला जात नाहीये. अब्दुल्ला पुढे म्हणाले, 'पूर्वी वैद्यकीय संस्थांचे संचालक आणि समिती उपकरणे किंवा डॉक्टरांच्या नियुक्तीसंदर्भात निर्णय घेत होते. मात्र, सध्याच्या प्रशासनाने ती सर्व स्वायत्तता आणि अधिकार संपवून टाकले आहेत.

## बंदी घातलेल्या संघटनेशी संबंध, काश्मीरात ४ महिलांसह ६ जणांना अटक

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** जम्मू आणि काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात बंदी घातलेल्या 'इत्तेहाद-उल-मुस्लिमीन' या संघटनेशी संबंध असल्याच्या आरोपावरून सहा जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये चार



महिलांचा समावेश आहे. या नेटवर्कला सीमेपलीकडून निधी मिळत असल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, बांदीपोरा आणि आसपासच्या परिसरात १४ ते १५ गुप्त बैठका झाल्या होत्या. यापैकी पाच ते सहा बैठका बांदीपोरा-बारामुल्ला रस्त्यावरील एका छोट्या हॉटेलमध्ये झाल्या होत्या.तपासकर्त्यांना एका वर्षापेक्षा जास्त कालावधीत अंदाजे ७ ते ८ लाख रुपयांचे संशयास्पद व्यवहार आढळून आले आहेत. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्याच्या कलम १० आणि १३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निधीचा स्रोत आणि या नेटवर्कमध्ये सामील असलेल्यांच्या भूमिकेचा तपास करत आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, कुपवारा जिल्ह्यातील हंदवारा येथील रहिवासी वाहिद अहमद भट यांच्यापासून तपासाला सुरुवात झाली. एका परिषदेनंतर त्याला २०२२ मध्ये यूएपीए करणात अटक करण्यात आली. पोलिसांच्या ⇨(पान २ वर)

## खासगी फायनान्स कंपनीची मुजोरी, कार्यालयात आढळला मृतदेह




## १० हजारांच्या कर्जासाठी शेतक-याचा घेतला जीव!

**नांदेड / प्रतिनिधी-** कर्जाचा डोंगर, दुष्काळ आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची चिंता अशा परिस्थितीत एका अल्पभूधारक शेतक-याचा शहरातील खाजगी फायनान्सच्या कार्यालयात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. यामुळे खळबळ उडाली. शेतक-याने खाजगी फायनान्सकडून केवळ १० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जवसुलीसाठी त्यांना गावातून नांदेडला आणल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला असून, फायनान्स चालकानेच त्यांची हत्या केल्याचा संशयही व्यक्त केला.ही घटना नांदेड शहरातील हिंगोली गेट परिसरातील चिखलवाडी रोडवरील खालसा फायनान्सच्या कार्यालयात घडली. माळकौठा (ता. मुदखेड) येथील चंद्रकांत शिंदे हे अल्पभूधारक शेतकरी होते. त्यांच्या कुटुंबात आई, पत्नी आणि दोन मुली व दोन मुलगे आहेत. शेतीतून मिळणा-या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणी वाढल्याने त्यांना खाजगी फायनान्सकडून कर्ज घ्यावे लागले.शिंदे यांनी मागील महिन्यात १० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, व्याजाच्या नावाखाली रक्कम कापून त्यांच्या हातात केवळ सात हजार रुपये देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांना कर्जाची परतफेड करता आली नाही. याच कारणावरून त्यांच्यावर कर्जवसुलीसाठी दबाव आणण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. कर्जाच्या वसुलीसाठी गुरुवारी फायनान्सशी संबंधित व्यक्तींनी चंद्रकांत शिंदे यांना माळकौठा येथून नांदेडमधील कार्यालयात आणल्याचा ⇨(पान २ वर)

### शंभराव्या साहित्य संमेलनाची आळंदीत नांदी;

## २९ ऑक्टोबरला साहित्यिकांची मांदियाळी

**पुणे / प्रतिनिधी-** ६९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आठवणींना उजाळा देणारे आणि १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची नांदी ठरणारे 'साहित्यनिष्ठांची मांदियाळी' गुरुवार,दि. २९ ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील फ्रूटवाले धर्मशाळेत होईल.ग्रंथदिंडी व ग्रंथपूजनाचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या महासचिव प्रा स्वाती चाटे व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह सुनील महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.मसापचे जिल्हा प्रमुख राजन लाखे, गप्पाष्टककार डॉ.संजय उपाध्ये व समन्वयक डॉ.महेश थोरवे उपस्थित होते.विश्वशांती केंद्र (आळंदी),माईर्स एमआयटी,महाराष्ट्र साहित्य परिषद व मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्याचे उद्घाटन ज्येष्ठ संगीतकार भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते होईल.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस हे पाहुणे असतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार असतील.माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.राहुल कराड व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ.मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम होत आहे.मसापचे अध्यक्ष ⇨(पान २ वर)



## एफडीएच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न

**पुणे/ प्रतिनिधी-** एफडीएने केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) विरोधात थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यापासून रोखले जात असल्याचा आणि अधिकार हिरावून घेतले जात असल्याचा एफडीएने दावा केला आहे. एफएसएसएआयने घटनाबा पद्धतीने समांतर अंमलबजावणी यंत्रणा निर्माण केली असून, त्याद्वारे राज्य सरकारच्या अधिकारांवर अतिक्रमण केल्याचा एफडीएचा दावा आहे. एफएसएसएआयच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी 'केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी' आणि 'केंद्रीय परवाना प्राधिकरण' यांसारखी पदे निर्माण करून⇨(पान २ वर)



# माझ्याकडे एक बॉम्ब, दुसरा अणूबॉम्ब!

### मनोज जरांगेंचा मोठा दावा ; महाराष्ट्रात मोठा भूकंप?

**बीड /प्रतिनिधी-** मनोज जरांगे पाटील यांनी 'बॉम्ब' आणि 'अणूबॉम्ब' ऑडिओ क्लिप्सचा खळबळजनक दावा केला आहे, ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ अपेक्षित आहे. एकनाथ शिंदे गटावर बदनामीचा आरोप करत त्यांनी हे दावे केले. राज ठाकरे यांचे कौतुक करत, जरांगेंनी सत्ताधा-यांना आव्हान दिले असून, त्यांच्या भूमिकेमुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.माझ्याकडे आणखी एक बॉम्ब आहे. तो बॉम्ब झाल्यावर दुसरा अणूबॉम्ब आहे. माझ्यावरचे आरोप होऊ द्या. त्यानंतर हे दोन्ही बॉम्ब फोडतो, असा खळबळजनक इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. जरागे यांच्या दाव्याने मोठी खळबळ उडाली आहे. जरांगेंकडे असलेल्या या दोन्ही क्लिप कुणाच्या विरोधातील आहेत? त्यामुळे कुणाची खाट पडणार आहे? अशी चर्चा महाराष्ट्रात रंगली आहे.



एकनाथ शिंदेंच्या लोकांनी माझ्याविरोधात बोलण्यासाठी खूप टीम तयार केल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यात या टीम कार्यरत आहेत. या टीमकडून माझी बदनामी केली जात आहे. त्यांना आता बोलू द्या. त्यांना मी बरंच बोलू देणार आहे. नंतर मी एकदाच बॉम्ब काढतो. तुम्ही शिंदेंसाठी मला बदनाम करताय ना? मी बघा काय काय काढतो? असा इशाराच मनोज जरांगे पाटील एकनाथ शिंदे गटाला दिला आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे कौतुक केले आहे. राज ठाकरे यांनी मनोज जरांगेंनी केलेल्या गौप्यस्फोटावरून राज्य सरकारला चांगलंच धारेवर धरले होते. त्यावर जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे बुद्धीवर जोर देऊन विकासाचे व्हिजन देणारा माणूस आहे. मी त्यांची काही भाषणं पाच सहा वर्षापूर्वी ऐकली आहेत. सत्य बोलून अमूक गोष्ट करायची हे सांगणारा हा माणूस आहे. मनोज जरांगे कशाला ५०० कोटी घेतील. जरांगे सच्चे कार्यकर्ते आहेत. त्यांना जर काही हवे असते तर ते राजकारणातच आले असते, असे भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. त्यावर जरांगेंनी प्रतिक्रिया दिलीय. सुधीर भाऊ बोलले⇨(पान २ वर)

# आधी नवजात बाळाचा मृत्यू, उपचारांअभावी मातेनेही सोडला जीव

### शासकीय डॉक्टरांनी खासगी रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला

**गडचिरोली /प्रतिनिधी-** दुर्गम गावात रस्त्याचा अभाव आणि उपचारांसाठी पुरेसे पैसे नसल्याने एका २१ वर्षीय मातेला जीव गमवावा लागल्याची हृदयद्रावक घटना एटापल्ली तालुक्यातील रेखनार येथे घडली. प्रसूतीनंतर अवघ्या तीन दिवसांत नवजात बाळाचा मृत्यू झाला. त्यानंतर स्वतःच्या ढासळत्या प्रकृतीशी झुंज देणाऱ्या पार्वती सुरेश झोरे यांना उपचारांसाठी अनेक रुग्णालयांचे उंबरठे झिजवावे लागले. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे पुढील उपचार घेणे शक्य न झाल्याने २४ ऑक्टोबर रोजी त्यांचीही प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे दुर्गम भागातील आरोग्यसेवा आणि रस्त्यांच्या उपलब्धतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



पार्वती झोरे या एटापल्ली तालुक्यातील चाखोवाडा ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या रेखनार गावातील रहिवासी होत्या. रेखनार ते चोखेवाडा हे सुमारे १५ किलोमीटरचे अंतर असून, गावाला जोडणारा पक्का रस्ता नसल्याने गर्भावस्थेपासूनच त्यांना अडचणींचा सामना करावा लागला. प्रसूतीच्या वेळी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास रुग्णालयात पोहोचणे कठीण होईल, या भीतीने त्यांना आधीच माहेरच्या पैंडी गावात हलविण्यात आले होते. २९ सप्टेंबर रोजी प्रसववेदना सुरू झाल्यानंतर पार्वती यांना गडचिरोली येथील महिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर झाल्याने त्याच दिवशी त्यांना चंद्रपूर येथे हलविण्यात आले. ३० सप्टेंबर रोजी शस्त्रक्रियेद्वारे त्यांनी मुलाला जन्म दिला. मात्र, जन्मावेळी बाळाचे वजन अवघे ६०० ग्रॅम होते. अतिदक्षता विभागात तीन दिवस उपचार सुरू असतानाच त्या नवजात बालकाचा मृत्यू झाला. बाळ गमावल्याच्या दुःखासोबतच पार्वती यांची प्रकृतीही खालावत गेली.

**नागपूरपर्यंत धावपळ; उपचारांचा खर्च परवडेना**

प्रसूतीनंतरही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने पार्वती यांना नागपूर येथे नेण्यात आले. तेथील शासकीय डॉक्टरांनी खासगी रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने खासगी रुग्णालयातील उपचारांचा खर्च पेलणे शक्य झाले नाही. परिणामी, कुटुंबीयांना त्यांना पुन्हा पैंडी येथे ⇨(पान २ वर)



## Gen-Z, Gen-Alpha माहिती अन् तंत्रज्ञानाच्या स्फोटाच्या काळात जन्मलेले

**नागपूर/प्रतिनिधी-** जेन झी आणि जेन अल्फा हे माहितीच्या स्फोटाच्या काळात, तंत्रज्ञानाच्या स्फोटाच्या काळात जन्मले आहे. त्यामुळे त्यांच्याकडे माहिती भरपूर आहे. मात्र, त्या माहितीवर आधारित ज्ञान (नॉलेज) त्यांच्याकडे नाही. त्यामुळे या काळातील विद्यार्थी, तरुणांकडे असलेल्या माहितीला ज्ञानात रुपांतरित करण्याची जबाबदारी शिक्षक, मुख्यधापकांवर आहे. अस विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. दरम्यान, सर्व विकसित देशात त्यांचं शैक्षणिक अभ्यासक्रम मातृभाषेत आहे. तर सर्व विकसनशील देशात शैक्षणिक अभ्यासक्रम त्यांच्यावर राज्य करून गेलेल्या देशाच्या भाषेत आहे. नवीन एज्युकेशन पॉलिसी म्हणूनच मातृ भाषेत शिक्षण देण्यावर भर देते. पाच वर्षापर्यंत मुलांचा मानसिक विकास तीव्रतेने होते. त्याकाळात मातृ भाषेत मुलांसोबत होणारी बातचीत त्यांच्या मानसिक विकासात महत्वाची भूमिका बजावते. अस विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ⇨(पान २ वर)

## पतीचे अनैतिक संबंध म्हणजे क्रूरता नव्हे

### उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**चेन्नई / वृत्तसंस्था-** पतीचे दुस-या महिलेसोबत अनैतिक संबंध असणे, हा भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ 'अ' अंतर्गत विवाहितेला हुंड्यासाठी किंवा इतर कारणांसाठी त्रास देण्याचा म्हणजेच 'क्रूरतेचा' गुन्हा ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती सुंदर मोहन यांनी शुक्रवारी एका खटल्याची सुनावणी करताना हे निरीक्षण नोंदवले. एका मृत महिलेच्या



भावाने दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी करताना न्यायालयाने हा निर्णय दिला. संबंधित महिलेने आपल्या दीड वर्षांच्या मुलासह जीवन संपवले होते. पतीचे अनैतिक संबंध आणि हुंड्याच्या छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या भावाने केला होता. या प्रकरणी २३ एप्रिल २०१८ रोजी महिला न्यायालयाने ठोस पुराव्यांच्या अभावी पतीची सर्व आरोपांमधून निर्दोष सुटका केली होती. राज्य सरकारने या निकालाविरोधात अपील न केल्यामुळे, मृत महिलेच्या भावाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने सुनावणीदरम्यान म्हटले की, कलम ४९८ 'अ' अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी केवळ पतीचे अनैतिक संबंध असल्याचे सिद्ध करणे पुरेसे नाही, तर त्यापलीकडे जाऊन इतर छळाचे पुरावे अभियोजन पक्षाला सादर करावे⇨(पान २ वर)



# ९२.२५ टक्के झाले अंतिम मतदान
## २६ उमेदवारांचे भाग्य मतपेटीत बंद






**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी पाचही जिल्ह्यांत मोठ्या उत्साहात मतदान पार पडले. संबंधित जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अंतिम आकडेवारीनुसार, या निवडणुकीत विभागात एकूण ९२.२५ टक्के मतदान नोंदविण्यात आले असून ३३ हजार ०३४ शिक्षकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार रिंगणात असल्याने शिक्षक मतदारांचा कौल नेमका कोणाच्या बाजूने जाणार, याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

निवडणुकीत महायुतीकडून शिवसेनेचे विद्यमान आमदार किरण सरनाईक, तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या अदिती पोहरे हे प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. याशिवाय डॉ. प्रशांत विघे, दिलीप कडू, अविनाश बोरडे, संगीता शिंदे, शेखर भोयर, सुमित पवार, माजी आमदार श्रीकांत देशपांडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दत्तात्रय लहाने आणि सुरेश देवकर यांच्यासह अन्य उमेदवारांनीही रिंगणात आपले आव्हान उभे केले होते. शिक्षकांचे प्रश्न, जुनी पेन्शन योजना, सेवाविषयक मागण्या आणि शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न या निवडणुकीच्या केंद्रस्थानी होते. शुक्रवारी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत झालेल्या या मतदानासाठी विभागातील पाच जिल्ह्यांत ८१ मतदान केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली होती. एकूण ३५ हजार ८१० नोंदणीकृत शिक्षक मतदार या निवडणुकीसाठी पात्र होते, त्यापैकी ३३ हजार ०३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

या अंतिम आकडेवारीनुसार वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यांत ९५ पेक्षा अधिक टक्केवारी नोंदवली गेली असून गुरुजींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. तर अमरावती जिल्ह्यात ८९.३६ टक्के नोंदले गेले. महिला शिक्षकांनी या मतदान प्रक्रियेत मोठा सहभाग घेतला. उच्च मतदानाची ही टक्केवारी उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, पसंती क्रमाने होणारे मतदान, संघटनात्मक ताकद आणि शिक्षक संघटनांचा प्रभाव यावर विजयाचे गणित अवलंबून असणार आहे. शुक्रवार रात्रीच सर्व बूथवरून बॅलेट पेपरच्या पेटी अमरावती विद्यापीठ रोडवरील लोकशाही भवनातील स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित आणण्यात आल्या असून तिथे कडक पहारा ठेवण्यात आला आहे. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता १५ टेबलांवर मतमोजणीला सुरुवात होणार असून, २६ उमेदवारांपैकी आमदारकीची संधी नेमकी कोणाला मिळणार, हे या मतमोजणीनंतर स्पष्ट होईल.

**अमरावती विभागातील अंतिम टक्केवारीं**

अमरावती - ८९.३६ टक्के (मतदार: १००९७, मतदान: ९०२३)
अकोला - ९२.१२ टक्के (मतदार: ५९४२, मतदान: ५४७४)
यवतमाळ - ९३.१३ टक्के (मतदार: ६९३२, मतदान: ६४५६)
बुलढाणा - ९३.६८ टक्के (मतदार: ९१२४, मतदान: ८५४७)
वाशिम - ९५.१३ टक्के (मतदार: ३७१५, मतदान: ३५३४)
**एकूण विभाग - ९२.२५ टक्के**
**(एकूण मतदार: ३५८१०, एकूण मतदान: ३३०३४)**

# दिवाळीनंतर पाणी कपात, मजीप्रा ची तयारी सुरू
## -दुष्काळ सदृश्य परिस्थिती जल संकट

**अमरावती/प्रतिनिधीः-**

यंदा अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याने जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे आगामी काळात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन करण्यात येत आहे. शहरातील पाणी पुरवठ्याच्या वेळेत कपात होण्याचे संकेत मिळत आहेत. सध्या शहरात एक दिवसा आड दोन तास पाणीपुरवठा केला जात असला, तरी दिवाळी नंतर पाणी पुरवठ्याचा कालावधी अर्ध्या तासाने कमी होण्याची शक्यता मजीप्राने वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काट कसरीने वापर करावा आणि पाण्याची नासाडी टाळावी, असे आवाहन मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सिंभोरा धरणातील पाणीसाठा आता निम्म्यावर आला आहे. धरणातील पिण्याच्या पाण्याचे आरक्षण लक्षात घेऊन सध्या शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यात आला आहे.मात्र, पाण्याची उपलब्धता आणि भविष्यातील संभाव्य टंचाईचा विचार करता पाणी पुरवठ्याच्या वेळेत कपात करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शहरातील सुमारे १ लाख ४ हजार ग्राहकांना पाणीपुरवठा केला जातो. सध्या एक दिवसाआड दोन तास पाणी मिळत आहे. मात्र, दिवाळीनंतर पाणी पुरवठ्याचा कालावधी दोन तासांवरून दीड तास करण्याची शक्यता आहे.

हिवाळ्यापेक्षा उन्हाळ्यामध्ये पाण्याची जास्त गरज असते. उन्हाळ्यामध्ये नागरिकांना पाण्याची टंचाई भासली नाही पाहिजे आणि सर्वांना पाणी मिळाले पाहिजे यासाठी काटकसरीचे नियोजन मजीप्राणे केलेले आहे. नागरिकांनी पण काटकसर करून सहकार्य करावे अशी अपेक्षा मजीप्रा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

### ■ दीड तासावर पाणीपुरवठयाची शक्यता

सध्या शहरात दोन तास पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र, दिवाळीनंतर परिस्थितीत बदल होऊ शकतो. पाण्याची उपलब्धता लक्षात घेता पाणीपुरवठा दीड तासावर आणण्याची शक्यता आहे. पाणी कपातीबाबत वरिष्ठ स्तरावरून आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे.

**-एस. पी. लेवरकर,** अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

# १ व १० वरिल उर्वरित

### १० हजारांच्या कर्जासाठी शेतक-याचा

आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला. त्यांच्याकडे ७० हजार रुपये भरण्याची मागणी करण्यात आल्याचेही नातेवाईकांचे म्हणणे आहे. शिंदे यांना कार्यालयात आणल्याची माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीयांना ते एक-दोन दिवसांत परत येतील, अशी अपेक्षा होती. मात्र, त्यानंतर घडलेल्या घटनेने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. शुक्रवारी खालसा फायनान्सच्या कार्यालयात शिंदे यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही बातमी समजताच कुटुंबीय आणि नातेवाईक आक्रोश करत घटनास्थळी दाखल झाले.आपल्या मुलाचा फायनान्सच्या मालकाने खून केला, असा आरोप मयत शिंदे यांच्या आईने केला तर मुलीने सांगितले की, आपल्या वडिलाने ७ हजाराचे कर्ज घेतले. मात्र एका महिन्यात ७० हजारांची मागणी करण्यात आली. यासाठी आपल्या वडिलांना जबर मारहाण करून खून केला, असा आरोप केला.

फायनान्स चालक पसार

चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूमागे कर्जवसुलीसाठी आणलेला दबाव कारणीभूत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. फायनान्स चालकाने त्यांची हत्या केल्याचा संशय व्यक्त करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. या घटनेनंतर खालसा फायनान्सचा चालक पसार झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### २९ ऑक्टोबरला साहित्यिकांची

योगेश सोमण हे ग्रंथपूजन करतील.आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कु-हाडे,आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे व मसापचे कार्यवाह सुनील महाजन विशेष पाहुणे असतील.तीर्थक्षेत्राचे ज्ञानतीर्थ क्षेत्रात परिवर्तन घडविण्यासाठी आजच्या पिढीतील संत,कीर्तनकार,प्रवचनकार यांचे योगदान' या विषयावर विचारमंथन होणार आहे.अभिनेत्री मधुरा वेलणकर आणि डॉ समीरा गुजर यांच्या ज्ञानदेवे रचिला पाया' हा सांस्कृतिक कार्यक्रम होईल.समारोप सोहळ्याला राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

### एफडीएच्या अधिकारावर गदा

आपल्या अधिकारांचा बेकायदेशीरपणे वापर केल्याचे याचिकेत म्हटले असून ही पदे अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या वैधानिक चौकटीत बसत नसल्याचा एफडीएचा दावा आहे.अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चा उद्देश अन्न नियमनाचे विकेंद्रीकरण करणे हा होता, असा दावाही एफडीएकडून याचिकेत करण्यात आला आहे. यापूर्वी या कायद्याची अंमलबजावणी राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त आणि नियुक्त अधिकारी यांच्यामार्फत केली जात होती, असेही एफडीएने म्हटले आहे. मात्र, त्यानंतर केंद्र सरकार आणि एफएसएसएआय यांनी कायद्यात विविध सुधारणा केल्या. या सुधारणांमुळे विकेंद्रित अंमलबजावणी व्यवस्था हळूहळू मोडीत काढली जात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला. घटनाबा सुधारणा आणि नियम रद्द करण्याची तसेच, केंद्रीय परवाना असलेल्या आस्थापनांची तपासणी करण्यापासून राज्याच्या अधिका-यांना रोखणा-या मे २०२३ मधील आदेशाला स्थगिती देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. २६ नोव्हेंबरला मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडणार आहे.

### माझ्याकडे एक बॉम्ब,

म्हणून बोलत नाही. मी यापूर्वीही बोललो आहे. सुधीर भाऊंनी पक्ष वाढवला. त्यांची अवस्था काय केली आहे? ते विधानसभेत पक्षाच्या विरोधातही बोलतात. त्यांच्या मनातील तळमळ महाराष्ट्र बघतो. ते सत्य सांगणारे नेते आहेत. ते मराठ्यांवर डाव टाकणार नाही असं वाटतं. टाकला तर मी दुसरा फासा टाकायला मोकळा आहे आणि पक्का आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### आधी नवजात बाळाचा मृत्यू,

आणावे लागले. पैंडी येथे आशा स्वयंसेविकेच्या निगराणीखाली असताना २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पार्वती यांची प्रकृती पुन्हा बिघडली. त्यांना कसनसूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथून गडचिरोली येथे नेण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, आर्थिक अडचणींमुळे कुटुंबीयांनी त्यांना हेडरी येथील रुग्णालयात दाखल केले. तेथेही गडचिरोलीला नेण्याचा सल्ला मिळाल्यानंतर कुटुंबीयांसमोर उपचारांचा आणि प्रवासखर्चाचा प्रश्न उभा राहिला. अखेर २४ ऑक्टोबर रोजी पार्वती यांचा मृत्यू झाला. एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

दुर्गम भागातील आरोग्यसेवेवर प्रश्नचिन्ह

या घटनेने दुर्गम भागातील रस्ते, आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा आणि गरीब रुग्णांना वेळेत उपचार मिळण्याच्या व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा अधोरेखित केल्या आहेत. प्रसूतीसाठी महिलेला अनेक ठिकाणी हलवावे लागणे, बाळाचा मृत्यू होणे आणि त्यानंतर मातेच्या उपचारांसाठी कुटुंबाची आर्थिक ओढाताण होणे, या घटनाक्रमाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. पार्वती यांच्या मृत्यूमागील नेमकी वैद्यकीय कारणे, उपचारांची उपलब्धता आणि रुग्णालयांदरम्यानच्या संदर्भसेवेची स्थिती यांची प्रशासनाने चौकशी करणे आवश्यक आहे. दुर्गम भागातील नागरिकांना वेळेत आणि परवडणारे उपचार मिळावेत, यासाठी केवळ आश्वासने नव्हे, तर प्रत्यक्षात सक्षम आरोग्यसेवा आणि दळणवळणाची सुविधा उभी करण्याची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे.

### पतीचे अनैतिक संबंध म्हणजे

लागतात. सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निकालांचा दाखला देत न्यायालयाने स्पष्ट केले की, अनैतिक संबंधांसोबतच महिलेवर झालेल्या इतर मानसिक किंवा शारीरिक क्रूरतेची पुराव्यानिशी सिद्धता होणे गरजेचे असते. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या 'पिनाकिन महिपातराय रावल विरुद्ध गुजरात राज्य' या खटल्याचा दाखला दिला. न्यायालयाच्या मते, अभियोजन पक्ष हुंड्याची मागणी किंवा पतीचे अनैतिक संबंध सिद्ध करू शकला नाही. तसेच, संबंधित महिलेला जीवन संपवण्यास प्रवृत्त केले, अशी कोणतीही क्रूरता घडल्याचा पुरावा आढळला नाही. पुराव्यांच्या मूल्यमापनानंतर अभियोजन पक्ष गुन्हा सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने हे अपील फेटाळून लावले.

### Gen-Z, Gen-Alpha माहिती अन्

यांनी केलं आहे. नागपुरातील 'नवव्या आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदे'च्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. आज सर्वजण बोलतात की आजचा विद्यार्थी मोबाईलमध्ये गुंतला गेला आहे. मात्र आम्ही सर्वही तेवढेच मोबाईलमध्ये व्यस्त आहोत. आमचा ही अटेंशन स्पॅन काही सेकंदाचा राहिला आहे. त्यामुळे मोबाईल आणि सोशल मीडियाला पूर्णपणे नाकारण्याची गरज नाही, तर त्याचा वापर कसा करायचा, यावर लक्ष देण्याची गरज असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितल. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये टेक्नॉलॉजिकल गॅप आहे. मात्र, आता ती गॅप कमी होत आहे. ५ वर्षात ती देखील राहणार नाही. AI कडे मानवी संवेदना नाही. एथिक्स नाही आणि हेच सर्व आपल्या शैक्षणिक सिस्टमचे मूल्ये आहे. जे AI कडे नाही. नितीश भारद्वाज यांनी आमच्या सरकारकडे काही अपेक्षा व्यक्त केल्या, आम्ही नक्कीच त्याचा विचार करू. असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### बंदी घातलेल्या संघटनेशी संबंध,

दाव्यानुसार, कुपवारा तुरुंगात असताना, भटने मंजूर अहमद शाह यांच्याशी पुन्हा संपर्क साधला, जो कथितरित्या पाकिस्तानात होता. त्यानंतर, या कथित नेटवर्कने आपल्या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी आणि पाठिंबा मिळवण्यासाठी सभा आयोजित केल्या. तपासकर्त्यांच्या मते, बांदीपोरा येथील दाचीगामची रहिवासी असलेल्या मुबिना बानोच्या जम्मू-काश्मीर बँक खात्यात अंदाजे २.२६ लाख जमा करण्यात आले होते. उर्वरित रक्कम कथितरित्या रोख स्वरूपात देण्यात आली होती. पोलिसांच्या दाव्यानुसार, यातील काही पैसे साथीदारांमध्ये वाटण्यात आले, तर काही पैसे भटच्या वैद्यकीय उपचारांसाठी वापरण्यात आले.

**धार्मिक उपदेशक आणि दोन कुरिअरच्या भूमिकेची चौकशी**

अटक करण्यात आलेल्यांची ओळख मुबिना बानो, वाहिद अहमद भट, खुशबू जान, मेहक जान, आलिया जान आणि इरफान अहमद रेशी उर्फ रईस अशी पटली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तपासात कुपवाडा येथील एका धार्मिक उपदेशकाची आणि दोन संशयित कुरिअरची भूमिकाही उघड झाली आहे. त्यांच्या भूमिकेची आणि पैशांच्या व्यवहाराच्या तपशिलाची पडताळणी केली जात आहे. पुढील तपास सुरू आहे.

### जिल्हा स्त्री रुग्णालयात पुन्हा

या कक्षामध्ये सध्या १५ लहान बालके दाखल आहेत. नवजात बालकांना नियंत्रित तापमानाची गरज असते, पण दिवसभर ते उकाड्यात तळमळत होते. दरम्यान या घटनेनंतर सीएस प्रमोद निरवणे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, फक्त पिन जळाली होती.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५८ वा

यावेळी करण्यात आलेले पवित्र भजन, मंत्रघोष व शंखनादाने परिसरातील वातावरण भक्तीमय झाले होते. राष्ट्रसंतांच्या समाधी स्थळी पहाटे-पहाटे हजारो गुरुदेवभक्त उपस्थित होते. गुरुदेव भक्ताच्या 'श्रीगुरुदेव की जय' या गजराने समाधी परिसर दुमदुमून गेला. तिर्थस्थापनेनंतर सामुदायिक ध्यान महासमाधी परिसरात घेण्यात आले. यावेळी संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे, संस्थेचे सर्वाधिकारी प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, सरचिटणीस जनार्दन बोथे, प्रचार प्रमुख गोपाल कडू, कार्यकारिणी सदस्य

दामोदर पाटील, ॲड.दिलीप कोहळे, अध्यात्म विभाग प्रमुख डॉ. राजाराम बोथे, आजीवन-जीवन प्रचारक यांच्यासह परिसरातील भाविक सहभागी झाले होते. पूर्व संध्येला महासमाधीवर विविध पुष्पगुच्छांनी सजावट करण्यात आली. यावेळी शंकर महाराज यांनी सामुदायिक ध्यानाच्या महत्वावर चिंतन प्रस्तुत करून ज्याप्रमाणे नद्यांच्या अनेक प्रवाहाने समुद्र बनतो त्याच प्रमाणे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी सर्वधर्माचा सार तयार करून सागरासारखे त्यांचे साहित्य तयार झाले. त्या साहित्याचा अभ्यास करून आपण सुखसमाधानाचा मार्ग शोधला पाहिजे असे त्यांनी सांगितले. यानंतर महाद्वारावर सर्वाधिकारी प्रकाश वाघ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रसंतांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा समाधी स्थळापासून ते गुरुदेवनगर काढण्यात आली. यावेळी श्रीगुरुदेव मानवसेवा छात्रालयाच्या विद्यार्थ्यांनी दिंडी, टाळ, ढोल, डमरू, पदन्यास, लेझीम यांचा समावेश शोभायात्रेत करण्यात आला. ह.भ.प.मानकर स्वामी यांच्या मार्गदर्शनात, अमोल बांबल यांच्या संयोजनात ही शोभायात्रा काढण्यात आली.

### व्हॉट्स ॲप ग्रुपवर धार्मिक भावना

निकेश गाढवे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चांदूर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४९८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या निर्देशानुसार पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक केली. सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकुरामुळे सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी या प्रकरणात तत्परता दाखविली.

### एचएसआरपी क्रमांक नसणाऱ्या

संबंधित वाहनधारकाला कारवाईला सामोरे जावे लागते. एचएसआरपी क्रमांक प्लेट बसविण्यासाठी शासनाने अनेकदा मुदतवाढ दिली होती. त्यानुसार लाखो वाहनचालकांनी एचएसआरपी क्रमांकाची प्लेट बसवून घेतली आहे. परंतू अजूनही अनेक वाहने जुन्या पध्दतीच्या क्रमांकाच्या प्लेट लावून वाहने चालवीत आहे. या अनुषंगाने प्रादेशीक परिवहन विभागामार्फत एचएसआरपीबाबत जुलै महिन्यापासून वाहनांची तपासणी सुरु आहे. यामध्ये आरटीओमार्फत आतापर्यंत जिल्ह्याभरात २ हजार ३१७ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, यामध्ये ९९८ वाहनांवर एचएसआरपी क्रमांकाची प्लेट नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत वाहनाचालकांना २ लाख ५० हजार ५०० रुपयांचा दंड देण्यात आला आहे.

### भरधाव अल्टोच्या धडकेत

ठिकाणाहून जात होते. त्याचवेळी एमएच २७-२५१४ क्रमांकाच्या अल्टो कारच्या चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यांच्या वडिलांच्या दुचाकीला मागून धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले. त्यांच्या डाव्या पायाचे गुडघ्याखालील हाड फ्रॅक्चर झाले असून, मागील बाजूच्या नसांनाही दुखापत झाली. त्यांच्यावर रुग्णालयात शस्त्रक्रिया करून पायात रॉड व प्लेट बसविण्यात आली. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी फिर्यादीच्या जबाबावरून गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

### बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये वृद्धाचे

बँकेच्या आवारातच घडलेल्या या प्रकारामुळे ग्राहकांच्या पैशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, चोरीचा तपास करण्यासाठी महत्त्वाचे ठरू शकणारे सीसीटीव्ही फुटेज दाखविण्यास बँक व्यवस्थापन टाळाटाळ करीत असल्याचा आरोप काँग्रेसचे तालुकाध्यक्ष पंकज वानखडे यांनी केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, शालीराम अवधूत डोंबळे हे शुक्रवारी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत पैसे काढण्यासाठी आले होते. बँकेतून रक्कम काढल्यानंतर त्यांनी २० हजार रुपये आपल्या थैलीत ठेवले. याचदरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या थैलीतील रोकड चोरून नेली. काही वेळानंतर थैलीतील पैसे गायब झाल्याचे लक्षात येताच डोंबळे यांनी बँक अधिकाऱ्यांकडे मदतीची मागणी केली. या घटनेनंतर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष पंकज वानखडे यांनी बँक व्यवस्थापनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बँकेच्या परिसरात चोरीची घटना घडली असल्याने तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रणातून संशयिताची ओळख पटण्यास मदत होऊ शकते. मात्र, हे फुटेज दाखविण्याबाबत बँक व्यवस्थापनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप वानखडे यांनी केला आहे. यासंदर्भात बँक व्यवस्थापनाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

### इंस्टाग्रामवर झालेल्या ओळखेनंतर

मार्च महिन्यात पीडिता घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरी पोहोचला आणि तिच्यावर जबरदस्ती केली. त्यानंतर ही बाब कोणालाही न सांगण्याची तंबी त्याने दिली. त्यानंतरही तो वारंवार तिचे शोषण करत राहिला.

ही बाब कोणाला सांगित ल्यास तिच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी आरोपीने दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. सततच्या त्रासाला कंटाळून पीडितेने अखेर कोतवाली पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी युवकाविरुद्ध कलम ६४ (२)(एम), ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक

वाघमारे व अजय नंदेश्वर कोषाध्यक्ष म्हणून प्रसन्न गायकवाड यांची तर सहसचिव पदावर दीपक तंतरपाडे व दिलीप धवणे तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून प्राचार्य गोपीचंद मेश्राम, मारुती गजभिये, बाबाराव दहिकर, गंगाबाई त्र्यंबकराव ढोके, जयश्री अरुण तेलमोरे, संध्या प्रशांत घोडस्वार, महादेव दुर्योधन व मोहनदास हरी मते अशा एकूण १५ सदस्य पदाधिका-यांची निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी प्राचार्य डॉ. संजय खडसे व प्रा. डॉ. रवी जुमळे यांनी जाहीर केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची जागा चांदुर रेल्वे रोडवरील वैष्णवदेवी मंदीरासमोर १३ एकर परिसरात आहे. नूतन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी स्मारकाचे कार्य युद्धपातळीवर करण्याचे ठरविले आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### दत्तापूरमध्ये नवी पाईपलाईन फुटली

अत्यंत निकृष्ट होता, हे आता स्पष्ट झाले आहे. संपूर्ण पाईपलाईन दर्जेदार पद्धतीने पुन्हा बदलून मिळाली नाही, तर प्रशासन आणि ठेकेदारा विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.जनतेच्या कष्टाच्या पैशातून कोट्यवधींचा निधी लाटायचा आणि काम मात्र दर्जाहिन करायचे, असाच कारभार या ठेकेदाराने चालवला असल्याचा संताप ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. एकीकडे पाण्यासाठी नागरिक त्रस्त असताना, दुसरीकडे हजारो लिटर शुद्ध पाणी रस्त्यावर वाहून जात असताना प्रशासकीय अधिकारी मात्र डोळ्यांवर पट्टी बांधून बसले आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यासाठी जबाबदार कंत्राटदादाला तत्काळ काळ्या यादीत टाकून त्याच्यावर दंडात्मक व फौजदारी कारवाई होणार, की नेहमीप्रमाणे अधिकारी आणि ठेकेदार मिळून यावर पडदा टाकणार, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केलेला आहे.

### पठाण चौकात धारदार सत्तूर

पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक शनिवारी हद्दीत गस्तीवर असताना गुप्त बातमीदाराकडून पठाण चौक परिसरात एका इसमाकडे धारदार शस्त्र असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने वजीर पटेल दवाखान्याजवळील गल्लीत धाव घेतली. तेथे एक इसम हातात धारदार लोखंडी सत्तूर घेऊन नागरिकांमध्ये भीती निर्माण करीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी त्याला सत्तूरसह ताब्यात घेतले. या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १४२ तसेच शस्त्र अधिनियमाच्या कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नागपुरी गेट पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक १ यशवंत सोळंके आणि गाडगेनगर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस उपनिरीक्षक विकास मनपिया, हेड कॉन्स्टेबल इरफान रायलीवाले, हेड कॉन्स्टेबल प्रवीण ढंगेकार, पोलीस कॉन्स्टेबल इमरान खान, मनीष यादव, शेखर गायकवाड आणि मोहन चौव्हान यांनी केली.

### मोर्शी, चांदूर रेल्वेत विषारी

तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि रासायनिक पदार्थांचा समावेश आहे. मोर्शी तालुक्यातील घोडदेव परिसरात स्थानिक गुन्हे शाखेने, तर चांदूर रेल्वे तालुक्यातील गौरखेड येथे स्थानिक पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणांत काही संशयित घटनास्थळावरून पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे.

मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरील घोडदेव परिसरात २३ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे शेतशिवारात छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच हातभट्टीची दारू तयार करणारे संशयित घटनास्थळावरून पळून गेले.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता दारू तयार करण्यासाठी ठेवलेला १ हजार ४०० लिटर मोहाचा सडवा, ३ किलो युरिया, १ किलो तुरटी, प्लास्टिकचे ड्रम, चाळण्या आणि इतर साहित्य आढळून आले. हा एकूण २ लाख ८० हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेची कलमे १२३, २७२, २७४ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क), (फ) नुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौरखेड येथे २४ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे चार जणांच्या घरांवर छापे टाकले. यामध्ये सकीना विकेश भोसले (वय २८), सौ. सीमा सुन्या भोसले (वय २८), राहुल पवार आणि चंदू पवार यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी दिलेल्या माहितीत नमूद आहे. घरांची तपासणी केली असता मागील बाजूस गावठी दारू तयार करण्यासाठी हातभट्टी सुरू असल्याचे आढळले. राहुल पवार आणि चंदू पवार हे घटनास्थळावरून पसार झाल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनास्थळावरून सुमारे २ हजार लिटर गावठी दारू, ५ हजार लिटर मोहाचा सडवा, विषारी रासायनिक पदार्थ आणि दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य असा एकूण ३ लाख २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १२३ आणि महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ड), (ई), (फ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विषारी पदार्थांच्या वापरामुळे

तसेच चांदूर रेल्वेचे ठाणेदार पोलीस निरीक्षक मंगेश मोहोड यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक विशाल रोकडे आणि पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर यांच्यासह संबंधित पथकांनी कारवाईत सहभाग घेतला. दोन्ही प्रकरणांतील फरार संशयितांचा शोध घेण्यासह अवैध दारू निर्मितीच्या अड्ड्यांबाबत पुढील तपास सुरू आहे.

### रस्ता अपघातात तरुणाचा

आपल्या दुचाकी वाहन क्रमांक एमएच-३२/बीबी-५२२२ ने तिवसा येथून गावी जात होता. बुधवार २१ ऑक्टोबर रोजी तो दुचाकी वरून गावाकडे जात असताना तिवसा ते कु-हा रोडवर भामोरा फाट्याजवळ त्याचा भीषण अपघात झाला. अपघातात तो गंभीर जखमी झाला. जखमी रोशनला तात्काळ तिवसा येथे दाखल करण्यात आले, मात्र त्याच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाल्याने डॉक्टरांनी त्याला अमरावतीला हलविण्याचा सल्ला दिला. त्याला तात्काळ अमरावती येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.या प्रकरणी मृतक रोशनचा भाऊ गजेंद्र काळे (२७) याने दिलेल्या तक्रारी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पंचाळा गट ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचार प्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी निलंबित

## आमरण उपोषणाची सांगता ; दिड कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील गट ग्रामपंचायत पंचाळा येथील भ्रष्टाचार आणि संबंधित प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी पंचाळा येथील ग्रामस्थांनी दि. २२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेत जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याचे निलंबनाचे आदेश काढून संपूर्ण चौकशी करून कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर दि. २३ ऑक्टोबर उपोषणाची सांगता झाली.



पंचाळा, सूरकंडी, मोहगव्हाण या गट ग्रामपंचायत मध्ये कामे न करता तब्बल दीड कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार करण्यात आली होती. याबाबत चौकशी समिती गठीत करुन चौकशी अहवाल सुद्धा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे देण्यात आला होता. मात्र सहा महिने झाल्यानंतरही संबंधित भ्रष्टाचार प्रकरणी कुठलीच कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांनी दि. २२ ऑक्टोबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणात महेंद्र पाटील मोरे, इस्माईल नौरंगाबादी, विशाल विभुते, भिमराव इंगोले, गुलाब मोरे आदी उपोषणास बसले होते. सदर उपोषणाची दखल घेत दि. २३ ऑक्टोबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचाळा गट ग्रामपंचायत च्या तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी अलका बाजीराव खंगार यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत. तसेच तक्रारींची दखल घेत जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशीची प्रक्रिया सुरू केली असून, दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

जिल्हा परिषद, वाशिमच्या पंचायत विभागाने जारी केलेल्या पत्रानुसार, ग्रामपंचायत पंचाळा येथील तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आली होती. या प्रकरणात ग्रामपंचायत अधिकारी अलका बाजीराव खंगार यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. त्यानंतर संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सहायक आयुक्त चौकशी, अमरावती विभाग, अमरावती यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणजेच, प्रकरणाची चौकशी आता वरिष्ठ स्तरावर सोपविण्यात आली असून, त्यातून नेमके काय निष्पन्न होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने उपोषणकर्त्यांना दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की, सहायक आयुक्त, अमरावती यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यात अपहार सिद्ध झाल्याचे निदर्शनास आल्यास शासनाच्या संबंधित परिपत्रकानुसार फौजदारी कारवाई करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

# रिसोडमध्ये डिलिव्हरी बॉयवर चाकूहल्ला ; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

## बसस्थानक परिसरातील पेट्रोल पंपावर घडली घटना ; जुन्या वादातून हल्ला केल्याची फिर्याद

■ प्रतिनिधी | रिसोड ■

किरकोळ वादाच्या कारणावरून एका डिलिव्हरी बॉयवर चाकूने हल्ला केल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास रिसोड शहरातील बसस्थानक रोडवरील देशमुख यांच्या पेट्रोल पंपावर घडली. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.



याबाबत अमन पंजाबराव वाघ (वय २५, रा. स्वामी विवेकानंद नगर, रिसोड) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. अमन वाघ हे एका खासगी कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतात. दसऱ्याच्या दिवशी, २० ऑक्टोबर रोजी त्यांचा सत्यजित सरनाईक (रा. रिसोड) याच्यासोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता.

२२ ऑक्टोबर रोजी रात्री अमन वाघ हे त्यांचा मित्र विजय शिंदे याच्यासोबत दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी बसस्थानक रोडवरील पेट्रोल पंपावर गेले होते. त्यावेळी त्यांचा मित्र पेट्रोल भरण्याच्या रांगेत उभा असताना अमन बाजूला थांबले होते. दरम्यान, सत्यजित सरनाईक हा त्याचा मेहुणा वेदांत गजानन काळे (रा. नांदेड) याच्यासोबत तेथे आला. सत्यजितने जुन्या वादाचा उल्लेख करून अमन यांच्याकडे बोट दाखविल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

त्यानंतर वेदांत काळे याने शिवीगाळ करून अमन यांना धरून ठेवले, तर सत्यजित सरनाईक याने त्यांच्याशी झटापट करत हातातील चाकूने वार केला. या हल्ल्यात अमन यांच्या उजव्या हाताच्या कोपराजवळ दुखापत झाली. यावेळी वेदांत काळे हा अमन यांना मारून टाकण्यास सांगत असल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेनंतर अमन यांनी तेथून पळ काढला. जाताना सत्यजितने पुन्हा दिसल्यास पाहून घेण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांसोबत शेतमजूरांनाही आर्थिक मदत द्या - वसंतराव हिवराळे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेती व्यवसायाला मोठा फटका बसला आहे . पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रब्बी हंगामही धोक्यात आला आहे त्यामुळे शेतीची कामे ठप्प झाली असून शेतकऱ्यांसोबत शेतमजूर आणि रोजंदारी वरील कामगारावरही आर्थिक संकट ओढवले आहे .

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती आणि शेतीतील मजुरीवर अवलंबून आहे . मात्र पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांकडून शेतीची कामे कमी झाली आहेत परिणामी, शेतमजूर, बांधकाम कामगार आणि लहान मोठ्या कारागिरांना रोजगार मिळणे कठीण झाले आहे घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि औषधोपचारांचा खर्च भागवितांना या कुटुंबाची मोठी आर्थिक कोंडी होत आहे. या परिस्थितीत शासनाने केवळ शेतकऱ्यांनाच मदत न देता शेतमजूर , रोजंदारी वरील कामगार आणि इतर कष्टकरी घटकांनाही आर्थिक मदत द्यावी. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत पुरेशी कामे उपलब्ध करून द्यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी शासनाकडे केली आहे. दुष्काळसदृश्य परिस्थितीचा परिणाम शेतीवर अवलंबून असलेल्या सर्व घटकावर होत असल्याने शासनाने शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबासाठी तातडीने मदतीच्या उपाययोजना राबवाव्यात असे हिवराळे यांनी नमूद केले आहे.

# एकमेकांना समजून घेण्यातच जगण्याचे खरे सौंदर्य!

## लेखक-संपादक श्रीपाद अपराजित यांचे प्रतिपादन; शरद व्याख्यानमालेत विचारांचे पहिले पुष्प

■ प्रतिनिधी | कारंजा ■

माणसाच्या जगण्याला खऱ्या अर्थाने सुंदर बनवायचे असेल, तर परस्परांना समजून घेण्याची वृत्ती, संवेदनशील मन आणि करुणेची भावना जोपासली पाहिजे. दुसऱ्याच्या सुखात आनंदाने सहभागी होताना त्याच्या दुःखातही समरस होणे, हीच खऱ्या माणुसकीची ओळख आहे. मात्र, जीवनातील संवेदना प्रगल्भ झाल्याशिवाय हे शक्य होत नाही. एकमेकांना समजून घेण्यातच जगण्याचे खरे सौंदर्य दडले आहे, असे मौलिक प्रतिपादन नागपूर येथील लेखक व संपादक श्रीपाद अपराजित यांनी केले.



कारंजा येथील कै. नानासाहेब दहीहांडेकर प्रांगणात सुरू असलेल्या शरद व्याख्यानमालेत गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी 'जीवन सुंदर आहे' या विषयावर ते बोलत होते. त्यांच्या विचारांनी व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफण्यात आले. जीवनातील सौंदर्याची संकल्पना स्पष्ट करताना अपराजित म्हणाले की, माणसाची वृत्ती संकुचिततेकडून व्यापकतेकडे जाणे आवश्यक आहे. जात-पात, भेदभाव आणि श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भिंती ओलांडून माणसाने माणसाशी माणुसकीच्या नात्याने जोडले गेले पाहिजे. यासाठी त्यांनी प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांच्या गीतातील 'पंछी, नदियाँ, पवन के झोंके, कोई इनको ना रोके' या ओळींचा संदर्भ दिला. निसर्गातील पक्षी, नद्या आणि वारा कोणताही भेदभाव न करता मुक्तपणे वाहतात; मग माणसानेच स्वतःभोवती भेदाभेदाच्या सीमा का आखाव्यात, असा विचार त्यांनी मांडला.

### मान्यवरांच्या उपस्थितीत व्याख्यानमालेचा प्रारंभ

कार्यक्रमाच्या प्रारंभी सुधीर आमले व डॉ. अनघा कांत यांनी श्रीपाद अपराजित यांचे स्वागत केले. अतिथी नानोटे यांचे स्वागत विजय गाढवे यांनी केले. डॉ. पद्माकर मिसाळ यांनी प्रास्ताविक केले, तर प्रसन्न पळसकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन योगेश देशमुख यांनी केले. डॉ. सुशील देशपांडे यांनी शारदा स्तवन सादर केले.

अहंकार आणि संकुचितता ही जीवनसौंदर्याच्या मार्गातील अडथळे आहेत, असे सांगताना ते म्हणाले की, समाजात आपले स्थान मोठे आहे किंवा आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत, अशी भावना माणसामध्ये निर्माण झाली की परस्परांतील आत्मीयता कमी होते. त्यातून सौंदर्यविरोधी प्रवृत्ती वाढतात. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या वर्तनातून समानता, सहिष्णुता आणि माणुसकीची मूल्ये जपली पाहिजेत. जीवन सुंदर करण्यासाठी निरागस कृती, माणुसकीवरील निष्ठा आणि जगण्याविषयीची अभंग श्रद्धा महत्त्वाची आहे. उणिवा ओळखून त्यांचे सामर्थ्यात रूपांतर करणे, दुःखाने विचलित न होता त्यातूनही आनंद शोधणे आणि परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करणे, ही जीवन समृद्ध करणारी सूत्रे आहेत.

# वाचनालयात धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय वाशीम येथे दि.२०ऑक्टोबर २६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रसंगी कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत अधिकारी धम्मानंद भगत तर प्रमुख उपस्थिती म्हणून कवी महेंद्र ताजणे, समाजसेवक माधव डोंगरदिवे, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन,नालसाचे जिल्हा शिक्षण समिती सदस्य राजकुमार पडघान, प्रविण पट्टेबहादूर,से.नि.शिक्षक आर.पी.कांबळे ,वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांची उपस्थिती होती.

सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध यांना पुष्प अर्पण केले.नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकरांना उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व संविधान पुस्तक देऊन वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांनी स्वागत केले.नंतर महेंद्र ताजणे, समाजसेवक समाजसेवक माधव डोंगरदिवे, अरविंद पडघन, राजकुमार पडघान, प्रविण पट्टेबहादूर यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व विषद केले.तर उपस्थितांना राजकुमार पडघान यांनी बावीस प्रतिज्ञेचे वाचन केले.

# मृत्यूनंतरही नेत्रांतून जिवंत राहणार शंकरराव दाभाडे!

## वयाच्या ९९व्या वर्षी निधनानंतर कुटुंबीयांचा नेत्रदानाचा प्रेरणादायी निर्णय



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करता येतो, याचा प्रेरणादायी आदर्श शुक्रवार पेठ, वाशिम येथील शंकरराव लक्ष्मणराव दाभाडे यांच्या कुटुंबीयांनी घालून दिला. वयाच्या ९९व्या वर्षी शंकरराव दाभाडे यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी दुःखाच्या प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत मरणोत्तर नेत्रदानाचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे गरजू व्यक्तींना दृष्टी मिळण्याची निर्माण झाली आहे.

### दुःखाच्या प्रसंगी माणुसकी जपली

जवळच्या व्यक्तीच्या निधनानंतर नेत्रदानाचा निर्णय घेणे सोपे नसते. मात्र, दाभाडे कुटुंबीयांनी भावनिक दुःखावर मात करत नेत्रदानास संमती दिली. त्यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, समाजात नेत्रदानाबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे.

### आरोग्य विभागाच्या पथकाकडून नेत्रदान प्रक्रिया पूर्ण

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी आणि नेत्रशल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे, नेत्रचिकित्सा अधिकारी सुधीर साळवे आणि ओम राऊत यांनी नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण केली. संकलित नेत्रबुबुळे त्याच वेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. या नेत्रदानासाठी चंद्रकांत दाभाडे, नामदेव दाभाडे, केशव दाभाडे आणि डॉ. मनोज घुनागे यांनी विशेष प्रयत्न केले.

# दुष्काळ निवारणासाठी तालुक्यातील अधिकाऱ्यांनी गावे दत्तक घ्यावी - सुभाष देवढे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील कोरड्या दुष्काळावर मात करण्यासाठी तसेच शेतकरी व नागरिकांना प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील अधिकाऱ्यांनी गाव दत्तक घेऊन तेथील समस्या सोडवाव्यात, अशी मागणी पंचायत समिती मालेगावचे माजी सदस्य वंचित बहुजन आघाडीचे नेते सुभाष उत्तमराव देवढे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



जिल्ह्यात कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. यापूर्वी सादर केलेल्या निवेदनाची दखल घेऊन कार्यवाही सुरू झाली असली, तरी लोकप्रतिनिधींनी अधिक जागरूक होऊन प्रशासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे देवठे यांनी नमूद केले. मालेगाव तालुक्यातील दहिवडी, दुबळवेल यांसारखी गावे दत्तक घेऊन तेथील नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घ्याव्यात. संबंधित अधिकाऱ्यांनी गावात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधावा, पाणीटंचाईसह इतर अडचणींचा आढावा घ्यावा.

# 'खेत बचाव अभियान' अंतर्गत हिवरा बुद्रुक येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व आत्मा, मानोरा यांच्या संयुक्त विद्यमाने 'खेत बचाव अभियान' अंतर्गत हिवरा बुद्रुक येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री. रामेश्वर विश्वनाथ बळी तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर इंगोले होते.



डॉ. इंगोले यांनी 'खेत बचाव अभियान'ची उद्दिष्टे स्पष्ट करताना जमिनीची सुपीकता टिकविणे, मृद आरोग्याचे संवर्धन करणे, रासायनिक निविष्ठांचा संतुलित व गरजेनुसार वापर करणे, सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविणे आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा अवलंब करणे यांचे महत्त्व विशद केले. भारत सरकारच्या नैसर्गिक शेतीविषयक उपक्रमांची माहिती देऊन स्थानिक संसाधनांवर आधारित शेती, जैविक निविष्ठांचा योग्य वापर, पीक उत्पादन खर्चात कपात आणि दीर्घकालीन शाश्वत उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात आत्माचे बीटीएम श्री. संजय राऊत यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती पद्धती, मृद परीक्षणाचे महत्त्व, सुधारित वाणांचा वापर, मृद आरोग्य संवर्धन आणि कमी खर्चाच्या कृषी तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता व आर्थिक नफा वाढविण्यासाठी शास्त्रीय तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# वाशिम जिल्ह्यात मंगळवारी जंतनाशक मोहीम

**वाशिम :** बालकांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी वाशिम जिल्ह्यात २७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत १ ते १९ वर्षे वयोगटातील २ लाख ८५ हजार ८४७ बालकांना अल्बेंडाझोलची जंतनाशक गोळी देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मोहिमेच्या दिवशी गोळी घेऊ न शकलेल्या पात्र बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकही पात्र बालक जंतनाशक उपचारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्णा सभागृहात जिल्हा समन्वय समितीची सभा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली होती.

## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार भारत अभिमान आखंड रा. माळेगांव न भटउमरा यांनी मौजे माळेगांव न भटउमरा येथिल गट नं. १०२/१ मधिल क्षेत्र १.३२ हे आरहे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील साधे कुळ कुळ या रकान्यात रायभान जयाजी कुणबी रा. माळेगांव न भटउमरा हि कुळाची नोंद कमी करण्यात यावी असा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

तरी सदर प्रकरणात मौजे माळेगांव न भटउमरा येथिल गट नं. १०२/१ मधिल १.३२ हे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील साधे कुळ कुळ या रकान्यात रायभान जयाजी कुणबी रा. माळेगांव न भटउमरा हि कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत प्रकरणात कोणाचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांका पासून १५ दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक- ३.९.२६
ठिकाण-वाशिम

शिक्का

**तहसिलदार,**
वाशिम

# दापुरा बु. येथील ग्राम रोजगार सेवकाच्या मनमानी कारभाराविरोधात ग्रामस्थ आक्रमक!

## पदमुक्त करण्याची मागणी!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील दापुरा बु येथील ग्राम रोजगार सेवक गोपाळ भगवान पवार यांच्या बेजबाबदार व अरेरावीच्या वर्तणुकीविरोधात समस्त गावकरी मंडळी व मनरेगा व जिराम जी लाभार्थी यांनी गटविकास अधिकारी ज्योती राजपुरोहित यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल करून त्यांना पदमुक्त करण्याची मागणी केली आहे.



ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की, दापुरा बु. येथील ग्राम रोजगार सेवक गोपाळ पवार हा नेहमी लाभार्थींशी अत्यंत उद्धटपणे व अरेरावीची भाषा करतो. लाभार्थ्यांचे घरकुलाचे व सिंचन विहिरीचे मस्टर काढण्यास अडथळा निर्माण करून तो टाळाटाळ करतो. त्याच्या या बेजबाबदार धोरणामुळे लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. कामात दिरंगाई करण्यात तो कुठलेही कायदेशीर व अधिकृत कारण न देता लाभार्थ्यांना विनाकारण त्रास देतो व उडवा उडवीची भाषा करतो. तसेच ग्राम रोजगार सेवक हा हेतू परस्पर काम करतो, लाभार्थ्यांना काम करण्यासाठी पैशाची मागणी करतो, हे कृत्य कर्तव्यात कसूर करणारे आहे. या मुळे लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पंचायत समिती अंतर्गत येणारे इंजिनियर, पी. एम. आवास योजने अंतर्गत गावात येणाऱ्या इंजिनियरला गावात सुरू असलेल्या घरकुलाची स्थिती कोणा प्रकारे आहे हे काम ग्राम रोजगार सेवकाचे असून तो हेतू परस्पर लाभार्थ्यांचे चालू कामाचे माहिती न देता लाभार्थ्यांचे जिओ टॅगिंग द्वारे न होता लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतो. या कारणामुळे ग्राम रोजगार सेवकाला पदमुक्त करण्यात यावे. अशी तक्रार केली आहे. ग्रामस्थांच्या या तक्रारीनंतर पंचायत समिती प्रशासन ग्राम रोजगार सेवकावर काय कारवाई करते, याकडे दापुरा बु. येथील मनरेगा व घरकुल लाभार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

निवेदनावर वैभव गावंडे, शशिकांत पवार, संदीप जाधव, नितीन राठोड, कुंदन पवार, मुकेश जाधव यांच्यासह शेकडो ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३२७ ■ रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# जिल्हा नियोजनमधून दुष्काळ निवारणाची कामे प्राधान्याने पुर्ण करा - पालकमंत्री

## पालकमंत्र्यांकडून दुष्काळ उपाययोजनांचा आढावा, पाणी व चारा टंचाईचे नियोजन करण्याच्या सूचना

### प्रत्येक गावात २०० जलतारा करण्याचे निर्देश

**वर्धा जनमाध्यम :** कमी पर्जन्यमानामुळे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या काळात पिण्याच्या पाण्यासह जनावरांसाठी चारा, सिंचनासाठी पाणी आदी प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा तातडीच्या बाबींवर परिणाम होणार नाही, याकरीता जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून कामे करतांना दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य द्या. कामांची मंजूरी प्रक्रिया आणि प्रत्यक्ष कामे तातडीने पुर्ण करा, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी यांनी दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने उपाययोजनांचा आढावा घेतला. यावेळी आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपवनसंरक्षक हरविर सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, निवासी उपजिल्हाधिकारी राजू रणवीर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये पिककर्ज पुनर्गठन करण्यासोबतच पिककर्जाच्या वसूलीस स्थगिती दिली आहे. विद्यार्थ्यांची शालेय फी माफ करण्यात आली आहे. संबंधित विभागांनी शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

दुष्काळी स्थितीत पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य आहे. जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमध्ये उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पाण्याचे नियोजन करावे. आवश्यक्ता भासल्यास पाणी कपातीचा निर्णय प्रशासनाने घ्यावा. ज्या प्रकल्पांमध्ये पुरेसा साठा उपलब्ध आहे. अशा ठिकाणी पिकांना दोन पाणी पाळ्या देण्याबाबत नियोजन करावे. जिल्ह्यात जनावरांसाठी चारा टंचाई जाणवण्याची शक्यता पाहता



पशुसंवर्धन, कृषी, महसूल व जलसंपदा विभागाने गाळपेर किंवा अन्य ठिकाणी लवकर तयार होणाऱ्या चाऱ्यांची लागवड करावी, असे ते म्हणाले.

काही शेतकरी आपल्या जमीनींवर चाऱ्याची लागवड करण्यास तयार आहे. परंतू त्यांना चारा खरेदीची हमी पाहिजे, अशी बाब पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर यासंबंधीत प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्यात यावा.

पुढील जुलै अखेरपर्यंत चारा टंचाई जाणवणार नाही तसेच शेतकऱ्यांना चारा आधारीत पिके घेण्यासाठी प्रवृत्त करावे. यासाठी आवश्यक बियाण्याचे वाटप करावे. चारा डेपोची ठिकाणे निश्चित करण्यासोबतच जिल्ह्यातील चारा इतर जिल्ह्यात जाणार नाही यासाठी दक्ष राहण्याच्या सूचना केल्या. यावेळी पालकमंत्र्यांनी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी यांच्याकडून तालुकानिहाय पाणी, चारा, सिंचन तसेच एकूनच दुष्काळ व टंचाई निवारणाचा आढावा घेतला. गावे व शहरांना पाणी पुरवठा करणाऱ्या प्रकल्पांमधील सद्यस्थिती जाणून घेतली. टंचाई निवारणासाठी अधिग्रहनासाठी संभाव्य विहिरींची यादी, वनक्षेत्रातील चारा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, मोठ्या ग्रामपंचायतींच्या ठिकाणी पाणी वितरणाचे सुक्ष्म नियोजन करणे, आदींचा आढावा घेतला.

### नाचनगाव, वायगावचा पाणी प्रश्न सोडवा : आ.राजेश बकाने

देवळी विधानसभा मतदारसंघातील नाचनगाव आणि वायगाव येथे पाणी प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. येथील योजना पुर्ण करून पाणी प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी किमान दोन पाणी पाळ्या मिळणे आवश्यक आहे. तसे नियोजन करण्यासोबतच शेतकऱ्यांना पाणी सोडण्यापुर्ण सूचना देण्यात यावी, असे आ.बकाने यांनी यावेळी सांगितले. मतदारसंघातील शहरे व गावांच्या संभाव्य टंचाईचा विषय उपस्थित केला.

### आतापासूनच चारा टंचाईचे नियोजन आवश्यक : आ.सुमित वानखेडे

पाण्याअभावी यावर्षी चारा टंचाईची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. पशुसंवर्धन विभागाने आतापासूनच चारा टंचाई निवारणाचे नियोजन करणे आवश्यक आहे. संभाव्य टंचाईपेक्षा अधिक चारा उत्पादनाचे नियोजन करावे. आष्टी, कारंजा येथील पाणी पुरवठा योजना तसेच मतदारसंघातील तिनही शहरांना होणाऱ्या पाणी पुरवठ्याची माहिती घेतली. कुठेही पाणी, चारा टंचाई जाणवणार नाही, याचे नियोजन करण्याच्या सूचना केल्या. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी जिल्ह्याची टंचाई स्थिती व प्रशासनाच्यावतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. पिण्याच्या पाण्यासह वन्यप्राण्यासाठी पाणी, व्हीबीजीरामजी योजनेतून घेण्यात येणारी कामे, टिल्लू पंपांवर कारवाई, जलजीवनची अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक निधी याबाबत माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी जिल्हा परिषदेच्यावतीने प्रत्येक गावात जलतारा उपक्रमांतर्गत पाणी मुरविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असल्याचे सांगितले.

सेलू शहर समस्यांच्या अंधारात

# वर्षानुवर्षे बंद पथदिवे, अतिक्रमणांचा विळखा अन् पाणीटंचाईचे सावट; नगरपंचायतीचा कारभार चव्हाट्यावर




**सेलू जनमाध्यम :** एकेकाळी सुंदर गावाचा नावलौकिक मिळवणाऱ्या सेलू शहराची सध्या नागरी समस्यांमुळे दयनीय अवस्था झाली आहे. शहरात अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे पथदिवे बंद आहेत. रस्ते खोदून ठेवले असून, अतिक्रमणांचा विळखा वाढत आहे. पार्किंगच्या नियोजनाअभावी वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. त्यातच संभाव्य पाणीटंचाईचे संकट समोर असतानाही पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी ठोस उपाययोजना दिसत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. विकासाचे दावे आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामधील तफावत आता ठळकपणे समोर आली असून, सेलूकरांना मूलभूत सुविधांसाठीही प्रतीक्षा करावी लागत असेल, तर विकास नेमका कोणासाठी? असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांमधील अनेक पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. पथदिव्यांचे खांब उभे असले, तरी त्यावरील दिवे सुरू करण्याकडे संबंधित यंत्रणेचे लक्ष नसल्याची तक्रार आहे. रात्रीच्या वेळी नागरिकांची गैरसोय होत असून, या अंधारातून सुटका कधी होणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. सुंदर गावाचे पुरस्कार मिळविणाऱ्या शहरात मूलभूत सुविधांची ही अवस्था असेल, तर पुरस्कारांच्या दाव्यांचा उपयोग काय, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.

शहरात ठिकठिकाणी अतिक्रमणे वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. काही ठिकाणी पक्की बांधकामे उभी राहत असतानाही त्यावर प्रभावी नियंत्रण दिसत नसल्याचा आरोप होत आहे. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना उभी केली जाणारी वाहने आणि दुकानांसमोरील वाहनांच्या रांगांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत. पादचाऱ्यांनाही सुरक्षितपणे चालणे कठीण झाले आहे. अतिक्रमण हटविणे, पार्किंगचे नियोजन करणे आणि वाहतुकीला शिस्त लावणे यासाठी प्रशासन ठोस पावले उचलणार की नाही, हा प्रश्न कायम आहे.

शहरातील या समस्यांवर स्थानिक पातळीवरच तोडगा निघणे अपेक्षित असताना नागरिकांना वारंवार तक्रारी कराव्या लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. शहरात राजकीय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची संख्या कमी नसली, तरी नागरी प्रश्नांवर ठोस पाठपुरावा होत नसल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. स्थानिक प्रशासनाच्या कामकाजावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे की नाही, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

# महिलांच्या सात योजनांना कात्री : चार गुंडाळल्या तीन बंद होणार ?

## लाडक्या बहिणींना १५०० रुपये, पण इतर महिलांच्या योजनांना टाळे

**वर्धा जनमाध्यम :** महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा करायच्या, लाडक्या बहिणींच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा करण्याची योजना पुढे चालवायची आणि दुसरीकडे गरजू महिला, मुली व संकटग्रस्त बालकांना आधार देणाऱ्या कल्याणकारी योजनांवर कात्री चालवायची, हा विरोधाभास नेमका कशासाठी? महिला व बालविकास विभागाच्या सात योजनांबाबत समोर आलेल्या निर्णयांच्या वृत्तामुळे राज्य सरकारच्या महिला कल्याणविषयक धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यातील चार योजना १६ ऑक्टोबर २०२६ पासून बंद करण्यात आल्याचे वृत्त असून, अन्य योजनाही टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया प्रस्तावित असल्याचे सांगितले जात आहे.

**चार योजनांना तात्काळ टाळे**

महिलांसाठी बहुउद्देशीय सामाजिक केंद्रे, जिल्हा परिषदांमार्फत महिला मंडळांना दिले जाणारे अनुदान, देवदासींच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक मदत आणि वीज नसलेल्या अंगणवाड्यांसाठी सौरऊर्जा संच उपलब्ध करून देण्याच्या योजनांना बंद करण्याचा निर्णय झाल्याचे वृत्त आहे.

बहुउद्देशीय सामाजिक केंद्रांवर सातत्याने कमी खर्च होत असल्याचे कारण पुढे करण्यात आले आहे. महिला मंडळांच्या अनुदान योजनेला पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले जाते. देवदासींच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक मदतीची मागणी कमी असल्याचे कारण देण्यात आले आहे. तर अंगणवाड्यांसाठी सौरऊर्जा संच




बसविण्याची योजना बंद करण्यामागे वीजजोडणी आणि वीजबिलासाठी उपलब्ध तरतुदीचा मुद्दा पुढे करण्यात आला आहे.

मात्र, योजनांवर खर्च कमी झाला किंवा लाभार्थ्यांची मागणी अपेक्षेपेक्षा कमी राहिली, तर त्या बंद करणे हाच एकमेव पर्याय आहे काय? गरजू लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविण्यासाठी प्रशासनाने किती प्रयत्न केले, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

**आणखी तीन योजनांच्या भवितव्यावर टांगती तलवार**

निवारागृहे चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना दिले जाणारे आर्थिक साहाय्य आणि कोरोना काळात अनाथ झालेल्या बालकांना मदत देणाऱ्या योजनांसह अन्य एका योजनेच्या भवितव्याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. या योजना २०२७-२८ पर्यंत टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना भविष्यात आर्थिक आधार मिळणार की नाही, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

निवारागृहांमधील गरजू व्यक्ती आणि आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या बालकांसाठी आर्थिक मदत ही केवळ सरकारी तरतूद नसते, तर ती त्यांच्या जगण्याचा आधार असते. अशा योजनांच्या भवितव्याबाबत निर्णय घेताना सामाजिक परिणामांचाही विचार होणे आवश्यक आहे.

**लाडकी बहीण योजना सुरूच**

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद करण्यात आलेली नसून ती सुरूच आहे. या योजनेतून पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. दुसरीकडे इतर महिला कल्याणकारी योजनांमध्ये बदल होत असल्याच्या वृत्तामुळे सरकारच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमावर चर्चा सुरू झाली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील कोणतीही सरकारी योजना बंद होणार नसल्याचे सांगितल्याचे वृत्त आहे. दुष्काळ निवारणासाठी अनावश्यक खर्च टाळून निधी उपलब्ध करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केल्याचे नमूद आहे.

मात्र, एका बाजूला योजना बंद झाल्याचे वृत्त आणि दुसऱ्या बाजूला कोणतीही योजना बंद होणार नसल्याचा खुलासा, यामुळे संभ्रम वाढला आहे. संबंधित योजनांचे शासन निर्णय, बंद करण्याची कारणे आणि लाभार्थ्यांवरील परिणाम याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

**कोणत्या योजनांना लागली कात्री**

१) माझी कन्या भाग्यश्री योजना
२) महिलांसाठी बहुउद्देशीय सामाजिक केंद्रे
३) महिला मंडळांना अनुदान
४) देवदासींच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी साह्य
५) वीज नसलेल्या अंगणवाड्यांसाठी सौरऊर्जा संच
६) निवारागृह चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना साह्य
७) करोनामुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी मदत

# राज्यातील २.५० लाख युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराची संधी

## राज्याच्या महत्वाकांक्षी उपक्रमात वर्धा जिल्ह्याचा समावेश

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील युवकांना उत्तम दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्न करत आहे. मॅजिक बस फाउंडेशनच्या सहयोगाने राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. वर्धा जिल्ह्याचा यात समावेश असल्याने जिल्ह्यातील युवकांना प्रशिक्षणासह रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या सामाजिक दायित्व निधीअंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपक्रमात ज्या सात जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे, त्यात वर्धा जिल्ह्यासह नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, नाशिक आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश आहे. या सात जिल्ह्यांमधील २ लाख ५० हजाराहून अधिक वंचित युवकांपर्यंत पुढील पाच वर्षांत पोहोचून त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या या उपक्रमामध्ये जीवन कौशल्ये, रोजगारक्षमतेचे प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि रोजगाराशी जोडणी यांचा एकात्मिक समावेश आहे. महिलांचा श्रमशक्ती सहभाग वाढविणे, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे, ग्रामीण उद्योजकता वाढविणे तसेच पदवीधर युवकांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे या शासनाच्या प्राधान्यक्रमांशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे या उपक्रमास वर्धा जिल्ह्याशी जोडतांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी आवश्यक सहकार्य विभागामार्फत करण्यात येईल. तसेच निधीचे अभिसरण आणि औपचारिक सामंजस्य करार करण्यासाठीही आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यामुळे जिल्ह्यातील हजारो होतकरू युवकांना चांगले प्रशिक्षण तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याने हा उपक्रम जिल्ह्यासाठी महत्वाचा ठरणार आहे.

# पाणीगळती रोखता येत नाही, मग गरिबांच्या बांधकामांवर बंदी का

**वर्धा जनमाध्यम :** शहरात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्याबरोबरच पाण्याची गळती रोखणे आणि वितरणातील अपव्यय थांबवणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र, पाणीटंचाईच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांच्या घरकुलांची आणि लहान-मोठ्या बांधकामांची कामे बंद करण्याचा विचार होत असल्याची माहिती समोर येत आहे. प्रशासनाच्या या संभाव्य भूमिकेमुळे गरिबांच्या घरांच्या स्वप्नांवरच गदा येणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

एकीकडे वर्षानुवर्षे कष्ट करून पै-पै जमवणारा सामान्य माणूस स्वतःच्या हक्काच्या घरासाठी धडपडत आहे. कोणी कर्ज काढून, तर कोणी आयुष्यभराची बचत खर्च करून घर उभारण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे. अशा वेळी बांधकामांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्यास या नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता आहे. मात्र, शहरातील पाणीगळती रोखण्यासाठी किती प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत, पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती कुठे आणि किती आहे, पाण्याची नासाडी थांबविण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली जात आहेत, असे प्रश्नही ऐरणीवर आले आहेत.

# रुग्णांची आर्थिक लूट थांबणार, खासगी रुग्णालयांना दरपत्रक सक्तीचे

**वर्धा जनमाध्यम :** रुग्णालयात उपचारासाठी गेल्यानंतर आजाराच्या वेदनांसोबतच अवाढव्य बिलांचा आर्थिक भार सहन करण्याची वेळ अनेक रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांवर येते. उपचारांचे दर किती, कोणत्या सुविधेसाठी किती शुल्क आकारले जाणार आणि बिलात कोणते अतिरिक्त शुल्क जोडले जाणार, याची स्पष्ट माहिती अनेकदा मिळत नसल्याने रुग्णांची आर्थिक कोंडी होते. या पार्श्वभूमीवर खासगी रुग्णालयांच्या शुल्क आकारणीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील सर्व नोंदणीकृत खासगी रुग्णालये आणि वैद्यकीय संस्थांना उपचार, वैद्यकीय सेवा व उपलब्ध सुविधांचे दरपत्रक ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या अर्धशासकीय पत्राच्या अनुषंगाने हे निर्देश देण्यात आले आहेत. दरपत्रक प्रदर्शित न करणे किंवा संबंधित नियमांचे उल्लंघन करणे रुग्णालयांना महागात पडू शकते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# केंद्रप्रमुखांचे तीन महिन्यांचे वेतन थकीत, पालकमंत्री भोयर धावले मदतीला

**समुद्रपूर जनमाध्यम :** दिवाळीचा सण तोंडावर आला आहे. घराघरांत आनंदाची तयारी सुरू आहे. बाजारपेठा सजल्या आहेत. मात्र, शैक्षणिक व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असलेल्या केंद्रप्रमुखांच्या घरात मात्र आर्थिक विवंचनेचे सावट पसरले आहे. सलग तीन महिन्यांपासून वेतन रखडल्याने सण साजरा करायचा कसा, असा प्रश्न केंद्रप्रमुखांसमोर उभा ठाकला आहे. या गंभीर प्रश्नाची पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी तातडीने दखल घेतली.

दसरा आणि दिवाळी हे आनंदाचे सण. मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी, कुटुंबीयांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि सणाचा खर्च भागविण्यासाठी प्रत्येक जण आर्थिक नियोजन करतो. मात्र, हातातच वेतन नसेल तर या आनंदावर विरजण पडणारच. त्यातच बँकेच्या कर्जाचे हप्ते थकल्यास विलंब शुल्क आणि दंडाचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. कर्तव्य



बजावूनही स्वतःच्या हक्काच्या वेतनासाठी प्रतीक्षा करण्याची वेळ केंद्रप्रमुखांवर आली आहे. केंद्रप्रमुखांच्या या व्यथा शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघटनेच्या वतीने पालकमंत्री डॉ. भोयर यांना निवेदन देण्यात आले. केंद्रप्रमुखांचे वेतन नियमित करावे, निधी वेळेत उपलब्ध करून द्यावा आणि भविष्यात वेतन रखडणार नाही, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. निवेदनाची दखल घेत डॉ. भोयर यांनी प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत रखडलेले वेतन तातडीने अदा करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे केंद्रप्रमुखांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आता दिवाळीपूर्वी वेतन प्रत्यक्ष खात्यात जमा होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी संघटनेचे पदाधिकारी वसंत खोडे, रवींद्र राठोड, विनोद पालवे, विनोद महाजन, मुकुंद बोराडे आणि करुणा शंभरकर उपस्थित होते.

# हिंदी विद्यापीठात राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे आयोजन

## लोकशाहीची मुळे मजबूत करण्यात युवकांची महत्त्वपूर्ण भूमिका : प्रा. कुमुद शर्मा

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथे भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांनी लोकशाहीची मुळे मजबूत करण्यात युवकांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन केले. युवक हे राष्ट्राच्या विकासाचा कणा आहेत, असेही त्या म्हणाल्या.

शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या कस्तुरबा सभागृहात कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली १८ वी गटस्तरीय राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या गट सहाचे समन्वयक आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील प्रा. प्रल्हाद माने उपस्थित होते. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ लॉचे संचालक प्रा. रविशंकर मोरे यांची विशेष उपस्थिती होती.

या स्पर्धेत विद्यापीठाच्या विविध विभागांतील ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि संसदेतील विविध पदांची भूमिका साकारली.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना कुलगुरू प्रा. शर्मा म्हणाल्या की, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यात विद्यार्थ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. विकसित भारताच्या निर्मितीसाठी त्यांनी योगदान द्यावे. युवा संसदेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर निर्भीडपणे मांडलेली मते आणि



त्यांची तार्किक विचारक्षमता यांचे त्यांनी कौतुक केले. स्पर्धेत सहभागी झालेल्या ५५ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थिनींचा सहभाग हा 'नारी शक्ती वंदन'च्या मूलभावनेचे प्रतीक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रा. प्रल्हाद माने आणि प्रा. रविशंकर मोरे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. शिक्षण, आरोग्य, क्रीडा, बेरोजगारी, महागाई आणि शेतकऱ्यांच्या समस्यांसारखे महत्त्वाचे विषय मांडून विद्यार्थ्यांनी आपली क्षमता, प्रतिभा आणि वक्तृत्वशैली सिद्ध केल्याचे त्यांनी सांगितले. युवा संसदेत अनिवार्य मतदान विधेयक सभागृहात मांडण्यात आले आणि त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय युवा संसदेत ५५ विद्यार्थ्यांनी ५५ मिनिटे भारत सरकारच्या विविध योजनांवर ठामपणे आपली मते मांडली. विविध विषयांवरील चर्चा, शून्य प्रहर, शपथविधी आणि शोकप्रस्ताव अशा संसदीय कामकाजाच्या माध्यमातून संसदेच्या कार्यपद्धतीचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमात पाहुण्यांचे शाल, सूतमाला, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. युवा संसदेचे संयोजक तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. बालाजी चिरडे यांनी स्वागतपर भाषण केले. अनुवाद अध्ययन विभागाच्या सहायक प्राध्यापिका डॉ. मीरा निचळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली, तर समारोप राष्ट्रीय गीत वंदे मातरम् ने व राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय


# पंतप्रधानांच्या 'मन की बात'साठी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना सक्ती

## अनुपस्थित राहिल्यास भाजप आमदार कार्याध्यक्ष असलेल्या संस्थेचा दंडाचा इशारा

**चंद्रपूर/प्रतिनिधी-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे प्रक्षेपण पाहण्यासाठी विद्यार्थिनींना सक्ती, अनुपस्थित राहिल्यास दंडाचा इशारा आणि त्यातही केवळ मुलींचीच निवड! चंद्रपूरच्या शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालयाशी संबंधित या सूचनेमुळे शैक्षणिक वर्तुळात नव्या वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. लोकशाहीत विचार ऐकण्याचे स्वातंत्र्य महत्त्वाचे मानले जाते; मात्र एखादा कार्यक्रम ऐकण्यासाठी उपस्थिती अनिवार्य करून त्यावर दंडाची अट घालण्यामागील तर्क काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

चंद्रपूरचे आमदार तथा सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष किशोर जोरगेवार यांनी रविवारी (२५ ऑक्टोबर) सकाळी १० वाजता आपल्या कार्यालयात 'मन की बात' कार्यक्रमाच्या विशेष प्रक्षेपणाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालयातील केवळ विद्यार्थिनींनाच उपस्थित राहण्याची सूचना देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या गणवेशात उपस्थित राहावे, असेही निर्देश देण्यात आले आहेत. महाविद्यालय प्रशासनाने यासंदर्भात सूचना जारी केली असून, विद्यार्थिनींना पाठविण्यात आलेल्या संदेशातून उपस्थिती अनिवार्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यक्रमाला गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थिनींना दंड आकारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आल्याचे समजते. त्यामुळे हा उपक्रम पंतप्रधानांच्या कार्यक्रमाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आहे की विद्यार्थिनींच्या उपस्थितीची सक्ती करण्यासाठी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



**नेमका कोणता शैक्षणिक उद्देश?**

पंतप्रधानांचा कार्यक्रम ऐकणे किंवा पाहणे हा ऐच्छिक सहभागाचा विषय असताना त्यासाठी दंडाची अट घालण्याची आवश्यकता का भासली? विद्यार्थिनींना कार्यक्रमाचे महत्त्व पटवून देण्याऐवजी उपस्थितीची सक्ती करण्याची गरज का पडली? आमदारांच्या कार्यालयात होणाऱ्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विद्यार्थिनींची उपस्थिती अनिवार्य करण्यामागे नेमका कोणता शैक्षणिक उद्देश आहे? असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

**केवळ मुलींनाच निमंत्रण-** या प्रकरणातील आणखी एक लक्षवेधी बाब म्हणजे कार्यक्रमासाठी केवळ विद्यार्थिनींचीच निवड करण्यात आली आहे. महाविद्यालयात विद्यार्थी आणि विद्यार्थिनी दोघेही शिक्षण घेत असताना या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वगळण्यामागे कोणता निकष लावण्यात आला, हा निर्णय नेमका कोणी घेतला आणि त्यामागील भूमिका काय, असेही प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

**सहभागासाठी सक्ती आणि दंडाचा आधार**

विद्यार्थ्यांना विविध सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक विषयांची माहिती मिळावी, यासाठी उपक्रम राबविणे निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, अशा सहभागासाठी सक्ती आणि दंडाचा आधार घेतला जात असेल, तर त्याच्या औचित्याबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विचार ऐकण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि तो ऐकण्यासाठी विद्यार्थ्यांना दंडाच्या धाकाने बोलावणे, या दोन बाबींतील फरक महत्त्वाचा आहे अशी प्रतिक्रिया विद्यार्थी व्यक्त करत आहेत. आता या सूचनेमागील भूमिका काय, विद्यार्थिनींची उपस्थिती सक्तीची करण्याचा निर्णय कोणी घेतला आणि अनुपस्थितीबद्दल दंड आकारण्याचा आधार कोणता असेही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री स्व.शांताराम पोटदुखे यांची ही संस्था असून तिथे आता अशा प्रकारची सक्ती केली जात आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी विद्याथीनींना कुठल्याही प्रकारची सक्ती केलेली नाही. विद्यार्थीनी कार्यक्रमाला उपस्थित राहत नसल्यामुळेच असे संदेश लिहून द्यावे लागतात. त्यामुळेच हा संदेश देण्यात आलेला आहे. तीन दिवसांपूर्वी संस्थेचे कार्याध्यक्ष तथा स्थानिक आमदार महाविद्यालयात येवून गेले. त्यानंतर विद्यार्थीनींना कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे.

**-डॉ.पूर्णेंदू कार,** प्रभारी प्राचार्य, शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपूर

# आ.अनंत सिंह यांची जेडीयूमधून हकालपट्टी

## राजकारणात खळबळ, नितीश कुमारांनी का घेतला हा निर्णय?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**गेल्या काही महिन्यांपासून बिहारच्या राजकारणात मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. यातच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.



जनता दल युनायटेड पक्षाने मोकामाचे आमदार अनंत सिंह आणि त्यांच्या पत्नी नीलम देवी यांची पक्षातून ६ वर्षांसाठी हकालपट्टी केली आहे. त्यामुळे बिहारच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

जनता दल युनायटेड पक्षाचे अधिकृत उमेदवार नीरज कुमार यांच्याविरोधात प्रचार करणं आणि पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत नितीश कुमार यांच्या आदेशानंतर आमदार अनंत सिंह यांच्यावर पक्षातून हकालपट्टीची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे बिहारमधील सत्ताधारी एनडीएत मोठी खळबळ उडाली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.बिहार विधान परिषद निवडणुकीत पाटणा पदवीधर मतदारसंघात 'जन सुराज'चे उमेदवार अनुज सिंह यांना पाठिंबा देत अनंत सिंह यांनी जनता दल युनायटेड पक्षाचे अधिकृत उमेदवार नीरज कुमार यांच्या विरोधात प्रचार केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. त्यानंतर जनता दल युनायटेड पक्षाने त्यांच्यावर ही कारवाई केल्याची माहिती सांगितली जात आहे.

**विधानसभा सदस्यत्व रद्द करण्याची अध्यक्षांकडे मागणी-** जनता दल युनायटेडचे प्रदेशाध्यक्ष उमेश सिंह कुशवाह यांनी जारी केलेल्या एका निवेदनात आमदार अनंत सिंह यांच्यावर पक्षाच्या सूचनांचं वारंवार उल्लंघन केल्याचा आणि पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाबाबत अपमानकारक भाषेचा उल्लेख केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# सावरकरांनी महात्मा गांधींच्या हत्येचा निषेध केला होता

## नातेवाईकांची पुणे न्यायालयात माहिती

**पुणे/प्रतिनिधी-** पुण्यातील विशेष खासदार/आमदार न्यायालयातील उलटतपासणीदरम्यान विनायक दामोदर सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी सांगितले की, विनायक सावरकरांनी कधीही महात्मा गांधींच्या हत्येचे समर्थन केले नाही. उलट त्यांनी त्यांच्या हत्येचा निषेध केला होता. सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात फौजदारी अब्रुनुकसानीचा दावा दाखल केलेला आहे. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान त्यांनी हा दावा केला. लाईव्ह लॉ या संकेतस्थळाने याबद्दलचे सविस्तर वृत्त दिले आहे.



राहुल गांधी यांनी लंडन येथील एका भाषणात स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी बदनामीकारक विधाने केल्याचा आरोप करत सात्यकी सावरकर यांनी पुण्यातील न्यायालयात अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला आहे. या खटल्यात राहुल गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद पवार यांनी १४ ऑक्टोबर रोजी सात्यकी सावरकर यांची उलटतपासणी घेतली.

उलटतपासणीदरम्यान ॲड. पवार यांनी, 'गोपाळ गोडसे, नथुराम गोडसे आणि विनायक दामोदर सावरकर यांचे वारसदार म्हणून तुम्ही महात्मा गांधींच्या हत्येचे समर्थन करता का?' असा थेट सवाल उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना सात्यकी म्हणाले, 'नाही, मी महात्मा गांधींच्या हत्येचे अजिबात समर्थन करत नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही गांधीजींच्या हत्येचा निषेध केला होता. सावरकरांचे गांधीजींच्या काही राजकीय विचारांशी व तत्त्वांशी मतभेद होते, हे खरे असले तरी त्यांची हत्या व्हावी अशी सावरकरांची कधीही भूमिका नव्हती.'

उलटतपासणीदरम्यान ॲड. पवार यांनी गांधी हत्या प्रकरणाशी संबंधित विविध संदर्भ मांडले. गांधी हत्येची शिक्षा भोगून आल्यानंतर गोपाळ गोडसे आणि सिंधू गोडसे यांनी दिलेल्या मुलाखतींचा संदर्भ देत, त्या माध्यमातून हिंदू-मुस्लिम समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला का, अशी विचारणा केली. मात्र, आजी-आजोबांनी दोन समाजांत तेढ निर्माण करण्याच्या हेतूने कोणतीही मुलाखत दिली नव्हती, असे सात्यकी यांनी स्पष्ट केले. गांधी हत्या कटाची चौकशी करणाऱ्या न्या. जीवनलाल कपूर आयोगाच्या अहवालात सावरकरांचा नामोल्लेख असल्याचा मुद्दा उपस्थित केला असता, सात्यकी म्हणाले, 'कोणताही आयोग हा न्यायालयापेक्षा मोठा नसतो आणि कपूर आयोगही त्याला अपवाद नाही. याशिवाय कपूर आयोगाचा अहवाल तत्कालीन सरकारने स्वीकारला नव्हता. तसेच गांधी हत्या प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या मूळ निकालाला सरकारने कोणत्याही वरिष्ठ न्यायालयात आव्हान दिले नव्हते.'

# १५ वर्षांपर्यंतच्या मुलांच्या मोबाईल वापरावर बंदी आणावी-नितीश भारद्वाज यांची मागणी

**नागपूर/प्रतिनिधी-** मुलांमध्ये वाढणारे मोबाईलचे व्यसन आणि रिल्स पाहण्याची सवय यावर नेहमीच चिंता व्यक्त केली जात आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी दाऊदी बोहरा समाजाने १५ वर्षांखालील मुलांवर मोबाईल बंदी घातली आहे. या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असताना शनिवारी 'महाभारत' या गाजलेल्या मालिकेतील श्रीकृष्णाची भूमिका बजावणारे अभिनेते नितीश भारद्वाज यांनी या मुद्द्याला हात घातला.द साऊथ पब्लिक स्कूलद्वारे आयआयएम येथील सभागृहात आयोजित नवव्या आंतरराष्ट्रीय मुख्याध्यापक शैक्षणिक परिषदेच्या समारोप समारंभात अभिनेते नितीश भारद्वाज यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सर्वोत्तम नचिकेता पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात शिक्षण प्रणालीत दोन महत्त्वाचे बदल सुचवले. १५ वर्षांपर्यंतच्या मुलांना स्मार्ट फोन वापरावर बंदी आणावी, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांना केली. याशिवाय शाळेत ए फॉर ॲप्पल नको तर ए फॉर आर्यभट शिकवावे. आर्यभट यांनी शून्य दिल्याचे मुलांना माहिती होईल. याशिवाय बी फॉर बॅट नव्हे भास्कराचार्य शिकवावे. त्यांनी पहिल्यांदा गुरुत्वाकर्षण



सांगितले. न्यूटन यांनी नाही, असा दावाही त्यांनी केला. अभ्यासक्रमातून शिकवण्याची ही पद्धत महाराष्ट्रातून सुरू करावी. या प्रणालीसह शिक्षणासाठी महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सध्या संयुक्त कुटुंब पद्धती संपुष्टात आल्याने शाळांवर अधिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोबाईलमध्ये गुंतलेल्या विद्यार्थ्यांबाबत चिंता व्यक्त केली. परंतु मोबाईलचा वापर कसा करावा, यावर त्यांनी प्रकाश टाकला. ते म्हणाले, आज विद्यार्थी मोबाईलमध्ये एवढा गुंतला की त्याचा एकाग्रतेचा कालावधी कमी झाला आहे. त्यांचाच नव्हे तर आपलाही एकाग्रतेचा कालावधी कमी झाला आहे. आज येथे बसलेले अनेकजण इन्स्टाग्रामवर ४५ सेकंदांच्या रिल बघतात. त्यांना आता सवय झाली. ते यु ट्यूबवर एखादी आवश्यक माहिती १५ मिनिटे बघू शकत नाही. ४५ सेकंद बघितले की लगेच आपण पुढे जातो, हे चुकीचे आहे. हेच आपण दुसऱ्या बाजूने बघितले तर इन्फ्लूअन्सर्स एखादी ३० तासाची गोष्ट ४५ सेकंदात सरळ सोप्या भाषेत समजावून सांगतात, हे त्यांचे कौशल्य आहे. यातून तुमच्या वेळेची बचत होते. त्यामुळे त्याला नकारण्याची गरज नाही. परंतु त्याचा वापर कसा करावा, याचा विचार करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

# कारची दुचाकीसह ड्रायव्हिंग स्कूलच्या वाहनाला धडक; एक ठार, एक जखमी

**यवतमाळ** : शहरातलगत राष्ट्रीय महामार्गावरच्या गोदणी चौफूली येथे कारने दोन वाहनांना धडक दिली. यात दुचाकीस्वार विद्यार्थी जागीच ठार झाला तर दुसरा गंभीर जखमी आहे. त्यानंतर ही कार ड्रायव्हींग स्कुलच्या वाहनावर जाऊन धडकली. हा थरार शनिवारी सायंकाळी घडला. धडक देणाऱ्या कार मधून पाच जण नागपूर येथे जात असल्याची माहिती आहे. रुद्रांश विरेंद्र शुक्ला (१५, रा. चापनवाडी, यवतमाळ) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तर त्याचा वर्ग मित्र राम जयंत ठाकरे (१५) हा गंभीर जखमी आहे. यांच्यासह इतर दोन मित्र दोन असे चार जण दोन दुचाकीवरून गोदणी परिसरातील रेल्वे ट्रॅकवर फिरण्यासाठी गेले होते. तेथून परत येत असताना रुद्रांश चालवित असलेल्या इलेक्ट्रिक दुचाकीला (क्र. एमएच २९ सीएफ ५४६४) गोदणी चौफुलीवर आर्णीकडून नागपूर जात असलेल्या कारने (क्र. एमएच ३१ एफयु ५४६६) जोरात धडक दिली. नंतर पुढे ही कार कदम ड्रायव्हिंग स्कूलच्या वाहनावर जाऊन धडकली. हा थरार पाहून इतर नागरिक घटनास्थळी थांबले. त्यांनी जखमीला तातडीने उपचारासाठी हलविण्याकरता डायल ११२ व १०८ रुग्णवाहिकेला संपर्क केला. मात्र अर्धा ते पाऊन तास कोणीच तेथे पोहोचले नाही. इतर दोन विद्यार्थ्यांनी अपघातात जखमींच्या कुटुंबीयांचे संपर्क क्रमांक दिल्यावर उपस्थितांनी कुटुंबीयांना अपघाताची माहिती दिली. त्यानंतर जखमी राम ठाकरे याला शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी नागपूर येथे हलविण्याचा सल्ला दिला.

# नीट पेपरफुटी: मोटेगावकर यांच्या फोनमध्ये सापडलेले केमिस्ट्रीचे सर्व ४५ प्रश्न मुख्य परीक्षेतील प्रश्नांशी तंतोतंत जुळले!

**पुणे/प्रतिनिधी-** नीट पेपरफुटी प्रकरणात दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. लातूर येथील प्रसिद्ध 'आरसीसी क्लासेस'चे संस्थापक शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेच्या केमिस्ट्री विषयाचे सर्वच्या सर्व ४५ प्रश्न जसेच्या तसे आढळल्याची खळबळजनक माहिती केंद्रीय अन्वेषण विभागाच्या तपासातून उघड झाली आहे. दिल्ली विद्यापीठाच्या तज्ज्ञांच्या अहवालानंतर सीबीआयने दाखल केलेल्या पुरवणी चार्जशीटमध्ये ही माहिती समोर आली आहे. 'द इंडियन एक्सप्रेस'ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे.

सीबीआयच्या तपासादरम्यान नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार, नीट परीक्षेसाठी प्रत्येकी १८० प्रश्नांचे चार 'मास्टर सेट' तयार केले जातात. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्राच्या प्रश्नांचा समावेश असतो. या चारपैकी दोन संचांची छपाई करून ते परीक्षा केंद्रांवर वितरीत केले जातात. २०२६ च्या परीक्षेसाठी 'कैलास' आणि 'शिवालिक' हे दोन प्रशासकीय कोडनाव असलेले संच वापरण्यात आले होते.

**व्हॉट्सप, टेलिग्राम आणि एअरड्रॉपद्वारे गैरप्रकार**

तपासादरम्यान स्पष्ट झाले आहे की, परीक्षेपूर्वीच व्हॉट्सप, टेलिग्राम आणि एअरड्रॉपच्या माध्यमातून ही प्रश्नपत्रिका आणि त्याशी संबंधित साहित्य पसरवण्यात आले होते. सीबीआयने या प्रकरणी साक्षीदारांचे जबाब, हस्तलिखित नोट्स आणि पैशांच्या देवाणघेवाणीचे संदेश तपासून संपूर्ण साखळीचा पर्दाफाश केला आहे.दिल्लीच्या जलद गती न्यायालयात २८ जुलै रोजी दाखल करण्यात



आलेल्या पुरवणी चार्जशीटमध्ये १३ जणांना आरोपी करण्यात आले आहे. यामध्ये एनटीएच्या बायोलॉजी तज्ज्ञ मनीषा मंधारे, केमिस्ट्री तज्ज्ञ प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी आणि फिजिक्स तज्ज्ञ मनीषा संजय हवालदार यांच्या नावांचा समावेश आहे.

**सराव परीक्षेच्या नावाखाली मुख्य प्रश्नांचा सराव-** आरसीसी क्लासेसच्या विद्यार्थ्यांकडून जप्त करण्यात आलेल्या 'मॉक टेस्ट'च्या (सराव परीक्षा) प्रश्नपत्रिका दिल्ली विद्यापीठाच्या तज्ज्ञांकडे तपासणीसाठी पाठवण्यात आल्या होत्या. सीबीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार:१९ एप्रिल रोजी घेतलेल्या मॉक टेस्टमध्ये 'कैलास' मास्टर सेटमधील १५ प्रश्न जसेच्या तसे घेण्यात आले होते. ३० एप्रिलच्या मॉक टेस्टमध्ये 'शिवालिक' सेटमधील ६ प्रश्न आणि दुसऱ्या सेटमधील ५ प्रश्न समाविष्ट होते.तसेच आरोपी शिक्षक पी. व्ही. कुलकर्णी यांच्या फोनवरून ११ एप्रिल ते २९ एप्रिल दरम्यान जप्त करण्यात आलेल्या १३ प्रश्नांच्या इमेज तज्ज्ञांच्या अहवालानुसार चारही मास्टर सेटशी जुळल्या आहेत.

**पैशांची देवाणघेवाण कशी झाली?-** तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, जयपूर येथील आरोपी विकास बिवल याला ५,००० रुपयांची आगाऊ रक्कम देण्यात आली होती. यानंतर १ मे च्या आसपास टेलिग्राम आणि व्हॉट्स?पच्या माध्यमातून शेकडो प्रश्नांच्या पीडीएफ फाईल्स फॉरवर्ड करण्यात आल्या. मोटेगावकर यांच्या नावाने आलेली केमिस्ट्री विषयाची पीडीएफ व्हॉट्सपवर मोठ्या प्रमाणात शेअर करण्यात आल्याची पुष्टी एका साक्षीदाराने सीबीआयसमोर केली आहे. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या या रॅकेटचा सीबीआय कसून तपास करत असून, आगामी काळात आणखी काही बड्या हस्ती अडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# जर्मन शिका, हजारो नोकऱ्या तुमच्यासाठी वाट बघत आहेत!

## केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांचे आवाहन

**बर्लिन/वृत्तसंस्था:** जर्मनीमध्ये सध्याच दहा हजाराहून अधिक भारतीय नर्सेस काम करत आहेत. येत्या पाच वर्षात परिचारिकांची मोठी मागणी राहणार आहे सध्याच इथे ५० हजार परिचारिकांची कमतरता आहे. त्यामुळे जर्मन भाषा शिका आणि चांगल्या पगाराची नोकरी मिळवा अशा शब्दात केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी भारतीयांसाठी परदेशी नोकरीच्या अनेक संधी असल्याचे स्पष्ट केले.



जर्मनीचा दौरा संपवून नेदरलँड कडे रवाना होण्यापूर्वी त्यांनी संवाद साधला. हस्तकला, हातमाग, पाककला आणि पर्यटन यांसारख्या क्षेत्रांत भारताला जागतिक नेतृत्वाची संधी तर आहेच, शिवाय आरोग्य क्षेत्रातील डायग्नोस्टिक्स, लॅब टेक्निशियन आणि रेडिओलॉजी यांसारख्या क्षेत्रांतही मोठी मागणी आहे. येत्या पाच ते सहा वर्षांत या क्षेत्रांमध्ये आणखी ५० ते ६० हजार कर्मचाऱ्यांची गरज जर्मनीला भासणार आहे. त्यामुळे भारतासाठी हे एक महत्त्वाचे क्षेत्र ठरू शकते. जर्मनीतील साठ वर्ष वयापेक्षा जास्त लोकांची संख्या ३१ टक्के पेक्षाही पुढे गेली आहे त्याचा भारताला कसा उपयोग होणार? असा प्रश्न केला असता मंत्री गोयल म्हणाले, भारताला अमाप संधी आहेत. कुशल तरुण, तांत्रिक प्रशिक्षण घेतलेले मनुष्यबळ, केअरगिव्हर्स आणि नर्सेस यांच्यासाठी जर्मनीत संधी उपलब्ध आहेत. मात्र जर्मनीत काम करण्याची इच्छा असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांनी जर्मन भाषा आणि संस्कृती शिकावी, असे त्यांनी सांगितले.२०२४ मध्ये जर्मनीने कुशल आणि अर्धकुशल व्यावसायिकांच्या स्थलांतरासाठी भारताला अधिकृतपणे सर्वाधिक पसंतीचा भागीदार देश म्हणून जाहीर केले आहे. असे सांगून भारतीय राजदूत अमेय गुप्ते यांनी यासंबंधीची आकडेवारीच समोर ठेवली. ते म्हणाले, गेल्या दोन वर्षांत जर्मनीतील भारतीय समुदायाची संख्या दरवर्षी सुमारे ६० हजारांनी वाढत आहे. आज जर्मनीत भारतीय नागरिकांची संख्या सुमारे ३ लाख ३२ हजार आहे. आता ही संख्या सुमारे ४ लाखांपर्यंत जाईल. जर्मनीतील मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी विविध देशांमधून परिचारिका आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, भारत हा त्यासाठी सर्वात महत्त्वाचा मनुष्यबळ पुरवठादार देश ठरू शकतो. त्यासाठी अर्थातच आपल्या लोकांकडे संबंधित शैक्षणिक पात्रता आणि कौशल्य असण्याबरोबरच जर्मन भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. यासाठी योग्य व्यवस्था आणि प्रशिक्षणाची चौकट तयार करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत असे यावेळी जर्मनीतील भारताचे राजदूत अमेय गुप्ते यांनी स्पष्ट केले.

# तिलक-नितीशमुळे हरलेला सामना जिंकलो!

## ३० चेंडूत ६९ धावांची भागीदारी, टीम इंडियाची न्यूझीलंडविरुद्ध २-० ने आघाडी

**क्राइस्टचर्च/वृत्तसंस्था-** दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताने न्यूझीलंडला ४ गडी राखून पराभूत केले. या विजयासह भारतीय संघाने ५ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. भारताच्या विजयाचा हिरो तिलक वर्मा होता. १८१ धावांचे लक्ष्य गाठताना भारतीय संघाच्या १४.५ षटकांत ११२ धावांत ६ गडी बाद झाले होते. येथून पुढे तिलक आणि नितीश रेड्डी यांनी सातव्या विकेटसाठी ३० चेंडूंमध्ये ६९ धावांची भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला.तिलकने आपल्या खेळीत २६ चेंडूंचा सामना करत ६ चौकार आणि एक षटकार ठोकला. नितीश रेड्डीने १३ चेंडूंमध्ये २६ धावा केल्या.



**भारताने शेवटच्या षटकात विजय मिळवला-** शेवटच्या षटकात भारताला विजयासाठी ११ धावांची गरज होती. जेकब डफीच्या २० व्या षटकात तिलक वर्माने चौकार मारून २५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. नितीश कुमार रेड्डीने शेवटच्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर दोन धावा काढून भारताला विजय मिळवून दिला. जेकब डफीचा पाचवा चेंडू वाईड होता, त्यामुळे भारताला दोन चेंडूंमध्ये दोन धावांची गरज होती. तिलक वर्मा २६ चेंडूंमध्ये ५१ धावांवर नाबाद राहिला.

**२५ चेंडूंत तिलक वर्माचे अर्धशतक-** तिलक वर्माने २५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने जेकब डफीच्या २० व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेतल्या. तिलकने आतापर्यंत सहा चौकार आणि एक षटकार मारला आहे.१८ षटकांनंतर, नितीश कुमार रेड्डी आणि तिलक वर्मा यांनी जेकब डफीच्या षटकात १७ धावा केल्या. नितीशने पहिल्याच चेंडूवर षटकार मारला, तर तिलकने दोन चौकार मारले. नितीश कुमार रेड्डीने नॅथन स्मिथच्या षटकात १३ धावा केल्या. त्याने षटकाच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारला आणि त्यानंतर सलग तीन चेंडूंवर दुहेरी धावसंख्या उभारली. नितीश ७ चेंडूंमध्ये १४ धावांवर खेळत आहे, तर तिलक वर्मा ९ चेंडूंमध्ये १० धावांवर आहे.

# अंडरवर्ल्डच्या धमक्यांमुळे अभिनेते दहशतीखाली, बॉलिवूड मुंबईबाहेर हलवण्याचे षडयंत्र

**मुंबई/प्रतिनिधी-** मुंबईची शान असणारे बॉलिवूड आणि चित्रपटसृष्टी आता स्वतःचा जीव वाचवण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव मुंबई सोडून इतर राज्यांत किंवा देशाबाहेर स्थलांतर करण्याच्या विचारात आहे, ही महाराष्ट्रासाठी मोठी सांस्कृतिक आणि आर्थिक हानी आहे. एखाद्या तुरुंगात बसून गुंड जर थेट चित्रपटसृष्टीला नियंत्रित करत असतील, तर पोलीस यंत्रणा व महायुती सरकार नेमके करतेय तरी काय? सत्ताधाऱ्यांच्या राजकीय पाठबळाशिवाय गुंडांची एवढी हिंमत वाढणे अशक्य आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. टिळक भवन येथे ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले, 'मुंबईत चित्रपट अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक यांच्यावर खुलेआम हल्ले होत आहेत. धमक्या येत आहेत. टायगर श्रॉफ, सलमान खान, रोहित शेट्टी यांच्यावर हल्ले झाले आणि इतर अभिनेते या माफियांच्या निशाण्यावर असल्याच्या बातम्या येत असून संपूर्ण बॉलिवूड दहशतीखाली वावरत आहे. ऑल इंडियन सिने वर्कर्स असोसिएशनला थेट केंद्राकडे सुरक्षेची मागणी करावी लागणे ही महाराष्ट्राच्या कायदा-सुव्यवस्थेची अत्यंत लाजिरवाणी शोकांतिका आहे. या गंभीर परिस्थितीला महायुतीचे सरकार जबाबदार आहेत. महाराष्ट्राची कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यास हे सरकार पूर्णपणे असमर्थ ठरले आहे.' 'मुंबईतील बॉलिवूड दुसरीकडे घेऊन जाण्याचे मनसुबे लपून राहिलेले नाहीत. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तसे जाहीरपणे सांगितले होते. त्यामुळेच असे हल्ले वाढत आहेत का ? कलाकारांवर गोळीबार होत असताना आणि बॉलिवूड मुंबई सोडून इतर ठिकाणी जाण्याच्या तयारीत असताना, महायुतीने सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. राज्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे जमत नसेल तर तात्काळ राजीनामा द्या, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. शिवसेना ळॅऊ कल्याणचे उपविभाग प्रमुख नसरु शेख यांनी आज काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यांच्यासोबत ठाणे जिल्हा शिवसेना ळॅऊ च्या अल्पसंख्याक आघाडीचे सरचिटणीस अस्लम सोयान, रईस शेख, मोईनुद्दीन शेख, मुस्ताक चौधरी, सानिया अशरफ, सचिन जाधव, साजन गायकवाड यांनीही काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून शुभेच्छा दिल्या.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## गैरव्यवहारांना लगाम

महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजजींवनाचा आणि अर्थकारणाचा पाया शेतजमिनीशी जोडलेला आहे. महसुली दस्तावेजांमधील नोंदी आणि प्रत्यक्ष बांधावरील वास्तव यांतील तफावतीमुळे पिढ्यान पिढ्यांचे दिवाणी खटले, नात्यांमधील वितुष्ट आणि त्यातून उद्‌भवणारे फौजदारी गुन्हे हे एक जुनाट दुखणे ठरले होते. एकाच सात-बारा उताऱ्यावर वारसाहक्काने अनेक खातेदारांची नावे चढलेली असताना, त्यातील एखाद्याने इतरांना अंधारात ठेवून जमिनीचा हिस्सा विकून मोकळे व्हायचे, असे प्रकार सर्रास घडत आले. अशा व्यवहारांनंतर खरेदीदार शेतात जातो आणि तिथे वादाची ठिणगी पडते.शेवटी मूळ सहहिस्सेदार, नवखा खरेदीदार आणि विक्रेता हे सर्व पोलिस ठाणे, महसूल कार्यालये व न्यायालयांच्या फेऱ्यांमध्ये अडकतात. या पार्श्वभूमीवर सामायिक सात-बारा उताऱ्यावरील जमिनींच्या खरेदी-विक्रीसाठी भूमिअभिलेख विभागाची अधिकृत 'क' प्रत सादर करणे अथवा सर्व सहहिस्सेदारांची लेखी संमती जोडणे बंधनकारक करण्याचा निर्णय मालमत्ता हक्कांना सुरक्षित करणारी एक अत्यंत मूलगामी सुधारणा आहे. एखाद्या सामायिक गटात पाच खातेदारांची नावे असतील, तरी कोणाचा भाग कोणत्या दिशेला आहे, हे त्यावरून निष्पन्न होत नाही. याचाच गैरफायदा घेऊन अनेकदा मोक्याची जमीन परस्पर विकली जात असे.दुय्यम निबंधक कार्यालयांची भूमिका दस्तनोंदणी, मुद्रांक शुल्क गोळा करण्यापुरती मर्यादित मानली गेली. त्यामुळे विक्रेत्याचा सात-बारावर हिस्सा दिसला की दस्ताची नोंदणी सहज होत असे. महसूल विभागाच्या नव्या निर्देशांनी या पळवाटेवर आघात केला. आता भूमी अभिलेख विभागाची अधिकृत 'क' प्रत जोडून जमिनीची शासकीय मोजणी व पोटहिस्सा नकाशावर निश्चित करावा लागेल; अन्यथा इतर सर्व भागीदारांचे अधिकृत संमतीपत्र आणि ना-हरकत द्यावी लागेल. मोजणी झाली असेल, तर कोणाच्या संमतीची गरज उरणार नाही आणि मोजणी नसेल तर सहहिस्सेदारांच्या संमतीशिवाय व्यवहार होणार नाही. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गेल्या काही काळात घेतलेल्या निर्णयांची साखळी तपासल्यास हा आदेश महसूल यंत्रणेला लोकाभिमुख, पारदर्शक बनवण्याच्या एका व्यापक आराखड्याचा भाग असल्याचे स्पष्ट होते. तक्रार आल्यावर चौकशी किंवा वाद उद्‌भवल्यावर फेरफार रद्द करणे असे यापूर्वी चालायचे. बावनकुळे यांनी यात गुणात्मक बदल घडवून आणत 'वाद होण्यापूर्वीच त्याची शक्यता नष्ट करणे' हे सूत्र महसूल सुधारणांच्या केंद्रस्थानी आणले.यापूर्वी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम १५५ चा गैरवापर करून 'शुद्धलेखन दुरुस्ती'च्या नावाखाली जमिनींचे बेकायदेशीर फेरफार बदलण्याचे मोठे रॅकेट त्यांनी उघडकीस आणले होते. पुणे विभागात अशा ३६ हजार संशयास्पद फेरफारांची झाडाझडती घेऊन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली. भटक्या व विमुक्त जाती-जमातींमधील नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी १ रुपयात जागा देण्याचा निर्णय झाला. या घटकांना जात प्रमाणपत्रे आणि अन्य दाखले जलद देण्यासाठी विशेष महसूल शिबिरांचे निर्देश दिलेत. दुष्काळात शेती किंवा लोककल्याणाशी निगडित कोणतीही शासकीय योजना बंद होणार नाही. ग्रामीण भागात शेतरस्त्यांची किमान रुंदी निश्चित करून त्यांची अधिकृत नोंद सात-बारा उताऱ्यातील इतर हक्कांच्या सदरात घेण्याचे आदेश सरकारने दिले. यामुळे रस्त्यांच्या हक्काला महसुली दस्तऐवजांमध्ये कायदेशीर संरक्षण मिळाले आणि मनमानी पद्धतीने रस्ते अडवण्याच्या प्रवृत्तीला कायद्याचा धाक निर्माण झाला.या सुधारणांना तंत्रज्ञानाची जोड देत शेतजमिनींच्या प्रत्येक पोटहिश्शाला स्वतंत्र ओळख क्रमांक देणारा 'भू-आधार' प्रकल्प हाती घेतला.जमिनीच्या प्रत्यक्ष सीमा, उपग्रह सर्वेक्षण आणि महसूल नोंदी यांच्या अचूक ताळमेळीसाठी हे पाऊल टाकले. या सर्व निर्णयांचा अन्वयार्थ लावल्यास हा संपूर्ण पट ग्रामीण जमिनींवरील वाद कायमस्वरूपी निकालात काढण्यासाठी आखलेला दिसतो. ताज्या निर्णयामुळे न्यायव्यवस्थेवरील ताणही कमी होईल. महाराष्ट्रात कनिष्ठ दिवाणी न्यायालयांत प्रलंबित खटल्यांपैकी ३० ते ४० टक्के खटले हे शेतजमिनींची वाटणी, बेकायदेशीर विक्री आणि ताबा याचे आहेत. कित्येक कुटुंबांची आर्थिक ताकद यात खर्ची पडते. दस्तनोंदणीच्या टप्प्यावरच अधिकृत मोजणीची कागदपत्रे तपासली, तर न्यायालयात जाण्याची वेळच येणार नाही. खरेदीदारालाही जमिनीची अचूक जागा आणि निर्वेध मालकी याविषयी खात्री बाळगता येईल. यामुळे जमिनीच्या बाजारमूल्यात आणि ग्रामीण पतपुरवठ्यातही पारदर्शकता येईल. बँका व पतसंस्थांना अशा स्पष्ट अभिलेख असलेल्या जमिनींवर कर्जवाटप करणे सुलभ होईल.कोणत्याही कल्याणकारी आणि रचनात्मक धोरणाचा खरा कस अंमलबजावणीत असतो. अंमलबजावणीत महसूल आणि भूमी अभिलेख प्रशासनाला कार्यक्षमतेची पातळी उंचावावी लागेल. अनेक तालुक्यांत भूमी अभिलेखकडे मोजणीसाठी अर्ज केल्यानंतर महिनोनमहिने मोजणी होत नाही. मनुष्यबळाचा अभाव, आधुनिक मोजणी उपकरणांची कमतरता यांमुळे शासकीय मोजणीच्या प्रतीक्षेतील प्रकरणांचा डोंगर उभा राहिला आहे. जर सामायिक जमिनीच्या विक्रीसाठी 'क' प्रत अनिवार्य असेल, तर ती मिळण्याची प्रक्रिया कालबद्ध आणि सुलभ असावी. मोजणी अर्ज दाखल झाल्यानंतर ठरावीक मुदतीत मोजणी पूर्ण होऊन शेतकऱ्याला त्याची 'क' प्रत मिळाली पाहिजे, अन्यथा वैध व्यवहारही रखडतील आणि मोजणीच्या नावाखाली नव्या दिरंगाईला निमंत्रण मिळेल.संमतीपत्राच्या बाबतही व्यवहारातील समतोल सांभाळणे आवश्यक ठरेल. अनेक कुटुंबांत आधीच अंतर्गत वाद असतात. अशात एखाद्या सहहिस्सेदाराने आकसापोटी किंवा आर्थिक अडवणुकीसाठी संमती देण्यास नकार दिला, तर स्वतःच्या हक्काची जमीन विकू इच्छिणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्याची कोंडी होऊ नये, यासाठी तातडीने मोजणी करून त्याचा हिस्सा वेगळा काढून देण्याची जलदगती प्रशासकीय खिडकी उपलब्ध केली पाहिजे. सहहिस्सेदारांच्या हक्कांचे संरक्षण करणे हाच या नियमाचा हेतू आहे. हा हेतू साध्य करताना प्रामाणिक खातेदारांना लालफितीच्या कारभाराचा फटका बसणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. जमीन हा शेतकऱ्याच्या अस्तित्वाचा आणि आर्थिक सुरक्षिततेचा पाया आहे. महसूल प्रशासनाने या समस्येला थेट हात घालून ग्रामीण जमीन व्यवहारांना कायदेशीर व नैतिक अधिष्ठान मिळवून दिले. डिजिटल सात-बारा, भूआधार, पारदर्शक फेरफार आणि आता सामायिक सात-बारावरील गैरव्यवहारांना लावलेला लगाम यामुळे शेतकऱ्याला आपल्या हक्कांच्या संरक्षणाची एक भक्कम हमी मिळाली आहे. ही व्यवस्था प्रशासकीय पातळीवर गतिमान ठेवून शेतकऱ्यांना विनाविलंब सेवा देणे, हेच या धोरणाला पूर्णत्वास नेणारे पाऊल ठरेल.

# जीडीपी वाढवण्याची जबाबदारी तुमची नाहीं..

भावा,बहिणींनो,मान्य.. सणासुदीचे दिवस आहेत. ते तुम्हाला भरपूर डिस्कॉउंट देऊ करतील, विविध प्रकारच्या जाहिरातींचा मारा आधीच सुरू झाला आहे.सर्वच प्रौढ स्त्री पुरुषांना एन्जॉय करावेसे वाटते.विविध वस्तू घ्यावाश्या वाटतात.जुन्या काढून नवीन मॉडेल्स घ्यावीशी वाटतात. अगदी मानवी आहेत त्या इच्छा. घरात लहान मुले मुली असतील तर त्यांना नवनवीन हवे असते. धमाल हवीच असते.

पण ..किमतीत डिस्काउंट आहे,एकावर एक फ्री आहे म्हणून खरेदी करू नका. तुम्ही किती आणि काय खरेदी करायचे याचा निर्णय विक्रेत्यांवर सोपवू नका. तो फक्त आणि फक्त तुमचा निर्णय असुदे. जमतील तसे पैसे हातात/बँकेत राखून ठेवा. येणाऱ्या काळात तेच तुमच्या हक्काचे असतील.येणारे दिवस,खर्चाच्या बाजूला आणि उत्पन्नाच्या बाजूला, पैशाची बरीच आव्हाने घेऊन येऊ शकतात.

कुटुंबांच्या खरेदीने देशाची जीडीपी वाढते हे खरे. पण जीडीपी वाढवण्याची जबाबदारी तुमची नाही. कधीच नसेल!ती मॅनेज करायला भरघोस पगारावर बरेच पंडित लोक असतात;ते बघतील काय करायचे ते मॅक्रो अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या विपरीत गोष्टी आपल्या कुटुंबाच्या/म्हणजे मायक्रो अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम करत असतात. तुम्हाला त्याची माहिती असो वा नसो. उदा. रिझर्व्ह बँकेने तीन वर्षानंतर पहिल्यांदा व्याजदर वाढवले आहेत. येत्या काळात अजून वाढू शकतात.

इराण युद्धाचे भिजत घोंगडे पडले आहे. उद्या अगदी युद्ध थांबले तरी पेट्रोल/डिझेलचे भाव पूर्वस्थितीला येणार नाहीत. डॉलर्सच्या तुलनेत रुपया कमकुवत झाला आहे, त्यात नाट्यपूर्ण सुधारणा होऊ शकत नाही. त्यात यावर्षी अल निनोने जबरदस्त फटका दिला आहे. अजून ऑक्टोबर संपायचा आहे. पुढच्या पावसाला किमान आठ नऊ महिने आहेत. अन्नधान्य/भाजीपाला/फळे/दूध आदी जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढू शकतात.या सगळ्याच्या परिणामी महागाई आधीच वाढली आहे. वाढणार आहे. इंधन किंमती, व्याजदर वाढते राहिल्यामुळे उत्पादन खर्च वाढले आहेत, म्हणून पुन्हा महागाई वाढत असते. ही झाली खर्चाची बाजू.

कुटुंबाच्या आमदनीच्या




बाजूला देखील काळे ढग दाटत आहेत.लाखो तरुण संघटित क्षेत्रातील नोकऱ्या शोधत आहेत. प्रौढांना कोठून मिळणार..संघटित क्षेत्रात नोकऱ्या कमी झाल्या तर असंघटित क्षेत्रातील रोजगार/स्वयंरोजगार कमी होतात. शेती/जमिनीशी संबंधित कुटुंबांची आर्थिक स्थिती तर विचारूच नका ही डबल ढोलकीची स्थिती आहे. घराची/कुटुंबाची अर्थव्यवस्था तुम्हाला स्वतःला मॅनेज करायची असते ; ती कशी करायची यावर नवरा -बायको , मित्र यांच्यात चर्चा करा; काही मित्रत्वाच्या सूचना सर्व अनावश्यक खर्च पुढे ढकला : सोने/दागिने/वाहने/गृहपयोगी वस्तू. अपवाद घरातील लहान मुलांचा. त्यांची हौस जमेल तशी भागवा./कोणत्याही आवश्यक खर्चाला कात्री लावायला लागणार नाही हे बघा : विशेषतः पौष्टिक खाण्यावरचा खर्च,मुले असतील तर त्यांचा आहार,दूध,मांसाहार,फळे,भाज्या,डाळी जमतील तशा खाल्याच पाहिजेत असे पैशाचे नियोजन करा मुलांच्या शिक्षणात खंड पडणार नाही,घरात कोणी आजरी असेल तर त्याच्यवरचे उपचार पुढे ढकलावे लागणार नाहीत हे बघा.

जे पैसे उरतील ते बचत करा, जेवढी करता येईल ती करा. अडीनडीला फक्त हक्काचे, स्वतःचे पैसे हाक मारल्यावर धावून येतात. कमी व्याज मिळाले तरी चालेल पण सार्वजनिक बँकांत ठेवा. जास्त व्याज मिळते म्हणून पतपेढी, चिट फंड, पॉन्झी योजनांमध्ये घालू नका. कळत नसेल तर शेयर्सच्या/म्युच्युअल फंडाच्या भानगडीत पडू नका कर्जाचा महापूर आलाय, ऑनलाईन,ऑफलाईन; शक्य तो कर्ज काढणे टाळा; स्वस्तात आणि घरपोच मिळते म्हणून कर्जे काढू नका.

पुरुषांसाठी ! एकेकटे राहू नका आपल्या कुटुंबीयांबरोबर राहा,मित्र,शेजारी याना हवेनको ते विचारा. मनस्वास्थ्य सांभाळा. ताण असहनीय होतो म्हणून दारूच्या व्यसनात बुडून राहू नका.

**संजीव चांदोरकर**

# दुष्काळ फक्त जमिनीवर पडत नाही

**दुष्काळ म्हटला की डोळ्यांसमोर येते ती भेगाळलेली जमीन, कोरडेठाक पडलेले विहिरीचे तळ आणि आकाशाकडे डोळे लावून बसलेला बळीराजा. पण दुष्काळ केवळ जमिनीवरच पडत नाही, तर तो नकळत शेतकऱ्यांच्या घरातल्या चुलीपर्यंत येऊन पोहोचतो.**



शेतात पाणी नसेल तर पिके करपतात. पिके करपली तर उत्पन्न बुडते आणि उत्पन्न बुडले, की त्याचा पहिला आणि थेट फटका घरातल्या चुलीला बसतो. संपूर्ण जगाचे पोट भरणाऱ्या अन्नदात्याच्याच घरात अन्नाचा प्रश्न निर्माण होणे, ही महाशोकांतिका आहे. ग्रामीण संस्कृतीत आणि शेतकरी कुटुंबात चूल ही केवळ स्वयंपाकाचे साधन नसते, तर ती त्या कुटुंबाच्या समृद्धीचे, आनंदाचे आणि स्वाभिमानाचे जीवंत प्रतीक असते. जेव्हा शेतात पिके बहरतात, विहिरी पाण्याने तुडुंब भरलेल्या असतात, तेव्हा चुलीवर गरम भाकरी भाजल्या जातात. कालवणाचा सुवास घरभर पसरतो आणि संपूर्ण कुटुंब तृप्तीने जेवते.

परंतु जेव्हा पावसाचा एकही थेंब पडत नाही आणि घाम गाळलेली शेतजमीन वाळवंट बनते, तेव्हा त्या चुलीतील अग्नीही हळूहळू विझू लागतो. घरातील धान्याची कोठी रिकामी होऊ लागते. एका वेळचे खाऊन दुसऱ्या वेळेची भ्रांत निर्माण होते. बापाच्या हातात पैसा नसतो आणि आईच्या डोळ्यांत अथांग विवंचना असते.

दुष्काळ घरात शिरला की सुरुवातीला भाजीपाल्याची कपात होते. नंतर वरणाची डाळ पातळ होत जाते आणि अखेर केवळ चटणी-भाकरीवर दिवस ढकलावे लागतात. काही वेळा तर घरातील माणसांची संख्या पाहून भाकरीचे तुकडे मोजावे लागतात.

आई स्वतः अर्धपोटी राहून आपल्या पोरांच्या पोटात दोन घास जावेत, यासाठी तासनतास घडपडते. दुष्काळाची ही झळ लहान मुलांच्या कुपोषणामध्ये आणि त्यांच्या कोमेजलेल्या चेहऱ्यांमध्ये स्पष्टपणे दिसू लागते. दुष्काळाचा सर्वांत मोठा आणि मूक फटका घरातील महिलांना सहन करावा लागतो. चुलीवर अन्न शिजवायचे कसे, हा प्रश्न तर असतोच; पण त्यासोबत पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागते. उन्हाच्या काहिलीत डोक्यावर पाण्याचे हंडे घेऊन चालणाऱ्या महिलांची दृश्ये दुष्काळाचे दाहक वास्तव सांगून जातात.

दुष्काळ फक्त माणसांच्या अन्नावरच गदा आणत नाही, तर कुटुंबाचा मुख्य आधार असणाऱ्या पशुधनालाही उध्वस्त करतो. शेतातील पिके करपल्यानंतर गुरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. ज्या गाई-म्हशींनी कुटुंबाला दूध-दुभते दिले, ज्या बैलांनी शेतात राबून धान्य पिकवले, त्यांनाच चाऱ्याअभावी चारा छावण्यांमध्ये पाठवावे लागते किंवा कवडीमोलाने व्यापाऱ्यांना विकावे लागते. गोठ्यातील जनावरांची रिकामी झालेली जागा आणि त्यांची असहाय्य नजर शेतकऱ्याच्या काळजाचे पाणी करते. पशुधन विकल्यामुळे दुधाची मिळकतही बंद होते. त्यामुळे चुलीवरचा चहा आणि दुधाचा थेंबही त्या घरासाठी दुर्मिळ होऊन बसतो. जेव्हा जमिनीवरील दुष्काळ घरातल्या चुलीला पूर्णपणे गिळून टाकतो, तेव्हा उरतो फक्त एकच पर्याय-स्थलांतर. गाव सोडून शहराच्या दिशेने जाणे, विटांच्या भट्ट्यांवर किंवा बांधकामाच्या ठिकाणी मजुरी करणे याशिवाय पर्याय उरत नाही. शहरात तात्पुरते पाल ठोकून उभारलेल्या झोपडीत, दोन दगडांवर रचलेली चूल त्यांच्या उध्वस्त झालेल्या आयुष्याची साक्ष देत असते. तिथे ना हक्काची जमीन उरते, ना स्वाभिमानाची भाकर मिळते.

दुष्काळाची ही चुलीपर्यंत पोहोचलेली झळ शेतकऱ्याला मानसिकदृष्ट्याही पूर्णपणे तोडून टाकते. जेव्हा घरात मुले भुकेने व्याकूळ झालेली असतात आणि बाप काहीच करू शकत नाही, तेव्हा त्याची असहाय्यता शिगेला पोहोचते. बँकेची जप्तीची नोटीस, सावकाराचा तगादा आणि घरातली विझलेली चूल या तिहेरी संकटात सापडलेला शेतकरी अनेकदा स्वतःचे जीवन संपवण्याचा टोकाचा मार्ग निवडतो. मात्र आत्महत्या ही केवळ एका व्यक्तीची नसते, तर ती एका संपूर्ण कुटुंबाच्या, त्याच्या स्वप्नांच्या आणि त्याच्या विझलेल्या चुलीची हत्या असते. म्हणूनच दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाची आकडेवारी म्हणून न पाहता, तो एका संपूर्ण मानवी आणि सामाजिक संकटाच्या रूपात पाहण्याची गरज आहे. दुष्काळग्रस्तांना केवळ पाण्याचे टँकर देणे किंवा ठराविक आर्थिक मदत जाहीर करणे ही तात्पुरती मलमपट्टी ठरू शकते; पण मूळ प्रश्न सुटत नाही.

शेतकऱ्याच्या चुलीत अग्नी सतत पेटता राहायचा असेल, तर त्याला शेतीसाठी शाश्वत पाण्याची सोय, पिकांना उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळणे, हवामान बदलांशी लढण्याची ताकद आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी थेट आर्थिक सुरक्षा मिळणे गरजेचे आहे. जलसंधारणाची कामे, विकेंद्रित पाणी साठवण, योग्य पीकविमा आणि स्थानिक स्तरावर पूरक रोजगाराची उपलब्धता ही या संकटावर मात करण्यासाठी आवश्यक पावले आहेत. ज्या दिवशी शेतात हिरवळ फुलेल आणि शेतकऱ्याच्या कष्टाला योग्य मोल मिळेल, त्याच दिवशी त्याच्या घरातली चूल तृप्तीने आणि स्वाभिमानाने पेटू शकेल. दुष्काळाची झळ जमिनीवरून थेट चुलीपर्यंत पोहोचू न देणे हे केवळ सरकारचेच नाही, तर संपूर्ण समाजाचे नैतिक कर्तव्य आहे. शेतकऱ्यांच्या घरातील चूल सतत पेटती राहिली, तरच या देशातील अन्नाचा प्रत्येक कण समृद्धीने आणि आनंदाने शिजेल.

**- विलास तुळशीराम ताथोड,**
राज्य कार्यकारणी सदस्य, शेतकरी संघटना,
अकोला (७०२०५८५२६१)

# शेतकऱ्यांना त्यांचा हक्क कधी मिळणार?

माझेही मत

वन्यप्राणी,वन्यप्राणी अन्नसाखळी, जैवविविधता या सर्व बाबींची जाण असून देखील शेतकऱ्यांनी शेतात पीके घ्यायची की, वन्य प्राण्यांच्या चराईकरिता शेती करायची या बाबीचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.मागील वर्षी माझ्या शेतातील सहा एकर सोयाबीनचे १००% तुकसान,६एकर तुरीचे ४०% नुकसान व यावर्षी पाच एकर सलग तुरीचे शंभर टक्के तसेच दिड एकर सोयाबीन अल्प प्रमाणात वन्यप्राण्यांनी नष्ट केली.

बरे असो,वन्य प्राण्यांनाही जिवंत राहण्याचा अधिकार आहे पण त्यांना शेतकऱ्यांच्या उरावर नाचून त्यांची आयुष्य नासवण्याचा अधिकार मुळीच नाही,अती वन्यप्राणी प्रेमाचा पुळका असणाऱ्यांना कळकळीची विनंती आहे की,माझ्या शेतातील आजूबाजूचे डुक्कर, रोही, हरीण व इतर नुकसान करणारे वन्यप्राणी पशुपक्षी यांनी आपल्या शेताकडे घेऊन जावे. वन्यप्राण्यांचा जगण्याचा अधिकार मान्य आहे पण त्याकरिता संरक्षित क्षेत्राच्या बाहेर अतोनात प्रमाणात वाढलेले वन्यप्राणी, पिकांचा विध्वंस करणारी जमात जमा करून संरक्षित वन क्षेत्रात सोडणे यावर सरकार कधी विचार करणार?

सरकारला शेतकऱ्यांचे जगणे मान्य नाही हे मला मान्य आहे.म्हणून शेतकऱ्याचे जगणे वन्य प्राण्यांकरवी असह्य करून ठेवणे ही बाब कितपत योग्य आहे. असो, वन्य प्राण्यांना बुद्धी नाही त्यांनी कोणते व किती नुकसान करावे हे त्यांना समजत नाही पण वन्य प्राण्यांशी संबंधित नुकसान भरपाई पंचनाम्यची जबाबदारी असलेल्या वनविभाग,कृषी विभाग, महसूल विभाग यातील महसूल विभाग सोडून इतर काही कर्मचाऱ्यांनाही परमेश्वराने बुद्धी न देता जन्माला घातलेले दिसते.

मागील वर्षी तुरीचे अंदाजे ३८ ते ४२ हजाराच्या आसपास वन्य प्राण्यांमुळे नुकसान झाले पण,त्याची नुकसान भरपाई संबंधितांनी पंचनामा करून फक्त रुपये १४००० दिली. तीही मी निवृत्त कृषी अधिकारी असल्यामुळे दिली, अन्य सर्वसाधारण शेतकरी असता तर कदाचित त्यांनी फक्त चार पाच हजार तोंडावर फेकून अनंत उपकार केल्याचा अहवाल सादर केला असतात.

यावर्षी देखील कपाशीतील तुरीचे व पाच एकर सलग तुरीचे शंभर टक्के नुकसान,दीड एकर सोयाबीनचे अंशता नुकसान करूनही तिन्ही विभागाच्या अधिकारी,कर्मचाऱ्यांनी तिनदा पाहणी करून आजपर्यंत पंचनामा केला नाही व काही नुकसान भरपाई नाकारण्यात आल्याचे सांगण्यात आले.दुर्दैवाची बाब म्हणजे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी शेतात पंचनामा न करता वनविभागाच्या कर्मचाऱ्याने तयार करून आणलेल्या पंचनाम्यावर कृषी विभाग व राजस्व विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या?त्यांच्या कार्यालयात जाऊन वनविभागाच्या कर्मचाऱ्याने सह्या घेतल्या व जाब विचारला असता कृषी विभागाचा कर्मचारी उत्तर द्यायला सुद्धा तयार नाही.

अशा संवेदना शून्य कर्मचाऱ्यांमुळे शेतकरी वन्य प्राणी संघर्ष वाढत आहे.त्यामध्ये वन्यप्राणी व शेतकरी यांचे नाहक जीव जात आहेत याची देखील या बुद्धी शुन्य कर्मचाऱ्यांना जाण नाही.या कर्मचाऱ्यांना पंचनाम्याची व्याख्या माहिती नाही,किती दिवसात पंचनामा करणे बंधनकारक आहे हे माहीत नाही.किती दिवसात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिल्या गेली पाहिजे हेही माहीत नाही.योग्य किलावधीत पंचनामा न केल्यास,एक महिण्यात रक्कम न दिली गेल्यास त्याची जबाबदारी कोणावर व कसा आर्थिक फटका बसतो हे ही माहीत नाही.

पिकाचे झालेले नुकसान, हेक्टरी मंडळातील उंबरठा उत्पन्न व त्या वर्षीचा सरकारी हमीभाव यांचा उपयोग करून नुकसान भरपाई काढण्याचे तंत्रशुद्ध ज्ञान बऱ्याच संबंधितांना नाही किंवा त्यांना शेतकऱ्यांना त्याच्या हक्काची नुकसानभरपाई द्यायची नाही.शेती पिकाचे नुकसान कशामुळे झाले या बाबीचेही तंत्रशुद्ध ज्ञान नाही.बऱ्याच जणांना फक्त शासकीय कर्मचारी असल्याची मग्रुरी आहे.

सर्वांत दुःखाची बाब अशी की, मी तांत्रिक कृषी अधिकारी असताना पीक,फळबाग नुकसानीचे मूल्यांकन करून दिले आहे व मलाच हे कर्मचारी नियम शिकवतात. जर माझी अशी परिस्थिती असेल तर सर्वसाधारण शेतकऱ्यांवर हे लोक किती अन्याय करत असतील याचा विचार करून अंगावर काटा येतो.

सरकारातील जनप्रतिनिधी हे देखील कायमच शेतकरी हिताबाबत उदासीन आहेत काय? कारण वन्यप्राणी नुकसानीचे आर्थिक सिलिंग व आज उत्पादनाकरिता येणाऱ्या खर्चाचा ताळमेळ बसत नसून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम न देता आर्थिक सिलिंगच्या नावाखाली तुटपुंजी रक्कम देण्यात येत आहे हा शेतकऱ्यावर अन्याय नव्हे काय?

वन्यप्राणी शेतपिक नुकसान भरपाई साक्षरता अभियान राबवण्याची नितांत गरज असल्याचे लक्षात आले आहे त्याकरिता निवृत्त कृषी अधिकारी, कर्मचारी यांनी संबंधित बाबींचे जीआर वाचून आपापल्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना वन्यप्राणी नुकसान भरपाई साक्षर करून न्यायहक्क मिळवून देण्याकरिता प्रयत्न करावेत विनंती.?

**रवींद्र कोवळे**
मोर्शी, जि अमरावती.

# नियुक्तीतील कथित गैरप्रकार,न्यायासाठी दाम्पत्याचे जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण!

## पात्र उमेदवारांना डावलल्याचा आरोप आदेशानंतरही एफआयआर नाही. प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ : जिल्हा परिषदेत अंशकालीन परिचर पदाच्या नियुक्ती प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप करीत महागाव तालुक्यातील राहूर येथील पूजा अनिल भांडवले आणि त्यांचे पती अनिल शिवाजी भांडवले यांनी २१ ऑक्टोबरपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.**



नियुक्ती प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी करून संबंधित प्रक्रिया स्थगित करावी आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी या दाम्पत्याने केली आहे. दरम्यान, उपोषण सुरू होऊनही प्रशासनाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. पूजा भांडवले यांच्या म्हणण्यानुसार, नियुक्ती प्रक्रियेतील कथित अनियमिततेबाबत त्यांनी यापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. पात्र उमेदवारांना डावलून कथितरीत्या नियमबाह्य नियुक्त्या करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. या प्रकरणाची चौकशी करून नियुक्ती प्रक्रिया स्थगित करण्याची मागणीही करण्यात आली होती. मात्र, चौकशी आणि कारवाईचे आश्वासन मिळूनही अपेक्षित न्याय न मिळाल्याने अखेर दाम्पत्याला आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी सांगितले.

आदेशानंतरही एफआयआर का नाही? असा सवाल उपस्थित होत असताना या प्रकरणात ४ मार्च २०२६ रोजी आदेश देण्यात आला असतानाही ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत संबंधित प्रकरणात प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्यात आला नसल्याचा दावा दाम्पत्याने निवेदनातून केला आहे. आदेशानंतरही कारवाई झाली नसेल, तर त्यामागील कारण काय, असा सवाल उपस्थित करीत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी गठित समितीत संबंधित अधिकाऱ्यांचा समावेश करावा, कथित अनियमिततेची सखोल चौकशी करावी आणि जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### काँग्रेस जिल्हाध्यक्षांची उपोषणस्थळी भेट

**दरम्यान, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पूजा आणि अनिल भांडवले यांच्याशी संवाद साधला. यावेळी दाम्पत्याने आपल्या तक्रारी आणि मागण्यांची माहिती त्यांना दिली. संपूर्ण नियुक्ती प्रक्रियेची पारदर्शक चौकशी करून पात्र उमेदवारांना न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली.**

### आता प्रशासन काय भूमिका घेणार?

**नियुक्ती प्रक्रियेतील कथित अनियमिततेचे आरोप, एफआयआर दाखल न झाल्याबाबत उपस्थित केलेले प्रश्न आणि दाम्पत्याचे आमरण उपोषण यामुळे हे प्रकरण चर्चेत आले आहे. तक्रारींची वस्तुनिष्ठ चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे आणि संबंधितांना नियमानुसार न्याय देणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते आणि उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे.**

# नियमभंग म्हणजे मृत्यूला निमंत्रण! महामार्ग पोलिसांचा विद्यार्थ्यांना कडक संदेश

## जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २४ :** हेल्मेटचा वापर टाळणे, सीट बेल्ट न बांधणे, भरधाव वाहन चालविणे आणि वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे या निष्काळजीपणामुळे अपघातांचा धोका वाढतो. अशा नियमभंगाला आळा घालण्यासाठी तुळजापूर–नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर महामार्ग पोलिसांनी जनजागृती मोहीम तीव्र केली आहे.

याचाच भाग म्हणून जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस उपनिरीक्षक मोहम्मद इक्बाल शेख यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून दिले. "वाहतूक नियमांचे उल्लंघन म्हणजे स्वतःसह इतरांच्याही जीवाशी खेळ!" असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. हेल्मेटचा वापर, चारचाकी चालविताना सीट बेल्ट, निर्धारित वेगमर्यादेचे पालन, सुरक्षित ओव्हरटेकिंग आणि वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले. महामार्ग पोलीस नागपूर परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक डॉ. लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पोलीस निरीक्षक दीप्ती व्यास उपस्थित होत्या. यावेळी 'सडक सुरक्षा मित्र' उपक्रमाची माहिती देऊन विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षेचा संदेश समाजापर्यंत पोहोचवा, असे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयाचे सचिव डॉ. शितल वातिले, रजिस्ट्रार डॉ. पराग ठाकरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवीण वानखेडे, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात



### प्रार्थनेचा आशय आचरणात आणा, जीवनाचा उद्धार साधा!

**शिवलिंग पटवे यांचे प्रतिपादन, प्रार्थना व भजन संध्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद**

**पुसद :** प्रार्थना केवळ शब्दांपुरती मर्यादित न ठेवता तिचा आशय आचरणात आणला, तरच जीवनाचा खरा उद्धार होईल, असे प्रतिपादन शिवलिंग अण्णा पटवे यांनी केले. श्री गुरुदेव सेवा मंडळ, श्रीरामपूरच्या वतीने पुसद तालुक्यात आयोजित ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. याच उपक्रमांतर्गत अनिता सूर्यवंशी यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या पार पडली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी समाजाला दिलेल्या सामुदायिक प्रार्थनेतील प्रत्येक शब्द अनमोल असून, त्यातील विचार जीवनात उतरविणे आवश्यक आहे, असे पटवे म्हणाले. प्रार्थनेमुळे दुःख विसरून आनंदाची अनुभूती मिळते. तसेच अनिष्ट प्रथा दूर करून मानवधर्माची प्रतिष्ठा वाढविण्याची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंतांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना व बहारदार भजनांचा कार्यक्रम झाला. शिवशंकर नागरे, गणेश धर्माळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. महाआरती, राष्ट्रवंदना व जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### रब्बी हंगामासाठी इसापूर डाव्या कालव्यातून पाणी सोडले..!

**पहिली पाणी पाळी सुरू, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**

**उमरखेड :** ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचा रब्बी हंगाम २०२६/२७ साठी पहिली पाणी पाळी शनिवार दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता इसापूर डाव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले आहे. रब्बी हंगामाच्या सुरुवातीलाच पाणी मिळाल्यामुळे कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. ऐन रब्बीच्या तोंडावर वेळेत पाणी सोडण्यात आल्यामुळे , हरभरा करडई ज्वारी व चारा पिके यांसारख्या पिकांच्या पेरण्यांना आणि प्राथमिक ओलित करण्याला मोठा वेग येणार आहे. सिंचनाचे हे पाणी शेवटच्या टोकापर्यंत सुरळीतपणे पोहोचावे, यासाठी ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी कालवा क्षेत्रावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे पाणी वाया घालवू नये आणि उपलब्ध पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा,तसेच शेतकऱ्यानी कालवा फोडणे किंवा कालव्याचे गेट नादुरुस्त करणे असे प्रकार करू नये. सर्व पिकांना ठिबक किंवा तुषार पद्धतीने पाणी द्यावे असे आवाहन जलसंपदा विभागाच्या वतीने लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी बांधवांना आव्हान करण्यात आले आहे.

### निवडणूक संपली, आता शिक्षकांच्या प्रश्नांसाठी मदतीचे हात कुठे?

**मतदानानंतर आत्मपरीक्षणाची गरज कामाचा हिशेब मागण्याचे आवाहन**

**पुसद :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणूक संपली असून आता सर्वांचे लक्ष २७ तारखेच्या निकालाकडे लागले आहे. मात्र, या निवडणुकीनिमित्त शिक्षका समोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे.निवडणुकीच्या काळात जवळीक दाखवणारे मदतीचे हात शिक्षकांच्या अडचणीच्या वेळीही पुढे येणार का? प्रचारादरम्यान शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा झाली, भेटीगाठी झाल्या आणि विविध आश्वासनेही देण्यात आली. मात्र, निवडणुकीची धामधूम संपल्यानंतर सेवा विषयक प्रलंबित प्रश्न, कार्यालयीन अडचणी आणि न्यायासाठी करावा लागणारा पाठपुरावा यांची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न कायम आहे. शिक्षकांनी केवळ मतदान करून थांबू नये, तर निवडून आलेल्या प्रतिनिधीच्या कामाचा नियमित हिशेब मागावा. आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृतीला महत्त्व देत संघटनात्मक एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन गोपाल चव्हाण यांनी केले आहे.२७ तारखेचा निकाल उमेदवारांचे भवितव्य ठरवेल; मात्र शिक्षकांच्या प्रश्नांची सोडवणूक हीच प्रतिनिधित्वाची खरी कसोटी ठरणार आहे.

### मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेतील डाटा ऑपरेटरची फरफट..!

**न्यायासाठी जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण**

**यवतमाळ :** शासकीय योजनांच्या माध्यमातून युवकांना रोजगाराची संधी देण्याचे आश्वासन दिले जाते.मात्र प्रत्यक्ष काम करूनही मानधनासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असतील, तर प्रशासकीय व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत काम केलेल्या एका युवकावर थकीत मानधनासाठी उपोषणाला बसण्याची वेळ आली आहे.महागाव तालुक्यातील धारेगाव येथील रामदास शंकर मिसे यांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत डाटा ऑपरेटर म्हणून १ सप्टेंबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत काम केल्याचे निवेदनात म्हटले आहे. मात्र, काम करूनही ११ महिन्यांचे मानधन अद्याप मिळाले नसल्याचा त्यांचा आरोप आहे. यासंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करूनही दखल घेतली जात नसल्याने आर्थिक परिस्थिती बिकट झाली असून उपासमारीची वेळ आल्याचे त्यांनी नमूद केले आहे.
थकीत मानधन मिळावे, या मागणीसाठी मिसे यांनी १६ ऑक्टोबरपासून यवतमाळ जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

# 'अर्ज घ्या, कर्ज द्या!' च्या घोषणांनी सेंट्रल बँक दणाणली!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. २४ :** दुष्काळसदृश परिस्थिती, शेती उत्पादनातील घट आणि वाढत्या आर्थिक संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले असताना पीककर्जासाठी बँकांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. या प्रश्नाकडे शासन आणि बँक प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी फुलसावंगी येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियासमोर शेतकऱ्यांनी गुरुवारपासून ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. 'अर्ज घ्या, कर्ज द्या!' अशा घोषणांनी बँक परिसर दणाणून गेला आहे.

महागाव तालुका मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, किसान सभा आणि डी.वाय.एफ.आय. यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात येत आहे. पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, पीककर्ज प्रक्रिया सुलभ करावी, अनावश्यक कागदपत्रांचा आग्रह धरू नये आणि पात्र शेतकऱ्यांना तातडीने कर्जवाटप करावे, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत. कर्जासाठी अर्ज स्वीकारण्यापुरती प्रक्रिया मर्यादित न ठेवता पात्र शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष कर्जाची रक्कम द्यावी, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी मांडली. कर्जवसुलीच्या तगाद्या मुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. गुरुवारी सुरू झालेले आंदोलन शुक्रवारीही कायम राहिले. आंदोलकांनी रात्र बँकेसमोर काढली. शुक्रवारी डफळ्यांच्या गजरातून आंदोलनाची तीव्रता अधोरेखित करण्यात आली. शाखा व्यवस्थापक मोहन पांडे यांनी आंदोलनाची दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. मात्र, आश्वासनापेक्षा प्रत्यक्ष निर्णयाची प्रतीक्षा आंदोलकांना असून, मागण्यांवर ठोस तोडगा निघेपर्यंत पाठपुरावा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे धडे गुरुकुल कॉन्व्हेंटमध्ये जनजागृती



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २४ :** दैनंदिन जीवनात होणारे अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक आहे. याच जाणिवेतून मुकूटबन येथील गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयात गुरुवार, २२ ऑक्टोबर रोजी आर.सी.सी.पी.एल.च्या वतीने सुरक्षा जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात आर.सी.सी.पी.एल.चे अधिकारी संदीप उरकुडे आणि अग्निशमन अधिकारी स्वप्नील हरबडे यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या नियमांचे महत्त्व पटवून दिले.

अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, आपत्कालीन परिस्थितीत सतर्कता आणि स्वतःसह इतरांच्या सुरक्षेची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. 'सुरक्षितता ही केवळ नियमांची बाब नसून जीवनशैलीचा भाग आहे,' हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. सुरक्षिततेच्या सवयी बालवयातच रुजल्यास संभाव्य धोके टाळण्यास मदत होते, यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक विलास चिट्टलवार यांनी सहकार्य केले. शुभम पारवे यांनी सूत्रसंचालन केले. 'सुरक्षित विद्यार्थी, सुरक्षित शाळा, सुरक्षित समाज' या संदेशातून उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले.

# मॉर्निंग वॉक ठरला अखेरचा,भरधाव कारच्या धडकेत ४० वर्षीय युवकाचा मृत्यू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २४ :** ब्राम्हणगावकडून हरदडा मार्गे ढाणकीकडे जाणाऱ्या भरधाव कारची मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या तरुणाला धडक बसल्याने रस्त्याच्या कडेवरील नालीत पडून जागीच गतप्राण झाल्याची घटना आज दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजताचे सुमारास घडली कुलदिप गंगाधर हुलकाने वय ४० वर्षे रा ब्राम्हणगाव ता उमरखेड असे मृतकाचे नाव आहे. मृतक कुलदिप हा छत्रपती संभाजीनगर

माहुर या राष्ट्रीय महामार्गावरील ब्राम्हणगांव हरदडा रस्त्याने मॉर्निंग वॉकसाठी आज सकाळी ६ वाजताचे दरम्यान पत्नीसह ब्राम्हणगाव हरदडा रस्त्याच्या कडेने ब्राम्हणगावकडे येत असतांना ब्राम्हणगावकडून येणाऱ्या MH २६ C Y ६२७२ या कारने जोरदार धडक दिली या धडकेत तो रस्त्याच्या कडेवरील नालीत पडला व जागेवरच गतप्राण झाल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे . सदर कार ही एका पोलीस अधिकाऱ्याची असल्याचे सांगण्यात येत असून महिला चालवित असल्याने कारचालक महिलेला अटक करा असा आक्रोश करीत मृत्तकाच्या नातेवाईकांनी पोलीस स्टेशनला एकच गर्दी केली होती. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी उमरखेड पोलीस स्टेशनचे सपोनि अमोल गुंडे बीट जमादार दिलीप चव्हाण यांनी घटनास्थळ पंचनामा केला सहाय्यक रासायनिक विश्लेषक अमर नरवाडे, घनश्याम पोहरकर यांचे पथकाने घटना स्थळाची पाहणी केली वृत्त लिहेपर्यन्त कारचालकाचे नाव कळू शकले नाही. उमरखेड पोलीस पुढील तपास करीत आहेत मनमिळाऊ स्वभावाच्या व्यवसायिकाच्या अपघाती मृत्यूने ब्राह्मणगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे .

# गरब्याच्या जल्लोषात पाणी बचतीचा संदेश, नगराध्यक्ष बोरेले यांचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २४ :** भक्ती, संस्कृती आणि उत्साहाचा संगम ठरलेल्या माँ जगदंबा गरबा महोत्सव २०२६ ची शनिवारी (दि. १७ ऑक्टोबर) दिमाखदार सांगता झाली. तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समारोपप्रसंगी गरबा स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष आतिश (सोनू भैय्या) बोरेले यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले. महोत्सवाचे उद्घाटन लोकनेते अण्णासाहेब देशमुख पारवेकर यांच्या हस्ते झाले होते. समारोपप्रसंगी बोलताना नगराध्यक्ष बोरेले यांनी गरबा हा केवळ नृत्याचा प्रकार नसून श्रद्धा, भक्ती आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक असल्याचे सांगितले. अशा सांस्कृतिक उपक्रमांतून सामाजिक एकता आणि महिला सक्षमीकरणाला बळ मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

**दुष्काळात पाणी बचत ही प्रत्येकाची जबाबदारी!**

राज्यात दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी नागरिकांची सामूहिक जबाबदारी महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खुशी आतिश बोरेले यांच्यासह आयोजन समितीने महोत्सवाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. यावेळी योगेशभाऊ पारवेकर, सौ. प्रियताई तोडसाम, वणीच्या नगराध्यक्षा विद्याताई आत्राम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पुढील वर्षी अधिक भव्य आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त करत माँ जगदंबेच्या जयघोषात महोत्सवाची सांगता झाली.

# गुप्तधनाच्या हव्यासातून अघोरी प्रकार उघड..! सात आरोपी पोलिसांच्या जाळ्यात!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**वणी, दि. २४ :** गुप्तधन मिळविण्याच्या हव्यासातून मंदिर परिसरात पूजा-पाठ करून खोदकाम करण्याचा कथित प्रकार वणी तालुक्यातील मानकी गावालगतच्या खेकडी (रिठ) येथील हनुमान मंदिर परिसरात उघडकीस आला. शुक्रवारी रात्री घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली.

ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे दोघांना घटनास्थळीच पकडण्यात आले, तर पसार झालेल्या अन्य पाच जणांनाही वणी पोलिसांनी काही तासांत ताब्यात घेतले. या प्रकरणी सातही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुप्तधनाच्या नादात मंदिर परिसरात खोदकाम सुरू असल्याचे नागरिकांना मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे आठ वाजताच्या सुमारास पाच पुरुष आणि दोन महिला हनुमान मंदिराजवळ पूजा-पाठ करून टिकास व फावड्याच्या साहाय्याने खड्डा खोदत असल्याचे काही युवकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ ग्रामस्थांना माहिती दिली. त्यानंतर सुमारे १०० ते १५० ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. ग्रामस्थांची गर्दी पाहून पाच जणांनी पळ काढला. मात्र, अनिल मारोती बावणे (५६, रा. वणी) आणि रामदास निळकंठ दवें (४४, रा. मानकी) यांना ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पसार झालेले पाचही जण ताब्यात घेण्यात आले या प्रकरणातील विठ्ठल अतकरे (३०), गणेश नागपुरे (२८), वासुदेव (अंदाजे ५०, पूर्ण नाव अज्ञात, तिघेही रा. घुग्घुस), रंजना कामटकर (३५, रा. वणी) आणि अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी महिला हे पाच जण पसार झाले होते. पोलिसांनी शोधमोहीम राबवून त्यांनाही ताब्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सय्यद साजिद यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पूजेचे साहित्य, पाच लाडू, पाच चिकन सुपाऱ्या, टिकास आणि फावडे जप्त केले. सातही जणांविरुद्ध महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम २०१३ चे कलम ३, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम १३५ आणि भारतीय न्याय संहितेचे कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सर्व आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती आहे. गुप्तधनाच्या आमिषातून अशा प्रकारांना खतपाणी मिळत असल्याने अंधश्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या कृत्यांविषयी जनजागृतीची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# दुष्काळात शेतकऱ्या पाठोपाठ मजुरांवर ही उपासमारीचे संकट!

## 'जी रामजी'चे काम बंद असल्याचा वर्षा निकम यांचा आरोप..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** जिल्ह्यात दुष्काळाचे सावट गडद होत असताना शेतकऱ्या पाठोपाठ आता मजूर वर्गावर ही उपासमारीची वेळ आली आहे. शेतात काम नाही, हाताला रोजगार नाही आणि घर चालविण्यासाठी पैसाही नाही, अशा दुहेरी संकटात ग्रामीण भागातील मजूर भरडले जात आहेत.



अशा परिस्थितीत सरकारच्या मदतीच्या घोषणा आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यातील अंतर पुन्हा एकदा समोर आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्ष वर्षा निकम यांनी 'जी रामजी' योजनेतील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या योजनेचे काम बंद असून, केवळ काही घरकुलाची मस्टर काढली जात आहेत. मात्र सर्वसामान्य मजुरांना काम मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा करण्यात आली, कर्जमाफीचाही निर्णय जाहीर झाला. मात्र या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ किती जणापर्यंत पोहोचला, हा प्रश्न अद्याप कायम आहे. शेतकरी आर्थिक संकटात असताना शेतमजुरांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर लोकशाही मराठीचे प्रतिनिधी संजय राठोड यांनी वर्षा निकम यांच्याशी संवाद साधला. घोषणांनी पोट भरत नाही. मजुरांच्या हाताला प्रत्यक्ष काम आणि वेळेवर मजुरी मिळणे गरजेचे आहे. प्रशासनाने रोजगाराची स्थिती स्पष्ट करून तातडीने कामे सुरू करावीत, अशी मागणी होत आहे.

# दुष्काळात जिल्ह्याची बाहेरील गुरांसाठी सीमाबंदी!

## १५ एप्रिल २०२७ पर्यंतच चारा पुरण्याचा अंदाज.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने आता स्थानिक पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जिल्ह्यातील ८ लाख १८ हजार १३८ पशुधनासाठी उपलब्ध चारा १५ एप्रिल २०२७ पर्यंतच पुरण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने बाहेरील पशुधनाच्या चराईवर बंदी घातली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विकास मीना यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहेत.



सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील गायरान जमिनींवर बाहेरील जिल्ह्यांतील तसेच इतर राज्यांतील मेंढ्या, शेळ्या, गायी आणि म्हशी यांना चराईसाठी आणण्यास पूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

### चारा मर्यादित, पशुधनाची चिंता कायम!

**दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या जिल्ह्यात स्थानिक पशुधनासाठी चारा राखून ठेवण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. मात्र, चारा टंचाईची परिस्थिती लक्षात घेता भविष्यातील नियोजन, वैरण उपलब्धता आणि पशुपालकांना दिलासा देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाणार, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.**
**२३ ऑक्टोबर २०२६ पासून लागू झालेला हा आदेश पुढील आदेशापर्यंत कायम राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन करून बाहेरील पशुधन चराईसाठी आणल्यास संबंधित पशुपालकांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सत्य

# मेळघाटातील शाळा बांधकामाचा खर्च चर्चेत

## ५० हजारांत उभारलेल्या शाळा आजही मजबूत, मग दुरुस्तीसाठी तीन लाख?

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद शाळांच्या बांधकाम आणि दुरुस्तीच्या खर्चाचा मुद्दा चर्चेत येत आहे. सन १९९५ नंतर ते २००० पूर्वीच्या पाच वर्षांच्या कालावधीत परिसरातील अनेक गावांमध्ये प्राथमिक शाळांच्या खोल्या बांधण्यात आल्या. त्यावेळी एका शाळा खोलीच्या बांधकामासाठी जवळपास ५० हजार रुपयांच्या आत खर्च झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, सुमारे २५ वर्षांचा कालावधी उलटूनही यापैकी अनेक शाळांच्या इमारती आजही उभ्या आहेत.





दुसरीकडे, सध्या जुन्या शाळांच्या खोल्यांची दुरुस्ती, डागडुजी आणि नूतनीकरणासाठी प्रत्येक खोलीमागे जवळपास तीन लाख रुपयांपर्यंत खर्च केला जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे जुन्या बांधकामाचा खर्च आणि सध्याच्या दुरुस्तीच्या खर्चाची तुलना केल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. २५ वर्षांपूर्वी मर्यादित खर्चात उभारण्यात आलेल्या शाळांच्या इमारती आजही अस्तित्वात असताना, सध्याच्या काळात दुरुस्तीवर एवढा मोठा खर्च का येत आहे, याचे स्पष्टीकरण मिळणे आवश्यक आहे. महागाई, बांधकाम साहित्याचे वाढलेले दर, मजुरी आणि कामाचे स्वरूप यामुळे खर्चात वाढ होणे स्वाभाविक असले, तरी प्रत्येक शाळेच्या दुरुस्तीचा अंदाजपत्रकीय खर्च, प्रत्यक्ष केलेली कामे आणि वापरलेल्या साहित्याची गुणवत्ता यांची तपासणी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आज नवीन शाळेची खोली बांधण्यासाठी जवळपास दहा लाख रुपयांपर्यंत खर्च दाखवला जात असल्याचे सांगितले जात आहे. त्याच वेळी, पूर्वी सुमारे ५० हजार रुपयांत बांधण्यात आलेल्या शाळा आणि सध्याच्या बांधकाम व दुरुस्ती खर्चातील तफावत नागरिकांच्या विचाराधीन आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने याबाबत स्पष्ट माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मेळघाटातील विविध गावांमध्ये झालेल्या शाळा बांधकामांची जुनी अंदाजपत्रके, सध्याच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके, प्रत्यक्ष खर्च आणि कामांची गुणवत्ता यांची तुलना केल्यास या वाढत्या खर्चामागील वस्तुस्थिती समोर येऊ शकते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित सार्वजनिक निधीचा विनियोग पारदर्शक पद्धतीने व्हावा आणि प्रत्येक कामाचा खर्च योग्य व आवश्यक असल्याची खात्री व्हावी, हीच नागरिकांची अपेक्षा आहे.

# आरोग्य सेवा आयुक्तांचा अमरावती जिल्हा दौरा

## आरोग्य सुविधांची केली पाहणी

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक संजय काटकर यांचा एक दिवसाचा दौरा संपन्न झाला. त्यांनी जिल्ह्यातील विविध प्रमुख आरोग्य संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन आरोग्य सुविधांची आणि सुरू असलेल्या मोहिमांची पाहणी केली.

दौऱ्यादरम्यान आयुक्त काटकर यांनी जिल्हा स्त्री रुग्णालय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय सुपर (स्पेशालिटी हॉस्पिटल) आणि शिराळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन सद्यस्थितीत सुरू असलेल्या सर्व आरोग्य अभियानांचा व उपक्रमांचा सविस्तर आढावा घेतला.

शिराळा प्राथमिक आरोग्य केंद्रात आयुक्त काटकर यांनी तेथे कार्यरत आशा स्वयंसेविकांशी थेट संवाद साधला. त्यांच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी आशा स्वयंसेविकांकडून मोबाईलवरील ऑनलाईन डेटा एंट्रीच्या कामाची प्रत्यक्षिकासह माहिती जाणून घेतली. आशा स्वयंसेविकांचे काम अधिक सुलभ आणि डिजिटल व्हावे यासाठी त्यांनी टॅब देण्याचे तसेच सर्व आशांसाठी एकसारखा ड्रेस कोड लागू करण्यात येईल असे त्यांनी यावी संवादा दरम्यान सांगितले.

आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या रुग्णांशी आयुक्तांनी संवाद साधून त्यांना मिळणाऱ्या सुविधांबद्दल माहिती जाणून घेतली. यावेळी रुग्णांनी वैद्यकीय सेवांबद्दल समाधान व्यक्त केले. एका कॅन्सरग्रस्त रुग्णाने अत्यंत भावूक होत कृतज्ञता व्यक्त केली. 'प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षा गोहत्रे यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आणि वेळेत मिळालेल्या उपचारांमुळे आपले प्राण वाचले आहेत,' अशी प्रतिक्रिया रुग्णाने दिली.

यावर आयुक्तांनी समाधान व्यक्त करत डॉक्टरांचे कौतुक केले.

दौऱ्यात अकोला वैद्यकीय मंडळाच्या सहाय्यक संचालक डॉ. तरंग वारे, जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद) डॉ. प्रवीण परिसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. पराग राठोड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद नरवणे आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# शाळांना गटशिक्षणाधिकारी मयूर यादव यांनी दिली भेट



**अचलपूर**- पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी मयुर यादव यांनी शहरातील विविध शाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी मुकेरीपुरा येथील नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळेची इमारत ,वर्ग ,परिसराची पाहणी केली.या शाळेतील डिजिटल क्लास रूमला सुद्धा त्यांनी यावेळी भेट दिली .आणि विद्यार्थ्यांशी संवाद ही साधला .अचलपूर पंचायत समितीचे गटशिकाधिकारी मयूर यादव यांनी यावेळी शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांची संख्या ,पिण्याचा पाण्याची व्यवस्था ,परिसराची साफसफाई ,उपस्थितीत शिक्षकांची संख्या बाबत संबंधित मुख्याध्यापकांकडून माहिती घेतला.त्यांच्या या अचानक पाहणी दौऱ्याची सर्वत्र चर्चा होत आहे.

विशेष म्हणजे गटशिकाधिकारी असताना मयुर यादव स्वतः शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसह दुचाकीने विविध शाळांना भेटी दिल्या.

# मातोश्री विमलाबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरावर झेप

**अमरावती/का.प्र.**

क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुलींच्या १९ वर्षाखालील विभागीय शालेय मैदानी स्पर्धा, यवतमाळ येथे संपन्न झाल्या.

यामध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या खेळाडूंनी झालेल्या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत बाजी मारली.

रिले ४×४०० मध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रथम स्थान घेत सुवर्ण पदक जिंकून राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेकरीता पात्रता सिद्ध केली आहे.या ४×४०० रिले संघात सायली निभेकर, सलोनी आगरकर, अनुश्री शेंडे ,भुवनेश्वरी आखरे आणि श्रावणी नेवारे यांचा समावेश होता. तसेच , मुलांच्या अमरावती मध्ये झालेल्या विभागीय शालेय स्केटिंग क्रीडा स्पर्धा वयोगट १७ मध्ये महाविद्यालयाचा खेळाडू मल्हार मुरतकर याने उत्कृष्ट खेळाचे, कौशल्याचे प्रदर्शन करीत रजत पदक प्राप्त करून तो राज्यस्तरीय स्पर्धेकरीता पात्र ठरला आहे.

खेळाडूंनी यशाचे श्रेय महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर स्मिता देशमुख, पर्यवेक्षक ममता राऊत आणि शारीरिक शिक्षक धिरेंद्र चरपे यांना दिले आहे.

खेळाडूंच्या या यशाकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, पर्यवेक्षिका ममता राऊत ,प्रशिक्षक धिरेंद्र चरपे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख आदित्य गावंडे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

# शकुंतला रेल्वे स्टेशनवर सामाजिक उपक्रमातून दिपोत्सव साजरा

## ब्रॉडगेज निर्माणच्या सलग आठव्या वर्षी ४२ व्या टप्प्यात आढावा बैठक

**अचलपूर/वार्ताहर**



शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती अचलपूर व इतर सामाजिक संघटनचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत स्थानिक ऑक्सिजन पार्क येथे आठव्या वर्षीच्या ४२ व्या जनआंदोलनची नियोजन व आढावा बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीत विविध सामाजिक संघटन पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ठरविण्यात आले की ८ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या दिपावली उत्सव हा विविध सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात येणार आहे. दिवाळी प्रथम दिवशी रेल्वे स्टेशन परिसर येथे सकाळी स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून संध्याकाळी गोरगरीब नागरिक यांना फराळ वाटप करून चिमुकले यांना फटाके वाटप करत रेल्वे स्टेशन वर दिपोत्सव साजरा करण्यात येणार आहे.या रेल्वे स्टेशन परिसर मधील स्वच्छता, स्टेशन रंगरंगोटीची सदर जबाबदारी ही मध्य रेल्वे भुसावळची आहे पण गेल्या २०१९ पासून मध्य रेल्वे यांनी शकुन्तला रेल स्टेशन कडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे.आज ही शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीच्या अनेक आंदोलन मुळे तेथील आरक्षण खिडकी सुरू असून महिन्याची २७ लक्ष कमाई असताना सुद्धा तिथे मूलभूत सुविधांचा अभाव आहे. यामुळे या जनआंदोलनची पुढील रूपरेखा योगेश खानझोडे, राजा धर्माधिकारी, संतोष नरेडी, दिपा तायडे, शारदा वुईके यांनी मांडली तर प्रामुख्याने विजय गोंडचवर, वसंतराव धोंबे, कमल केजरीवाल, डॉ दिपक गुल्हने, राजेश पांडे, राजेश अग्रवाल, विजय सातपुते, राजकुमार बरडीया, राजेंद्र जयस्वाल, प्यारेलाल प्रजापती, सुरेश प्रजापती, दयाराम चंदेल सहित प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## सोमवारी 'शरद चांदणे' कविसंमेलन

**अमरावती**- विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती अंतर्गत येत्या २६ ऑक्टोबर २०२६ रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'शरद चांदणे' या विशेष कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शरद ऋतूच्या आल्हाददायक वातावरणात रंगणाऱ्या या काव्यमय सोहळ्याला अमरावतीमधील दिग्गज साहित्यिक आणि कवी हजेरी लावणार आहेत.हा कार्यक्रम संध्याकाळी ६:३० वाजता साईनगर येथील खुशाल गुल्हाने यांच्या 'वरदा' निवासस्थानी (गोकुळ कॉलनी, डी-मार्टच्या मागे, वृंदावन कॉलनीला लागून) पार पडणार आहे.कविसंमेलनाचे अध्यक्षपद प्रा. डॉ. प्रवीण गुल्हाने भूषविणार असून कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम आणि सांस्कृतिक सचिव माधव पांडे उपस्थित राहतील. तसेच, विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. शोभा रोकडे यांची विशेष निमंत्रित म्हणून प्रमुख उपस्थिती असेल. या संपूर्ण कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण संचालन संदीप देशमुख हे करणार आहेत. कविसंमेनात अमरावतीमधील सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी खुशाल गुल्हाने, दीपक दारव्हेकर, आबासाहेब कडू, शिवांगी वेरुळकर, विनोद तिरमारे, डॉ. दिनेश राऊत, ॲड. डॉ. सुरेश चापोरकर, शीतल राऊत, विशाल मोहोड, छाया राऊत बर्वे, कांचन उल्हे, किशोर जऱ्हाड, छाया पाथरे, डॉ.राणी चौधरी, आरती नागपूरे इ. निमंत्रित कवी, कवयित्री सहभागी होत असून सर्वच कविंचा आकर्षक प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

## लाखो भीम अनुयायांनी घेतला शिदोरी भोजनदानाचा लाभ



**चांदूर रेल्वे**-मागील दहा वर्षा पासून धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दीक्षाभूमी नागपूर येथे अजनी येथे मेट्रो पोल क्रमांक २३८/२३९ येथे परतीच्या प्रवासात परत जाणाऱ्या लाखो भीम अनुयायांनी घेतला शिदोरी भोजनदानाचा लाभ घेतला. यावेळी अभियानाच्या स्टॉल चे उद्घाटन अभियान प्रमुख जगदीश शिंदे , रमेश कवाडे (गुलबर्ग कर्नाटक), उत्तम श्रीरामे, डॉ. प्रा.प्रवीण राऊत, धर्मपाल गणवीर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गजलकर गुलाबराव मेश्राम, शारदा राऊत, नानासाहेब भवरे, माजी सैनिक मुकिंदा गवई, डॉ मिलिंद गजभिये, उज्वला कटारणे सह महिला संघटिका उपाध्यक्ष पपीता मनोहरे, अभियान कोषाध्यक्ष इंदुताई नारनवरे, जिल्हाअध्यक्ष अमरावती बंडु आठवले, काशिनाथ गजभिये, सुशीला दिघाडे उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी व धम्मदान करण्यासाठी सुधीर वानखडे, पद्माकर वहिले, मृदुला हेरोडे, सिंधू लोखंडे, समिता पंचभाई, तालुका अध्यक्ष धामणगाव रेल्वे ज्योती मेश्राम, लता बागडे, अरुणा आठवले, रश्मी नारनवरे, विजय सोनटक्के, मनोज गवई, प्रदीप कोकाटे, रमेश गडलिंग, विवेक दहाटे सह अभियानातील कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.प्रास्ताविक पपीता मनोहरे संचालन करुणा मून आभार प्रदर्शन ज्योती मेश्राम यांनी केले.

## विनापरवाना प्रवासी वाहतुकीवर कारवाई करा

### ई-रिक्षांसाठी परवाना सक्तीची संघटनेची मागणी

**अमरावती/का.प्र.**

शहरात परजिल्ह्यातील रिक्षांची संख्या वाढल्याने स्थानिक रिक्षाचालकांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचा आरोप ट्रायबल फोर्स चालक-मालक ऑटो युनियनने केला आहे. विनापरवाना प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी आणि ई-रिक्षांसाठी परवाना सक्तीचा करावा, अशी मागणी संघटनेने राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, अमरावती शहरात बाहेरील जिल्ह्यांतील अनेक रिक्षा प्रवासी वाहतूक करत आहेत. त्यामुळे स्थानिक परवानाधारक चालकांना प्रवासी मिळण्यात अडचणी येत असून, त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. याचा आर्थिक फटका चालकांच्या कुटुंबांनाही बसत असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.शहरात सुमारे १५ ते २० हजार रिक्षा रस्त्यावर असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

या परिस्थितीमुळे वाहतूक कोंडीची समस्याही वाढत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

युनियनचे जिल्हाध्यक्ष संतोष सुभाषराव किरनाके यांनी संबंधित विभागांनी या प्रकरणाची दखल घेऊन विनापरवाना वाहनांची तपासणी करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.परिवहन विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वय साधून स्थानिक रिक्षाचालकांच्या समस्येवर तोडगा काढावा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

# १५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आर्वीच्या दाम्पत्याला जुळया बाळांचा आनंद!

**अमरावती/का.प्र.**

तब्बल १५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आर्वी येथील एका दाम्पत्याच्या आयुष्यात जुळ्या बाळांच्या आगमनाने आनंदाची पहाट उजाडली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथील नव्याने सुरू झालेल्या अंकूर सेंटरमध्ये पहिल्या आयव्हीएफ बाळांचा जन्म झाला असून, ही संस्था आणि वैद्यकीय पथकासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. आर्थिक अडचणींवर मात करून मातृत्वाचे स्वप्न साकार झाल्याने या यशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

आर्वी येथील ३८ वर्षीय सान्वी (नाव बदललेले) यांचा विवाह होऊन १५ वर्षे झाली होती. अपत्यप्राप्तीसाठी त्यांनी अनेक ठिकाणी उपचार घेतले; मात्र यश मिळाले नव्हते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने कपडे शिवून उदरनिर्वाह करणाऱ्या सान्वी यांच्यासाठी प्रगत वंध्यत्व उपचार घेणे आव्हानात्मक होते. अपत्यप्राप्तीच्या दीर्घ प्रतीक्षेमुळे कुटुंबावर भावनिक आणि आर्थिक ताणही वाढला होता.अखेर त्यांनी पीडीएमएमसी येथील वंध्यत्व बाह्यरुग्ण विभागात संपर्क साधला. विभागाच्या प्रमुख डॉ. सुरेखा तायडे यांनी त्यांची तपासणी केली असता, गेल्या सहा महिन्यांपासून मासिक पाळी बंद असल्याचे आणि अंडाशयातील अंड्यांचा साठा अत्यंत कमी झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे गर्भधारणेची शक्यता अनिश्चित होती. रुग्णाची वैद्यकीय स्थिती आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. तायडे व त्यांच्या पथकाने दाम्पत्याचे समुपदेशन केले आणि महाविद्यालयात आयव्हीएफ उपचार घेण्याचा सल्ला दिला. सुरुवातीला आर्थिक अडचणींमुळे सान्वी साशंक होत्या; मात्र डॉक्टरांच्या पथकाने त्यांना धीर देत उपचारासाठी प्रोत्साहित केले.




## पीडीएमएमसी येथील अंकूर सेंटरमध्ये पहिल्या आयव्हीएफ बाळांचा जन्म

### पहिल्याच आयव्हीएफ उपचार चक्राला यश

आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या अंकूर सेंटरमध्ये सुरू करण्यात आलेले हे पहिलेच आयव्हीएफ उपचार चक्र होते. त्यामुळे या उपचारांचे यश हे रुग्णासाठी मातृत्वाचा आनंद देणारे ठरलेच, शिवाय केंद्रातील वैद्यकीय आणि प्रयोगशाळा यंत्रणेची कार्यक्षमता सिद्ध करणारा महत्त्वाचा टप्पाही ठरला.डिसेंबर २०२५ मध्ये सान्वी यांची अंडपेशी संकलन प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. प्रयोगशाळेत चांगल्या गुणवत्तेचे भ्रूण विकसित झाल्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये भ्रूण प्रत्यारोपण करण्यात आले. त्यानंतर गर्भधारणा चाचणी सकारात्मक आली. पहिल्या सोनोग्राफीमध्ये जुळी गर्भधारणा असल्याचे स्पष्ट झाल्याने सान्वी आणि संपूर्ण वैद्यकीय पथकाचा आनंद द्विगुणित झाला.

### उच्च जोखमीच्या गर्भधारणेत डॉक्टरांचे विशेष प्रयत्न

जुळी गर्भधारणा असल्याने सान्वी यांच्यावर संपूर्ण कालावधीत विशेष वैद्यकीय देखरेख ठेवण्यात आली. गर्भधारणेच्या २०व्या आठवड्यात पोटदुखीमुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर गर्भाशयाच्या मुखाभोवती टाका घालण्याची प्रक्रिया करण्यात आली. पुढे गर्भजलाची पिशवी वेळेपूर्वी फुटण्याची समस्या निर्माण झाली. अशा आव्हानात्मक परिस्थितीतही डॉक्टरांनी योग्य उपचार आणि नियमित निरीक्षणाद्वारे गर्भधारणेची काळजी घेतली.विशेष म्हणजे, आर्थिक परिस्थितीमुळे उपचारांमध्ये अडथळा येऊ नये म्हणून गर्भधारणेदरम्यान आवश्यक वैद्यकीय सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या.

गर्भधारणेच्या ३४व्या आठवड्यात सान्वी यांना प्रसूतीकळा सुरू झाल्या. पहिल्या बाळाची गर्भातील स्थिती तिरकी असल्याने सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती करण्यात आली. तब्बल १५ वर्षांची प्रतीक्षा संपल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.आयव्हीएफ विभागाच्या प्रमुख डॉ. सुरेखा तायडे यांनी हे केंद्र प्रत्यक्षात साकारण्यासाठी दूरदृष्टी आणि प्रयत्न केल्याबद्दल अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे, तसेच सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे यांचे आभार मानले.या यशात विभागप्रमुख डॉ. पुष्पा जुनघरे, डॉ. आशिष मशानकर, डॉ. सोनल काळे, डॉ. स्वप्नील मोहोड, भरत हरपुडे, भूलशास्त्र विभागाचे पथक, IVF प्रयोगशाळेतील तंत्रज्ञ, परिचारिका आणि इतर सहकारी कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

जुळ्या बाळांचा जन्म हा केवळ एका आयव्हीएफ उपचार चक्राचा विजय नसून, पालकत्वाचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक दाम्पत्यांसाठी आशेचा नवा किरण आहे.अंकूर आयव्हीएफ सेंटरच्या संपूर्ण पथकाचे आणि डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथील सर्व संबंधितांचे या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रपती आणि राष्ट्रसंत!गुरुराया चरणी उसंत !!.

**हे गुरुदेव!हम सबको सद्बुद्धी दे सतकर्तव्य करणे की प्रवृत्ती दे! सच बोलणे का अभ्यास दे! सत्स्वरूप का ज्ञान दे!!**

अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे संस्थापक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आश्रमातील दैनिक ध्यान का पाठ प्रणाली प्रातःकाळी अविरत सुरू आहे.त्याचा प्रचार–प्रसार देश विदेशात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वाड्मय व साहित्याच्या अभ्यासकांनी जीवन का उजियारा, गुरुदेव हमारा प्यारा म्हणून आत्मसात केले आहे.कारण गुरुदेव ही व्यापकता लघुला समावेशित करून गुरुपदी स्थित करते.

त्यामुळे 'गुरुदेव हमारा प्यारा हैं जीवन का उजियारा,उनके खातिर प्राण तजेंगे!!' एवढे म्हणण्यापर्यंतचे समर्पण प्रत्येकात विराजमान करण्याचे सामर्थ राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जगण्यातून अखिल भारताने अनुभवण्याचा पुरावा म्हणजे;स्वतंत्र भारताचे आद्य राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाप्रतीचे प्रेम संबंध होय.

विदर्भाच्या भूमीत जगाला आवळण्याचे सामर्थ्य असणाऱ्या महापुरुषाच्या किती तरी घटना नोंदवल्या आहे.मग ते भगवान श्रीकृष्ण यांच्या सासर कौंडण्यपूरचे पौराणिक रुक्मिणी स्वयंवराचे दाखले असो;की कवी कालिदास यांच्या मेघदूतानिमित्त रामटेक परिसरातील काव्य शृंखला असो, जी जगविख्यात शेक्सपियर यांच्या साहित्याच्या तुलनेत अस्सल असल्याचे संशोधन आहे.

स्वातंत्र्याचा लढा शेगाव उर्फ सेवाग्राम(वर्धा) आश्रम याच वैदर्भीय मातीतून चले जाव!! जगाच्या पाठीवर घुमणारा नारा असो. हे सर्व भौगोलिक, ऐतिहासिक,सांस्कृतिक, पौराणिक पुरावे स्पष्ट करणारा प्रसंग अभ्यासताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साक्षात्कारी भूमिकेतून त्यांच्या पारलौकिक ऊर्जेचा उपयोग घेण्याची संधी याची देही याची डोळा उपलब्ध आहे ही प्रचिती येते.म्हणून याचा विचार सर्वदूर व्हावा एवढा मानस प्रत्येकाने ठेवला तर अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कार्य तुझे ना माझे करण्यात आपला सत्यानाश होण्यापासून आपण अलिप्त राहू या का? हा प्रश्न प्रत्येकाला पडावा एवढी विपुलता राष्ट्रसंतांच्या संगतीत असणाऱ्या महापुरुषाच्या जीवन



परिचयातून दिसते.

याचे उदाहरण म्हणजे राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या समवेत गुरुकुंज आश्रम येथे प्रत्यक्ष प्रार्थना मंदिरात हजेरी लाऊन सामुदायिक प्रार्थनेत संमेलीत होणे हे होय.काळ निघून गेला तरी ऊर्जा अक्षय असतेच! स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नव 'भारत' निर्माण प्रक्रियेत संविधान ग्रंथाच्या आधाराने देशाचा कारभार संचलित व्हावा ही धारणा तत्कालीन महापुरुषांची होती.त्यांच्या दूरदृष्टीचे अवलोकन म्हणजे त्यांनी जनसेवेसाठी स्थापित केलेले शैक्षणिक क्षेत्र व आरोग्य सेवा केंद्र होय.

राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांना अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या अंतर्गत आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या उद्घाटनाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज घेऊन येतात त्यावेळच्या प्रसंगाची माहिती जवळपास सर्वांना असावी.सांगण्याचे तात्पर्य एवढेच की उर्जा अखंड राहते म्हणजे ज्या साक्षात्कारी विभूतीने ईश्वरीतत्व अनुभवले,त्यांना बोध झाला त्यांचे आयुष्य जनकल्याणासाठी समर्पित झाले.याचे उदाहरण म्हणजे बुद्धांचा इतिहास आजपर्यंत ही जिवंत आहे.त्यात बदल करताना मानववंशाची हानी निश्चित आहे.याचा पुरावा देण्यासाठी अहिंसा हा निसर्ग नियम अनुभवला गेला पाहिजे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'हाती न घेता तलवार बुद्ध राज्य करी जगावर!' ही ओळ ग्रामगीतेत भगवान बुद्धाचा आदर्श स्पष्ट करताना नोंदविली आहे.त्यामुळे बोध होण्याचे परिमाप राष्ट्रसंतांच्या साहित्य अनुभवातून उलगडते, त्यासाठीच राष्ट्रसंत हे स्वतंत्र भारताचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांना गुरुदेव चरणी उसंत घेण्याची संधी उपलब्ध करून देतात.

विनम्रपणे 'बघ शुद्ध आसन खादीचे, वर गोल तकिया शोभला! हा निल दीपक दावितो, शुद्ध सात्विक ही कला' अशा वर्णनात गुरुदेवांचे स्थान स्पष्ट करून त्यांना अभिवादन करण्यासाठी भारताच्या सर्वोच्च पदाधिकाऱ्याला नतमस्तक करणारी शक्ती राष्ट्रसंतांच्या स्नेहात डॉ.प्रसाद अनुभवतात.ही उपलब्धता अखिल भारतीय श्री.गुरुदेव सेवा मंडळाची आहे.त्यामुळे श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे कार्य हे भारतीय जनतेचे नक्कीच असल्याचे म्हणता येईल.त्यासाठी फक्त राष्ट्रसंतांच्या विचारश्रेणीचा अभ्यास व्हावा म्हणजे त्याचा ध्यास नक्कीच लागतो म्हणजे 'सेवा करणे को दास की परवा न हो जान की,!! आणि छोडे नहीं घरे दार पर हो मस्त गुरु चरणार में अशी सामुदायिक प्रार्थना विश्वकल्याणाची साधना नक्कीच असल्याचे स्पष्ट होते.

त्यासाठीच मला हवा माणूस भला!!भीक मागता प्रभू दिसला ह्या भजनाच्या गुढार्थाची उकल करणे आवश्यक आहे.२४ ते ३१ऑक्टोबर २०२६ कालावधीत गुरुकुंज मोझरी येथे ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवाचे निमित्ताने राष्ट्रसंतांच्या कार्यमहिमीचे व राष्ट्रनिर्मितीच्या कार्याचे योगदान समजून जगण्यात उमजून घेण्याची संधी उपलब्ध आहे.फक्त निर्धार पाहिजे मनाचा !!जय गुरू.

**कबीर फादर**,अमरावती
मो.७७९८६४५५६५.



# मजूर आमदार

**वि**दर्भातील अमरावतीमध्ये आमदारकीची निवडणूक जाहीर झाली आणि सगळ्या पक्षांनी आपापले उमेदवार उभे केले. एका बाजूला कारखानदार सेठजी, दुसऱ्या बाजूला वकील साहेब, आणि तिसऱ्या बाजूला उभा राहिला..आपला बंडू पेंटर!

बंडू पेंटर खरा मजूर.आयुष्यभर इमारतींना रंग दिला.हातात कायम ब्रश, डोक्यावर टोपी आणि तोंडात एकच वाक्य 'काम झाले पाहिजे साहेब, बोलणे नको!'

संख्येने जास्त असलेल्या सर्व प्रकारच्या मजूर स्त्री पुरुषांनी यावेळी खुप विचार केला, नेहमी तर शिकलेले लोक आमदार होतात आणि आपले प्रश्न काही सुटत नाहीत. यावेळी आपल्यातलाच एक मजूर निवडून देऊया. आणि काय आश्चर्य, बंडू एका मताने नव्हे, तर दहा हजार मतांनी निवडून आला.

बंडू पहिल्या दिवशी मंत्रालयात गेला.सगळे आमदार कोट-पँट घालून आले, बंडू आला त्याच्या नेहमीच्या कपड्यात- रंग लागलेला शर्ट घातलेला आणि पायात दोन पट्ट्याची चप्पल.घालून आलेला.

सेक्रेटरी म्हणाला, 'आमदार साहेब, तुमचा ड्रेस कोड?'बंडू म्हणाला, 'साहेब, मी मजूर आमदार आहे. माझा ड्रेस कोड हाच.तुम्ही फाईलवर सही करता, मी भिंतीवर.दोघांचं काम सारखंच - डाग मिटवायचे!'

सगळे हसले पण बंडूचे म्हणणे खरे होते. त्याला कळत होते, मजुराला काय लागते - वेळेवर पगार, पिण्याचे स्वच्छ पाणी, पोरांना शाळा, आणि आजारी पडल्यावर दवाखाना. हेच तर ज्वलंत खरे प्रश्न ! ही ते जाणून होता.

पहिला प्रश्न आला बंडू भाऊसमोर आला.जो त्याने नेहमीच अनुभवलेला होता.- वस्तीतले नळ बंद. पाणी नाही म्हणून महिला मोर्चा घेऊन आल्या होत्या.इतर आमदार असते तर - 'मी आयुक्तांना पत्र लिहितो, मी बैठक लावतो' असे म्हणाले असते.

बंडू काय म्हणाला? त्याने थेट जलविभागाच्या ऑफिसला भेट दिली. तिथे पाईप पडलेले. बंडूने स्वतःच पान्हा आणि पक्कड हातात घेतला आणि म्हणाला, 'चला, मीच करतो. तुम्ही फक्त बघत बसा!'

अर्ध्या तासात नळ सुरू! बायका म्हणाल्या, 'असा आमदार पहिल्यांदाच बघितला, जो भाषण नाही, तर काम करतो!'दुसऱ्या दिवशी दुसरी समस्या उभी राहिली. रस्त्यावर खड्डे. बंडूने कॉन्ट्रॅक्टरला बोलावले. कॉन्ट्रॅक्टर म्हणाला,'साहेब,टेंडर, एस्टिमेट...'

बंडू म्हणाला, 'एस्टिमेट गेले उडत! उद्या सकाळी ६ वाजता मी आणि माझी मजूर टीम येणार. सिमेंट मी आणतो, तू फक्त मुरूम टाक. नाहीतर तुझे टेंडर मीच बुजवून टाकीन!'

दुसऱ्या दिवशी खड्डा बुजले होते.

जनतेची अपेक्षा साधी होती - 'आमदार भेटला पाहिजे.'बंडूने काय केले? त्याने आमदार निवासाच्या बाहेर पाटी लावली - 'भेटायला टोकन नको. सकाळी ७ ते ९ चहा माझ्याकडे. तुमची समस्या घेऊन या, रिकाम्या हाताने जाऊ नका.'.

बंडूला लोक आता बंधू भाऊ म्हणू लागले.

बंधू भाऊ.आमदाराची अपेक्षा काय होती? लोकांनी काम केले पाहिजे. तो म्हणायचा, 'मी तुमचा रस्ता बनवीन, पण कचरा तुम्ही टाकू नका. मी शाळा देईन, पण पोरांना तुम्ही शिकवा. मी फक्त रंग देणार, घर तुम्ही स्वच्छ ठेवायचे!'

एक वर्ष झाले. बंडूचा रिपोर्ट कार्ड बघायला मुख्यमंत्री स्वतः आले.ते म्हणाले, 'बंडूभाऊ तुमच्या मतदारसंघात तक्रारच नाही, असे कसे?'

बंडू हसला आणि म्हणाला, 'साहेब, सोपे आहे.मी लोकांना सांगितले, तक्रार करायची असेल तर स्वतः फावडे घेऊन या. मी पण घेईन, आपण दोघे मिळून करू. तेव्हापासून लोक विचार करतात फावडं उचलण्यापेक्षा तक्रारच न केलेली बरी!'

मुख्यमंत्री पोट धरून हसले. आणि बंडूभाऊला पुरस्कार दिला 'सर्वात कमी खर्चात जास्त काम करणारा आमदार!'

बंडू भाऊघरी आले, बायको म्हणाली, 'आता तरी चांगले कपडे घाला.'

बंडूभाऊ म्हणाले, 'अगे, मी मजूर आमदार आहे. जर मी साहेब झालो, तर मजुरांचे ऐकणार कोण?'आणि खरंच, आजही अमरावतीत कोणी पेंटरला हाक मारली की म्हणतात..'ए आमदार, जरा इकडे ये, रंग मारायचाय!'

बंडूभाऊ खरा आमदार आहेच, जे खुर्चीवर नाही, तर लोकांच्या मनात बसतात.



ग्रामगीताचार्य,
**डॉ शोभा गायकवाड,**
अमरावती

# भुलाबाईना निरोप देताना...

**सा**ठ पासष्ट वर्षापूर्वीचा तो काळ.भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी गणपती विसर्जनानंतर दुसरे दिवशी गावात गणपतीयात्रा भरायची. या यात्रेतूनच बाहुल्या विकत आणून त्यांचा एक महिन्यातचा मुक्काम घरोघरी असायचा. घराच्या आसपासची आम्ही मुले मुली सायंकाळच्यावेळी भुलाबाईची गाणी म्हणायला जात. या गाण्यांमध्ये गावखेडयातील तत्कालीन संस्कृतीची पुर्ण झलक उमटायची, गाण्याची सुरवातच मोठी रंजक असायची.'पहिली गं पूजाबाई देवा देवा सा देव.... ' या उत्सावातील प्रत्येक गाणे अर्थपुर्ण, प्रवाही व मनाला उल्हासित करणारे असायचे. 'अडकीत जावू, खिडकीत जावू, खिडकीत होता बत्ता, भुलाबाईला लेक झाला, नाव ठेवा दत्ता '. अश्यावेळी हजर असलेल्या मुलात जर दत्ता नावाचा मुलगा असेल, तर त्याच्या आनंदाला पारावार नसायचा.माहेरहून आलेल्या व्यक्तीचे सासुरवाशीण सुनेला फार कौतुक असायचे, त्या व्यक्तीचे वर्णन सुध्दा पुढील ओळीतून अचूक व्यक्त होत असे.'आला गं माहेरचा वैद्य आला. डोक्यात टोपी रेशमाची, अंगात कपडे जरी काठी, दिसतो कसा बाई राजवानी बाई राजवानी' या वाक्यातून माहेरहून आलेली व्यक्ती सुंदर, रुबाबदार वैभव संपन्न असल्याची झलक डोकावत होती. याच्या उलट सासरहून आलेल्या इसमाचे वर्णन -'आला गं सासरचा वैद्य आला..... शेवटच्या ओळीत'दिसतो कसाबाई भिकाऱ्यावानी बाई



भिकाऱ्यावानी गावात पूर्वी सासू -सुनेचे नाते जरा ओढातानीचेच असायचे. 'कारल्याची बी लाव गं सुनबाई, मग जाय आपल्या माहेरा, माहेरा. नंतर कारल्याचा वेल निघू दे गं सुनबाई, मग जाय आपल्या माहेरा.' असे करत करत टप्याटप्याने कारल्याची भाजी खाऊन झाल्यावरही सासूबाईचा जीव शांत होत नव्हता, व सुनेला माहेरी जाऊ देण्यात अडथळे उभे करायची.यात सासूबाईच्या वागण्यातील आढयता आणि नवीन सुनबाईची माहेरप्रती असलेली आत्यांतिक ओढ अधोरेखित केली आहे. त्याच प्रमाणे ननंद सुनेचे नाते सुद्धा बहुतांशवेळी सलोख्याचे नसते, व नणंद नेहमी तीला कात्रीत पकडण्यासाठी टपून बसलेली असते. पुढील ओळीत हे चित्र स्पष्ट दिसून येते. 'एक पापड भाजला, चुलीमागे ठेवीला! नणंदबाई नी देखीला, सासुजवळ सांगितला, सासूने केला हडबळा, धाडा तीला माहेरा' अशाप्रकारे ही गाणी खूप सूचक व लक्षवेधी वाटायची.डबाबंद खाऊ ओळखणे म्हणजे फारच जिकिरीचे पण तेवढेच उत्कंठाजनक असायचे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीनुरूप डब्यात खाऊ असायचा.शेंगदाणे, फुटाणे, शंकरपाळे, शेव चिवडा पापडी, तर कधी पेपरमिंटच्या गोळ्या, लहान बिस्किट, तर कधी घरगुती खारोड्या, वाळली गावरानी बोरं असायची. डब्यात नेमकं काय असेल याचा प्रत्येकजण अंदाज बांधायचा, आणि ज्याचा अंदाज अचूक निघाला, तो सर्वांच्या प्रशंसेस पात्र ठरायचा. महिन्याभरा च्या अवधीत तेव्हा मी सहा वेळा डब्यातील खाऊ ओळखू शकलो, त्यावेळी आजच्या शब्दात सांगायचे म्हणजे ऑलिम्पिक जिंकून आल्याचा आनंद व्हायचा.

कोजागिरी पौर्णिमेला रात्री उशिरा पर्यंत गाण्याच्या अनेक फैरी व्हायच्या.संबंध मोहल्ला भर गाण्यांचा आहाट पसरत असे, आणि ते खूप छान वाटायचे. उद्यापासून ही गाणी बंद होतील या कल्पनेने माझे बालसुलभ मन खिन्न व्हायचे.दुसरे दिवशी बाहुल्याना आम्ही शेतात न्यायचो. सोबत बाहुल्यासाठी पिवळ्या फडक्यात लहानसी शिदोरी असायची.त्यांचे पुन्हा एकदा पूजन, आरती करून जड मनाने घरची वाट धरत होतो. गतकाळातील गोड आठवणीच्या खुणा कधीही मिटत नाही. अत्यंत श्रध्येने दोन्ही हात जोडून अखेरचा हा तुला दंडवत, सोडून जाते गाव.अशाच काहीशा भावना मनात उमाटतात.

**-डॉ राजेंद्र भुयार,**
अम- ९५०३०४ ६५५५






# रिजीम चेंज:सत्तेची उलथापालथ की व्यवस्थेचा आमूलाग्र बदल?

## जागतिक राजकारणातील सत्तासंघर्ष, जनआंदोलने आणि भारताच्या लोकशाहीसमोरील प्रश्न

**जा**गतिक राजकारणात आज 'रिजीम चेंज' (Regime Change) ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. एखाद्या देशातील सत्ताधारी बदलणे म्हणजे रिजीम चेंज नव्हे, तर त्या देशातील सत्तेची रचना, शासनपद्धती, धोरणांची दिशा आणि राजकीय व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडणे होय. इतिहास साक्षी आहे की काही व्यवस्थाबदलांनी लोकशाहीला नवी दिशा दिली, तर काहींनी संपूर्ण देशांना अस्थिरता, हिंसाचार आणि आर्थिक संकटाच्या गर्तेत ढकलले. त्यामुळे प्रश्न केवळ कोण सत्तेत आले आणि कोण सत्तेतून गेले हा नसून, त्या परिवर्तनातून सामान्य जनतेच्या आयुष्यात नेमका काय बदल घडला, हा आहे.

१९७९ मध्ये इराणमध्ये शाह मोहम्मद रझा पहलवी यांच्या राजवटीविरोधात झालेल्या क्रांतीने राजेशाहीचा अंत केला आणि इस्लामिक रिपब्लिकची स्थापना झाली. ही घटना व्यवस्थाबदलाचे ठळक उदाहरण आहे. मात्र, राजेशाही संपल्यानंतर उदयास आलेल्या व्यवस्थेने राजकीय स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या अधिकारांबाबत कोणते प्रश्न निर्माण केले, यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की जुनी व्यवस्था उलथवणे आणि सर्वसमावेशक लोकशाही निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. क्रांतीच्या घोषणा मोठ्या असू शकतात; पण तिचे यश नागरिकांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याच्या आणि न्यायाच्या कसोटीवरच ठरते.

२००३ मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आघाडीने इराकवर आक्रमण केले आणि सद्दाम हुसेनची राजवट कोसळली. त्यानंतर नवीन राजकीय व्यवस्था उभारण्याचे प्रयत्न झाले; परंतु हिंसाचार, सांप्रदायिक संघर्ष, दहशतवाद आणि संस्थात्मक अस्थिरतेने देशाला दीर्घकाळ ग्रासले. २०११ मध्ये लिबियातील मुअम्मर गद्दाफी यांची राजवटही उठाव आणि नाटोच्या लष्करी हस्तक्षेपाच्या पार्श्वभूमीवर कोसळली. मात्र, त्यानंतर सशस्त्र गटांचे वर्चस्व आणि राजकीय संघर्ष कायम राहिले. या दोन्ही घटनांनी जगाला कठोर धडा दिला की एखाद्या हुकूमशहाला सत्तेवरून हटवणे शक्य असते; पण त्यानंतर स्थिर, न्याय्य आणि लोकाभिमुख व्यवस्था निर्माण करणे हे अधिक कठीण आव्हान असते. लोकशाही बाहेरून लादता येते का, की तिची मुळे स्थानिक समाजात रुजावी लागतात, हा प्रश्न आजही महत्त्वाचा आहे.

अफगाणिस्तानचा अनुभवही तितकाच बोलका आहे. २००१ मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखालील लष्करी हस्तक्षेपानंतर तालिबानची सत्ता कोसळली आणि नवीन राजकीय व्यवस्था उभी राहिली. मात्र, १५ ऑगस्ट २०२१ रोजी तालिबानने पुन्हा काबूलचा ताबा घेतला आणि तत्कालीन सरकार कोसळले. त्यानंतर विशेषतः महिला आणि मुलींचे शिक्षण, रोजगार आणि मूलभूत अधिकार यांबाबत गंभीर चिंता निर्माण झाल्या. दोन दशकांच्या हस्तक्षेपानंतरही राजकीय व्यवस्था टिकू शकली नाही, यावरून केवळ लष्करी ताकद पुरेशी नसते; लोकांचा विश्वास, सक्षम संस्था आणि सामाजिक वास्तव समजून घेणारे नेतृत्वही आवश्यक असते, हे स्पष्ट होते.

दुसरीकडे, बांगलादेशात ऑगस्ट २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप धारण केले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा दिला आणि त्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन झाले. या घटनेने विद्यार्थ्यांची संघटित ताकद, जनतेचा असंतोष आणि राजकीय उत्तरदायित्वाची मागणी सत्तेची समीकरणे बदलू शकते, हे दाखवून दिले. मात्र, कोणत्याही जनआंदोलनाचे अंतिम यश केवळ सत्ताबदलात नसते; त्यानंतर लोकशाही संस्था मजबूत होणे, नागरिकांचे अधिकार सुरक्षित राहणे आणि देशात स्थैर्य निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे असते.

दक्षिण आफ्रिकेचा अनुभव यापेक्षा वेगळा आणि प्रेरणादायी आहे. अनेक दशकांच्या संघर्षानंतर वर्णद्वेषी अपार्थाइड व्यवस्थेचा अंत झाला. २७ एप्रिल १९९४ रोजी सर्व वंशांच्या नागरिकांना मतदानाचा अधिकार देणारी पहिली लोकशाही निवडणूक झाली आणि नेल्सन मंडेला राष्ट्राध्यक्ष बनले. पुढे नवीन संविधान स्वीकारण्यात आले. या परिवर्तनाने दाखवून दिले की व्यापक जनसंघर्ष, संवाद, घटनात्मक मूल्ये आणि सर्वसमावेशक लोकशाही यांच्या माध्यमातूनही व्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणता येतो.

या जागतिक घटनांच्या पार्श्वभूमीवर भारतातील लोकशाहीकडे पाहणे आवश्यक आहे. भारत हा संविधानाधारित संसदीय लोकशाही देश आहे. येथे निवडणुकांद्वारे सरकार बदलणे ही लोकशाहीची ताकद आहे; मात्र सरकार बदलणे म्हणजे संपूर्ण घटनात्मक व्यवस्था बदलणे नव्हे. भारताच्या लोकशाहीची खरी शक्ती संविधानाची सर्वोच्चता, स्वतंत्र न्यायपालिका, निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया, मुक्त प्रसारमाध्यमे आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांमध्ये आहे. कोणताही पक्ष सत्तेत असो, त्याला प्रश्न विचारण्याचा अधिकार जनतेला असलाच पाहिजे. विरोधी मत म्हणजे देशविरोध नव्हे आणि सत्तेवर टीका करणे म्हणजे लोकशाहीला कमकुवत करणे नव्हे; उलट सत्तेला उत्तरदायी ठेवणे हेच लोकशाहीचे बळ आहे.

भारताला आज गरज आहे ती केवळ सत्तांतराची नाही, तर सत्तेच्या स्वभावात परिवर्तन घडवण्याची, प्रशासनात पारदर्शकता आणण्याची आणि




सामान्य नागरिकाला न्याय मिळवून देण्याची. सरकार बदलले, पण बेरोजगारीचा प्रश्न सुटला नाही; विकासाच्या घोषणा झाल्या, पण आर्थिक विषमता कमी झाली नाही; लोकशाहीची भाषा बोलली गेली, पण नागरिकांचे अधिकार दुर्बल झाले, तर त्या परिवर्तनाच्या यशाचे मूल्यमापन कठोरपणे झालेच पाहिजे. हे कोणत्याही एका पक्षापुरते मर्यादित नसून प्रत्येक सत्ताधाऱ्याला लागू होणारे तत्त्व आहे.

शेवटी, रिजीम चेंजची खरी कसोटी कोण सत्तेत आले यावर नाही, तर सत्तेचा वापर कसा केला जातो यावर ठरते. इराण, इराक, लिबिया, अफगाणिस्तान, बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिका या घटनांचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी त्यांच्यातून मिळणारा संदेश स्पष्ट आहे: सत्ताधारी बदलणे ही राजकीय घटना असते; पण सामान्य माणसाला न्याय, स्वातंत्र्य, समान संधी आणि सन्मान मिळवून देणारी व्यवस्था उभी करणे, हेच खरे परिवर्तन असते. भारताची खरी ताकद एखाद्या नेत्यात किंवा पक्षात नसून संविधानात आणि जागरूक नागरिकांमध्ये आहे. खुर्ची बदलणे सोपे असते; सत्तेचा स्वभाव बदलणे कठीण असते. आणि जेव्हा सत्ता संविधानापुढे उत्तरदायी ठरते, तेव्हाच लोकशाही खऱ्या अर्थाने जिवंत राहते.

**ॲड.धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# सराईत गुन्हेगार शरद सहारेवर एमपीडीएची कारवाई

## एक वर्षासाठी स्थानबद्ध : जिल्हा कारागृहात रवानगी

■ प्रतिनिधी | अकोला ■

विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभाग असलेल्या आणि यापूर्वीच्या प्रतिबंधात्मक कारवायांनाही न जुमानणाऱ्या शरद अशोक सहारे (३३, रा. सुदर्शन नगर, अकोट) याच्यावर महाराष्ट्र झोपडपट्टीदादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाई करण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले असून, २३ ऑक्टोबर रोजी त्याची अकोला जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली. जिल्ह्यात सन २०२६ मध्ये या कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आलेला तो १३ वा धोकादायक इसम आहे.



पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद सहारे याच्याविरुद्ध जबरी चोरी, बलाद्ग्रहण, बेकायदेशीररीत्या डांबून ठेवणे, रात्रीच्या वेळी घरफोडी, चोरी, पुरावा नष्ट करणे, लोकसेवकाच्या आदेशाचे उल्लंघन, शांतताभंगाच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारी धमकी देणे, बेकायदेशीररीत्या अग्निशस्त्र व शस्त्रे बाळगणे आणि हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करणे आदी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.त्याच्याविरुद्ध यापूर्वी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि हद्दपारीची कारवाई करण्यात आली होती. सन २०२४ मध्ये त्याला एका वर्षासाठी स्थानबद्धही करण्यात आले होते. मात्र, या कारवायांचा अपेक्षित परिणाम झाला नसल्याचे पोलिसांच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले. त्यामुळे त्याच्या कथित गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी एमपीडीए कायद्यान्वये कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी शरद सहारे याला स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे पाठविला होता. प्रस्तावातील कागदपत्रे आणि कायदेशीर बाबींची पडताळणी केल्यानंतर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी एक वर्षासाठी स्थानबद्धतेचे आदेश जारी केले. त्यानुसार पोलिसांनी सहारे याचा शोध घेऊन आदेशाची बजावणी केली आणि त्याला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध केले.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, अकोटचे सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, पोलीस उपनिरीक्षक माजिद पठाण, पोलीस हेड कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर सैरिसे, पोलीस कॉन्स्टेबल उदय शुक्ला, अकोट शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते तसेच पोलीस अंमलदार गणेश सोळंके, नरेंद्र जाधव, नंदकिशोर कुलट, गजानन राठोड, सुबोध खंडारे, राम भगत, कपिल राठोड, नितेश सोळंके, विपुल सोळंके, मोहन दुर्गे, अश्विन चव्हाण आणि विशाल दरोकार यांनी कारवाईत सहभाग घेतला.

### सण-उत्सव काळात कठोर कारवाईचा इशारा

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि शांतता कायम ठेवण्यासाठी गुन्हेगारी कृत्ये करणाऱ्या तसेच कायदेशीर कारवाईला न जुमानणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध आगामी सण-उत्सवांच्या काळात एमपीडीए आणि अन्य प्रचलित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला आहे.

# दुष्काळात कर्जवसुलीचा तगादा थांबवा!

## बजाज फायनान्सला युवक काँग्रेसचा इशारा; ३ ते ४ महिने वसुली स्थगित करण्याची मागणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी, शेतमजूर आणि बांधकाम क्षेत्रातील मजुरांवर उपासमारीची वेळ आली असताना फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असल्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी पुढील तीन ते चार महिने कर्जवसुली स्थगित करावी, अशी मागणी युवक काँग्रेसने बजाज फायनान्स कंपनीच्या संचालकांकडे केली आहे. आमदार साजिद खान पठाण यांच्या वतीने यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि मजूर वर्गाचे आर्थिक गणित कोलमडले आहे. रोजगाराची साधने कमी झाल्याने दैनंदिन गरजा भागविणेही कठीण झाले आहे. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असताना कर्जाचे हप्ते भरायचे तरी कुठून, असा सवाल या निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. दुष्काळामुळे हाताला काम नाही, उत्पन्नाचे साधन नाही; मात्र फायनान्स कंपन्यांचे वसुली अधिकारी घरी येऊन रोज हप्त्यांसाठी तगादा लावत असल्याची तक्रार युवक काँग्रेसने केली आहे. आधीच आर्थिक विवंचनेत असलेल्या गरीब कुटुंबांवर अशा वसुलीमुळे मानसिक ताण वाढत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. सदर निवेदन देतेवेळी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आकाश कवडे यांचे नेतृत्वात अंकुश तायडे, विजय जामनिक, सचिन भटकर, शुभम हिरडकर, दुर्गेश कराळे, मंदार इंगोले, कार्तिक इंगोले यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ. साजिद खान पठाण यांच्या वतीने कंपनीच्या संचालकांना निवेदन

#### तीन ते चार महिने दिलासा द्या!

संकटाच्या काळात कर्जदारांची परिस्थिती समजून घेऊन कंपनीने मानवतेच्या दृष्टिकोनातून निर्णय घ्यावा. पुढील तीन ते चार महिने कर्जवसुली तात्पुरती स्थगित ठेवावी, तसेच कोणत्याही कर्जदारावर जबरदस्तीची कारवाई करू नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दुष्काळामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकरी आणि मजूर कुटुंबांना कर्जवसुलीच्या दबावातून दिलासा मिळावा, यासाठी बजाज फायनान्स कंपनीने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, असे आवाहन युवक काँग्रेसने केले आहे.

# वेटलिफ्टिंगमध्ये अकोल्याच्या खेळाडूंची दमदार कामगिरी!



■ प्रतिनिधी | अकोला ■

### जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत महिला-पुरुष खेळाडूंची बाजी; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

वेटलिफ्टिंग क्षेत्रात जिल्ह्यातील खेळाडूंनी आपले कौशल्य सिद्ध करत जिल्हास्तरीय खुल्या महिला व पुरुष अजिंक्यपद स्पर्धेत विविध वजन गटांत प्रथम क्रमांक पटकाविले. अकोला जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने वसंत देसाई स्टेडियम येथे ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध वजन गटांत अव्वल ठरलेल्या खेळाडूंची राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे.

पुरुषांच्या स्पर्धेत ६० किलो वजन गटात अनुराग मोरया, ६५ किलो गटात रोशन तायडे, ७१ किलो गटात वनराज लखन, ७९ किलो गटात हर्षद भोकरे, ८८ किलो गटात जहीर, ९८ किलो गटात साहेब अली, ११० किलो गटात चैतन्य अपतूळकर, तर ११० किलोपेक्षा अधिक वजन गटात श्लोक सुरडकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. महिला खेळाडूंनीही विविध वजन गटांत उल्लेखनीय कामगिरी केली. ४८ किलो वजन गटात दिव्यानी चंदन, ५३ किलो गटात पायल चंदन, ५८ किलो गटात श्रेया इंगळे, ६३ किलो गटात वैष्णवी पांडे, ६९ किलो गटात अदिती बोदळे, ७७ किलो गटात दिशा मिश्रा, ८६ किलो गटात संध्या पाठक, तर ८६ किलोपेक्षा अधिक वजन गटात विशाखा बोदडे यांनी अव्वल स्थान पटकाविले.

#### राज्यस्तरीय स्पर्धेची संधी

जिल्हास्तरीय स्पर्धा ही खेळाडूंच्या क्षमतेची चाचणी घेण्याबरोबरच त्यांना पुढील स्तरावर संधी मिळवून देणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरते. वजन गटानुसार झालेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना राज्यस्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या स्पर्धेतील कामगिरीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदके व प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. जिल्ह्यातील वेटलिफ्टिंग खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना उच्चस्तरीय स्पर्धांसाठी तयार करणे, या दृष्टीने अशा स्पर्धांचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# पाण्याचा अपव्यय; हॉटेल व्यावसायिकासह बांधकामधारकाला दंड

### मनपा प्रशासनाची कारवाई; एकाच दिवशी आठ हजारांचा दंड

**अकोला :** संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी अकोला महानगरपालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पाण्याचा अपव्यय केल्याप्रकरणी रेल्वे स्टेशन चौकातील हॉटेल सिटी प्राईडवर पाच हजार रुपये, तर गीतानगर येथील निवासी बांधकामधारक कमल पंजवानी यांच्यावर तीन हजार रुपये दंडाची कारवाई करण्यात आली. मनपाच्या पूर्व व पश्चिम झोनच्या पथकांनी शनिवारी (२४ ऑक्टोबर) ही कारवाई केली.

शहरात संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशाने झोननिहाय पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. पाण्याचा अपव्यय होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित ठिकाणी तपासणी करण्यात येत आहे.

रेल्वे स्टेशन चौकातील हॉटेल सिटी प्राईड येथे पाण्याचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पूर्व झोनच्या पथकाने हॉटेल व्यावसायिकावर पाच हजार रुपयांचा दंड ठोठावला. त्याचप्रमाणे पश्चिम झोनच्या पथकाला गीतानगर येथील सुरू असलेल्या नवीन निवासी बांधकामाच्या ठिकाणी बोअरवेलचे पाणी टाकले जात असल्याचे आढळले. याप्रकरणी बांधकामधारक कमल पंजवानी यांच्यावर तीन हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

ही कारवाई सहायक आयुक्त राजेश सरप आणि गजानन घोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



पूर्व झोनचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार, सुनील कंडेरा, विशाल पारोचे, गौरव वर्मा तसेच पश्चिम झोनचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक अमर खोडे आणि कनिष्ठ अभियंता समीर मालवे यावेळी उपस्थित होते.

#### पाण्याच्या अपव्ययाची तक्रार करा

शहरात पिण्याचे पाणी आणि भूजलाचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे. पाणीपुरवठ्याची पाइपलाइन फुटणे, सार्वजनिक किंवा खासगी बांधकामात मनपाच्या पाण्याचा अथवा बोअरवेल-विहिरीच्या पाण्याचा गैरवापर, वाहन धुलाई केंद्र सुरू असणे किंवा आरओ प्लांटमध्ये मनपाच्या पाण्याचा वापर होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी ०७२४-२४३४४१२ या क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले.

# चारा लागवडीतून ग्रामीण रोजगाराला चालना; पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता

**अकोला :** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई भासू नये आणि ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला शाश्वत काम मिळावे, यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण)' (व्हीबी जी राम जी) अंतर्गत वैयक्तिक तसेच ग्रामपंचायत व सार्वजनिक जमिनीवर चारा पिकांच्या लागवडीसाठीच्या सविस्तर अंदाजपत्रकास (आर्थिक मापदंडास) शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील दुष्काळसदृश तालुक्यांसह ग्रामीण भागातील पशुपालकांना हिरवा चारा मिळण्यास मोठी मदत होणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल, अशी माहिती रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिली. वैयक्तिक जमिनीवर ७ हजार ४९० रोपांच्या चारा लागवडीसाठी एकूण १ लाख २१ हजार ८१५ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. २४५ मनुष्य दिवसांच्या मजुरीसाठी ७७ हजार ६६५ रुपये आणि साहित्य खर्चासाठी ४४ हजार १५० रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत हद्द, गावठाण तसेच विहिरीजवळील अन्य उपलब्ध जागेवर एक एकर चारा लागवडीसाठी एकूण १ लाख ५५ हजार ३ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले असून २९५ मनुष्य-दिवसांच्या मजुरीसाठी ९३ हजार ५१५ रुपये आणि साहित्य खर्चासाठी ६१ हजार ४८८ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**Change In Name**

(Old passport No U3338013) I Have Change My Mother Name In My Passport From **RANI SULRANA SHAKIR AHMED** -TO- **RANI SULTANA SHAKIR AHMED** My Residential Address Is Flat no 103 Noor Apartment Nirman Nagar, Ganga Nagar, Akola, 444002

# आश्वासनांचा पाऊस नको, शेतकऱ्यांवर मदतीचा वर्षाव करा!

## संपूर्ण कर्जमुक्तीपासून पीकविमा, नुकसानभरपाईपर्यंत मागण्यांचा पाढा

■ राजेश पाटील खारोडे ■

**तेल्हारा :** शेतात पिके माना टाकत आहेत, उत्पादन खर्च वाढत आहे, कर्जाचा डोंगर उभा आहे आणि दुसरीकडे बँका व वित्तीय संस्थांच्या वसुलीचा तगादा सुरू आहे. अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता आश्वासनांच्या भाषणांचा कंटाळा आला असून, प्रत्यक्ष आर्थिक मदतीची प्रतीक्षा आहे. निवडणुकीच्या काळात दिलेला शब्द पाळून संपूर्ण कर्जमुक्ती जाहीर करा, मागील व चालू वर्षाचा पीकविमा आणि नुकसानभरपाई द्या, कर्जवसुलीला तात्पुरती स्थगिती द्या, अशा मागण्यांनी शेतकऱ्यांचा आक्रोश तीव्र होत आहे. सरकारने आणखी किती काळ शेतकऱ्यांच्या सहनशीलतेची परीक्षा घ्यायची, असा सवालही उपस्थित होत आहे.

राज्यातील शेतकरी सध्या पावसाची अनिश्चितता, पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक विवंचना अशा अनेक संकटांना सामोरा जात आहे. शेतीत पैसा गुंतवूनही उत्पन्नाची खात्री नाही. घरखर्च, मुलांचे शिक्षण, शेतीसाठी लागणारा पैसा आणि कर्जाचे हप्ते यांची जुळवाजुळव करताना शेतकरी मेटाकुटीला आला आहे. सण-उत्सवांच्या काळातही अनेक शेतकरी कुटुंबांच्या घरात आर्थिक चिंतेचे सावट कायम आहे. त्यामुळे केवळ घोषणांची आतषबाजी नको, तर शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### दुष्काळाच्या संकटात सरकारच्या निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष

#### कर्जमुक्तीचे आश्वासन प्रत्यक्षात उतरवा!

निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती देण्याची मागणी पुढे येत आहे. कर्जमाफीच्या नावाखाली अटी-शर्तींचे जंजाळ उभे करून शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवू नये. पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळेल, अशी पारदर्शक व्यवस्था करून कर्जाच्या विळख्यातून त्यांची सुटका करावी. कर्जमुक्तीबाबत स्पष्ट निर्णय घेऊन त्याच्या अंमलबजावणीचे वेळापत्रकही जाहीर करावे, अशी अपेक्षा आहे.

#### पीकविमा, नुकसानभरपाईसाठी प्रतीक्षा कशाला?

पावसाचा खंड, नैसर्गिक आपत्ती आणि पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. अशा परिस्थितीत मागील व चालू वर्षातील पात्र पीकविमा दावे आणि शासनाच्या निकषांनुसार देय नुकसानभरपाई तातडीने मंजूर करून खात्यात जमा करावी. पंचनामे, कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रियेच्या नावाखाली मदत लांबणीवर पडू नये. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेत भरपाई मिळाली, तरच पुढील हंगामासाठी उभे राहण्याचे बळ मिळेल.

#### कर्जवसुलीचा तगादा थांबवा!

दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना बँका, पतसंस्था आणि मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीपासून तात्पुरता दिलासा देण्याची मागणी आहे. शासनाने संबंधित वित्तीय संस्था व नियामक यंत्रणांशी समन्वय साधून नियमानुसार वसुली स्थगिती, हप्त्यांची पुनर्रचना आणि आवश्यक सवलती मिळवून द्याव्यात. हातात उत्पन्न नाही, पिकांचे नुकसान झाले आहे, अशा परिस्थितीत कर्जाचे हप्ते कसे भरायचे, हा शेतकऱ्यांसमोरील गंभीर प्रश्न आहे.

#### वीजपुरवठा विस्कळीत; पिके वाचवायची कशी?

शेतात पीक उभे असताना कृषिपंपांना नियमित वीज मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र, वीजपुरवठ्यातील खंड आणि तांत्रिक बिघाडामुळे पिकांना पाणी देताना अडचणी निर्माण होतात. शेतीसाठी निर्धारित वेळापत्रकानुसार वीजपुरवठा करावा, बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्ती करावी आणि पिकांचे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी आहे.

#### चारा टंचाईसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवा

दुष्काळाची झळ पिकांपुरती मर्यादित राहत नाही. जनावरांसाठी चारा आणि पाणी उपलब्ध करणेही कठीण होते. त्यामुळे गरजेनुसार चारा छावण्या, चारा अनुदान आणि पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था करावी. ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी टँकर, विहिरींचे अधिग्रहण आणि पर्यायी पाणीपुरवठ्याच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात. केवळ बैठकांचा फार्स न करता प्रत्यक्ष मदत पोहोचवावी, अशी मागणी होत आहे.

#### मुलांचे शिक्षण आणि तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर

शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सोडण्याची वेळ येऊ नये, यासाठी शैक्षणिक शुल्कमाफी, शिष्यवृत्ती आणि अन्य सवलतींबाबत व्यापक निर्णय घ्यावा. दुसरीकडे, ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन, कौशल्यविकास प्रशिक्षण आणि पारदर्शक भरती प्रक्रिया राबवावी.

#### शेतमालाला भाव, निविष्ठांची उपलब्धता सुनिश्चित करा

शेतीसाठी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठा योग्य वेळी उपलब्ध करून देण्याबरोबरच शेतमालाला रास्त भाव मिळण्यासाठी प्रभावी बाजारव्यवस्था उभारावी. शासकीय खरेदी केंद्रांचे नियोजन करावे, दुष्काळग्रस्त भागांचा वस्तुनिष्ठ आढावा घ्यावा आणि पात्र गावांना आवश्यक सवलती लागू कराव्यात. शासकीय योजनांचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणाही कार्यान्वित करावी.

#### शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नका!

शेतकरी हा देशाच्या अन्नसुरक्षेचा कणा आहे. मात्र, संकटाच्या काळात त्यालाच मदतीसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असतील, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. संपूर्ण कर्जमुक्ती, पीकविमा, नुकसानभरपाई, नियमित वीजपुरवठा, कर्जवसुलीपासून दिलासा, चारा-पाणी, शैक्षणिक सवलती आणि रोजगार या प्रश्नांवर सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी.

शेतकऱ्यांना सहानुभूती नको, हक्काची मदत हवी! घोषणांची पुनरावृत्ती नको, निर्णयांची अंमलबजावणी हवी! सरकारने कोणत्या मागणीवर काय निर्णय घेतला, निधी किती मंजूर केला आणि लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार, हे स्पष्ट करावे. अन्यथा निवडणुकीतील आश्वासने आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यातील अंतर अधिकच वाढत राहील. शेतकरी वाचला तर शेती वाचेल आणि शेती वाचली तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संकटाकडे गांभीर्याने पाहून सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत. आता प्रश्न आश्वासनांचा राहिलेला नाही; प्रश्न शेतकऱ्यांच्या जगण्याचा आहे!

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७८३/२०२६ — प्रोसेस नं.१३५२४/२०२६

चौ.ता. ३०/११/२०२६ — दिनांक : २२/१०/२०२६

**अर्जदार :** १. ताराबाई शरद दुतोंडे २. संतोष शरद दुतोंडे ३. योगेश शरद दुतोंडे मो. क्र. ९१७५०७७६९८ सर्व रा. शिवसेना वसाहत, अंबिका चौक, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : शरद त्र्यंबक दुतोंडे

**पत्ता :-** रा. शिवसेना वसाहत, अंबिका चौक, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शरद त्र्यंबक दुतोंडे यांचे दि. २१/०५/२००५ रोजी राहते घरी शिवसेना वसाहत, अंबिका चौक, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे..

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. ह्याची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३११**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# जंतमुक्त बालपणासाठी वर्धा जिल्हा सरसावला

## २ लाख ८३ हजार बालकांना जंतनाशक गोळ्या; २७ ऑक्टोबरला जिल्हाभर मोहीम

**वर्धा/ जनमाध्यम**

बालकांचे आरोग्य, पोषण आणि भविष्य सुरक्षित करण्यासाठी वर्धा जिल्ह्यात २७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १ ते १९ वर्षे वयोगटातील तब्बल २ लाख ८३ हजार १८० बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने निश्चित केले आहे. बालकांमधील रक्तक्षय, अशक्तपणा आणि जंतसंसर्गामुळे उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांना आळा घालण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत औषधा पोहोचविण्याचे आव्हान आरोग्य यंत्रणेसमोर असून, पालकांनीही या मोहिमेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.




**जंतांचा विळखा, बालकांच्या वाढीला अडथळा**

अस्वच्छता, दूषित मातीचा संपर्क आणि वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव यामुळे बालकांच्या आतड्यांमध्ये जंतांचा संसर्ग होऊ शकतो. या संसर्गामुळे शरीरातील पोषक घटकांचे शोषण कमी होऊन रक्तक्षय, अशक्तपणा, भूक मंदावणे आणि पोटदुखी यांसारख्या समस्या निर्माण होतात. परिणामी बालकांच्या शारीरिक वाढीसह बौद्धिक विकासावरही परिणाम होण्याची शक्यता असते. काही बालकांमध्ये स्पष्ट लक्षणे दिसत नसली, तरी जंतसंसर्गाचा धोका कायम राहू शकतो. त्यामुळे पात्र बालकांना नियोजित मोहिमेत जंतनाशक औषध मिळणे महत्त्वाचे आहे.

**शाळा, अंगणवाड्यांमधून औषधवाटप**

जिल्ह्यातील शाळा, अंगणवाडी केंद्रे आणि आरोग्य संस्थांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येणार आहे. आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयातून नियोजन करण्यात आले आहे. शाळकरी विद्यार्थी, अंगणवाडीतील बालके आणि अन्य पात्र लाभार्थ्यांपर्यंत जंतनाशक गोळ्या पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे.

### रक्तक्षय, कुपोषणाला आळा घालण्याचा आरोग्य विभागाचा प्रयत्न; वंचित बालकांसाठी ३ नोव्हेंबरला विशेष फेरी

**गोळी घेण्यापासून वंचित राहिल्यास ३ नोव्हेंबरला संधी**

२७ ऑक्टोबर रोजी आजारपणामुळे किंवा अन्य कारणांमुळे जंतनाशक गोळी घेऊ न शकलेल्या बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी विशेष मॉप-अप फेरी आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी संबंधित बालकांना शाळा, अंगणवाडी किंवा आरोग्य संस्थेच्या माध्यमातून औषध देण्यात येईल. औषधाची मात्रा वय आणि अधिकृत मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित केली जाणार आहे. बालकाच्या प्रकृतीबाबत शंका असल्यास पालकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांचा सल्ला घ्यावा.

**औषधासोबत स्वच्छतेचेही कवच हवे**

जंतसंसर्ग रोखण्यासाठी केवळ औषधोपचार पुरेसे नसून स्वच्छतेच्या सवयीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. जेवणापूर्वी आणि शौचालयाचा वापर केल्यानंतर साबणाने हात धुणे, स्वच्छ पाणी पिणे, फळे व भाज्या धुऊन खाणे, नखे स्वच्छ ठेवणे आणि पादत्राणांचा वापर करणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील एकही पात्र बालक या मोहिमेपासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांना २७ ऑक्टोबर रोजी शाळेत किंवा अंगणवाडी केंद्रात उपस्थित ठेवावे आणि मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी केले आहे.

# न्यायासाठी तीन वर्षांची लढाई; आता आत्मदहनाचा इशारा

## सेलू पोलिसांवर कथित खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप; निष्पक्ष चौकशीची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

न्यायाच्या प्रतीक्षेने हतबल झालो, आता सहनशक्ती संपली! असा आर्त सूर व्यक्त करीत मंगेश चोरे यांनी ३१ ऑक्टोबर रोजी वर्धा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. सेलू पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्याविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करून अधिकारांचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय न मिळाल्यास टोकाचे पाऊल उचलण्याची भूमिका त्यांनी निवेदनातून मांडली आहे.



चोरे यांच्या आरोपांनुसार, सुमारे तीन वर्षांपूर्वी एका आठवड्याच्या कालावधीत त्यांच्याविरुद्ध अनेक गुन्हे दाखल करण्यात आले.संबंधित पोलिसांनी पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर केल्याचा त्यांचा दावा आहे. या कारवाईविरोधात त्यांनी आजवर संवैधानिक मार्गाने दाद मागितली. मात्र, अपेक्षित न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाल्याने आपण हा निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले आहे. पोलीस ताब्यात असताना रस्त्यात एका पोलीस उपनिरीक्षकाच्या सहकाऱ्याने आपल्या पोटावर मारहाण केल्याचा आरोपही चोरे यांनी केला आहे. या घटनेनंतर उपचारासाठी मुंबईला जावे लागल्याचे त्यांनी म्हटले आहे.२१ ऑक्टोबर रोजी नागपूर परिक्षेत्राच्या पोलीस महानिरीक्षकांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिल्याचे चोरे यांनी सांगितले. तसेच पोलीस महासंचालक, मानवाधिकार आयोग आणि पोलीस प्राधिकरणाकडेही पुराव्यांसह तक्रारी सादर केल्याचा त्यांचा दावा आहे. संबंधित पोलीस अधिकाऱ्याला निलंबित करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी, तसेच आपल्याविरुद्ध दाखल गुन्ह्यांची कायदेशीर तपासणी करावी,अशी मागणी त्यांनी केली आहे. ३१ ऑक्टोबरपूर्वी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन न्याय द्यावा, अन्यथा आपल्या मृत्यूला सेलूतील संबंधित पोलीस अधिकारी जबाबदार असतील, असे चोरे यांनी निवेदनात म्हटले आहे. ३० ऑक्टोबरपर्यंत तिरंगी वस्त्र परिधान करून जिवलगांच्या भेटी घेणार असल्याचे सांगताना, आयुष्याच्या प्रवासात आपल्याकडून कळत-नकळत कुणाचे मन दुखावले गेले असेल, तर त्यांनी माफ करावे, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### दुकानदारावर कटरने वार करून २० हजार रुपये पळविले

**हिंगणघाट**-शहरातील गोलबाजार परिसरात कपड्याच्या दुकानात घुसून धुडगूस घालत दुकानदारावर कटरने वार केल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. या घटनेत दुकानदार जखमी झाला असून, गल्ल्यातील अंदाजे २० हजार रुपये चोरून नेल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली आहे.देविदास गुलाबराव राऊत यांच्या दुकानात गणेश सोनवणे आणि तेजस धाटुर्ते हे दोघे हातात कटर घेऊन आले. त्यांनी दुकानातील कपडे आणि प्रदर्शनासाठी ठेवलेले पुतळे फेकून नुकसान केले. दुकानदाराने जाब विचारताच गणेशने कटरने त्यांच्या उजव्या हातावर वार केला. कामगाराने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यालाही धक्काबुक्की करण्यात आली. त्यानंतर दोघांनी गल्ल्यातील रक्कम घेऊन पळ काढला. हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### अज्ञात दुचाकीच्या धडकेत महिला जखमी

**वर्धा**-शहरातील रामकृष्ण हॉटेलजवळ रस्ता ओलांडत असताना काळ्या रंगाच्या दुचाकीने धडक दिल्याने महिला जखमी झाली. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. सना अशोक खुपचंदानी असे जखमी महिलेचे नाव आहे.सना या ओला कंपनीची इलेक्ट्रिक मोपेड घेऊन महादेवपुरा परिसरात जात होत्या. रामकृष्ण हॉटेलजवळ रस्ता ओलांडत असताना तीन जण बसलेल्या काळ्या रंगाच्या दुचाकीने त्यांच्या मोपेडला धडक दिली. या अपघातात त्यांच्या उजव्या पायाच्या पोटरीला दुखापत झाली. धडक दिल्यानंतर दुचाकीचालक घटनास्थळावरून पसार झाला. पतीने त्यांना तातडीने खासगी दवाखान्यात नेऊन उपचार केले. याप्रकरणी पतीच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

### महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा**-शहरातील इतवारा बाजार परिसरात पोलीस चौकीमागे राहणाऱ्या ४८ वर्षीय महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली. शितल विजय गवळी असे मृत महिलेचे नाव आहे.मृत महिलेचा मुलगा सकाळी नऊ वाजताच्या सुमारास रोजमजुरीसाठी घराबाहेर गेला होता. दुपारी साडेबारा वाजता घरी परतला असता त्याची आजी घराबाहेर रडत बसलेली दिसली. आईने गळफास घेतल्याचे समजताच त्याने घरात जाऊन पाहणी केली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह खाली उतरविला आणि उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविला. मृत महिला मागील आठ दिवसांपासून अस्वस्थ व विचित्र वर्तन करीत असल्याची माहिती मुलाने पोलिसांना दिली. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी मर्ग नोंदवून तपास सुरू केला आहे.

### घरात अनधिकृत प्रवेश करून धमकावल्याची तक्रार

आष्टी - गावातील जुन्या कौटुंबिक वादातून घरात अनधिकृतपणे प्रवेश करून धमकावल्याची तक्रार आष्टी पोलिसांत दाखल झाली आहे. अतीक बाबाराव पोडिले यांनी याप्रकरणी आकाश प्रकाश घोरपडे यांच्याविरुद्ध तक्रार दिली.तक्रारीनुसार, २२ ऑक्टोबर रोजी रात्री अतीक हे घरी स्वयंपाक करीत असताना आकाश घोरपडे अचानक घरात आले. त्यांनी अतीक यांच्या मानेवर हात ठेवून काय सुरू आहे, अशी विचारणा केली. त्यामुळे भीती वाटल्याने अतीक घराबाहेर आले. त्यानंतर आकाश घराच्या लहान दरवाजातून बाहेर निघून गेले. दोन्ही कुटुंबांत अनेक वर्षांपासून वाद असल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेमुळे भीती निर्माण झाल्याचे अतीक यांनी पोलिसांना सांगितले. आष्टी पोलिसांनी संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### सिमेंटचे खांब तोडल्याचा आरोप

**कारंजा (घाडगे)**-शेतजमिनीची हद्द निश्चित करण्यासाठी लावलेले सिमेंटचे खांब उखडून तोडल्याचा प्रकार कारंजा परिसरात उघडकीस आला आहे. यामुळे सुमारे दोन हजार रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार जमीनमालकाने पोलिसांत केली आहे.तक्रारदार लक्ष्मीकांत केडिया यांच्या मालकीची कारंजा परिसरात दोन हेक्टर २७ आर जमीन आहे. शासकीय मोजणीनंतर जमिनीच्या हद्दीवर सिमेंटचे खांब लावण्यात आले होते. ६ ऑक्टोबर रोजी शेतात गेल्यानंतर अनेक खांब उखडून तोडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

# मतदार यादीत पुरुषाचे नाव, फोटो मात्र महिलेचा

## केंद्रप्रमुखाच्या आक्षेपानंतर शाब्दिक खडाजंगी; अखेर मतदाराला मतदानाची परवानगी

**वर्धा/ जनमाध्यम**

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदार यादीतील घोळाचा प्रकार समोर आल्याने निवडणूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मतदाराचे नाव पुरुषाचे, ओळखपत्रावरील माहिती पुरुषाची; मात्र मतदार यादीत छायाचित्र महिलेचे असल्याने संबंधित मतदाराला मतदानापासून रोखण्याचा प्रयत्न झाल्याची घटना शुक्रवारी घडली.

मतदार यादीतील अनुक्रमांक २१० वर नाव असलेले अतुल नंदकिशोर शेंडे मतदानासाठी केंद्रावर पोहोचले. त्यांनी आपले नाव आणि ओळखपत्रावरील माहिती सादर केली. मात्र, मतदार यादीत महिलेचे छायाचित्र असल्याचे कारण देत केंद्रप्रमुखाने त्यांना मतदान करता येणार नसल्याचे सांगितले. यावर शेंडे यांनी नाव पुरुषाचे असताना केवळ छायाचित्र महिलेचे असल्यामुळे मतदानाचा हक्क कसा नाकारता,असा प्रश्न उपस्थित केला.यावरून दोघांमध्ये शाब्दिक खडाजंगी झाली. अखेर संबंधित मतदाराला मतदान करण्याची परवानगी देण्यात आली. नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादीत अशा प्रकारचे अनेक घोळ असल्याचा आरोप केला जात आहे. यादीत आठ हजारांहून अधिक दुबार नावे असल्याचे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

### वडेट्टीवारांचा आरोप : भाजप बेइमानी करूनच मतदान जिंकते



भाजप बेइमानी करूनच मतदान जिंकते,असा आरोपही त्यांनी केला. मतदार यादीतील छायाचित्रे आणि नोंदींमधील विसंगती, दुबार नावांचा मुद्दा आणि मतदान केंद्रांवरील पडताळणी प्रक्रिया यामुळे निवडणूक व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मतदार यादीतील त्रुटींची चौकशी करून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आलेल्या मतदारांची गैरसोय टाळावी, अशी मागणी होत आहे.

# तीन वर्षांपासून पोलिसांना गुंगारा; अखेर नागपुरातून अटक

**वर्धा/ जनमाध्यम**

चोरीच्या गुन्ह्यात गेल्या तीन वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला वर्धा स्थानिक गुन्हे शाखेने नागपुरातून ताब्यात घेतले. कमलेश ईश्वरसिंग बैस (वय ४२, रा. आनंदनगर, सक्करदरा, नागपूर) असे या आरोपीचे नाव असून,२२ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली. कारंजा घाडगे पोलिसांत दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यात तो पोलिसांना हवा होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारंजा घाडगे पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १८८/२०२३ अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ३८० आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणातील पाहिजे आरोपी बैस याचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करीत होते.



तपासादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी नागपूर शहरातील सक्करदरा परिसरात राहत असल्याचे समोर आले. त्यानंतर पथकाने तातडीने त्या परिसरात जाऊन शोधमोहीम राबविली. यावेळी बैस मिळून आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या नातेवाइकांना कारवाईची माहिती देण्यात आली असून, पुढील तपासासाठी आरोपीला कारंजा घाडगे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मनोज धात्रक, महादेव सानप, हर्षल सोनटक्के, अभिषेक नाईक आणि सायबर सेलचे दिनेश बोथकर यांनी ही कारवाई केली.

### ग्रंथभेट योजनेसाठी १,१८३ ग्रंथांची निवड

**वर्धा**-राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून राबवल्या जाणाऱ्या ५१ व्या ग्रंथभेट योजनेंतर्गत सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या व संचालनालयास प्राप्त झालेल्या ग्रंथांपैकी तब्बल १,१८३ ग्रंथांची निवड करण्यात आली आहे. या ग्रंथयादीमध्ये ६८५ मराठी, २४६ हिंदी आणि २५२ इंग्रजी पुस्तकांचा समावेश आहे. ही संपूर्ण यादी ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ३१ ऑक्टोबर पर्यंत सर्वसामान्यांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आली आहे. कार्यालयीन वेळेत हस्तबटवड्याने, पोस्टाने किंवा दिलेल्या ई-मेलवर ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१ या पत्यावर पाठवता येतील. असे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी कळविले आहे.

# नाना पाटेकर स्मृती आदरांजली सभा उद्या

## बजाज वाचनालयात सायंकाळी ६ वाजता आयोजन

**वर्धा/ जनमाध्यम**

हजारो शेतकरी कुटुंबांचा आधार ठरलेल्या तसेच जलसंधारणाशी निगडित विविध कामे करणाऱ्या'नाम फाउंडेशन'चे संस्थापक तथा प्रतिभासंपन्न अभिनेते नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता 'आम्ही वर्धेकर'च्या वतीने आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी, २६ ऑक्टोबरला सायंकाळी ६ वाजता स्थानिक सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय सभागृहात हा कृतज्ञता कार्यक्रम होतो आहे. नाना पाटेकर यांनी नाम फाउंडेशनच्या सहकाऱ्यांच्या साथीने राज्यातील इतर जिल्ह्यांसह वर्धा जिल्ह्यातही भरीव काम केले. जिल्ह्यातील तिगाव (आमला) या गावाला दत्तक घेऊन तिथे विविध विकासकामे केली होती. याच संदर्भात त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह वर्ध्यात दोन दिवस मुक्काम केला होता. अनेकांत स्वाध्याय मंदिरात वर्धा, यवतमाळ येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबांना धनादेश वितरणाचा कार्यक्रम झाला, तर दत्तकग्राम आमला (तिगाव)ला त्यांनी त्यावेळी भेट दिली होती.

या उच्च कोटीच्या कलावंताविषयी आदरभाव व्यक्त करण्यासह संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीला धावणाऱ्या या खऱ्या नायकाविषयी सहृदय कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.याप्रसंगी विविध संस्था- संघटना, व्यक्ती, समूह आपल्या भावना व्यक्त करणार आहेत. या आदरांजली सभेत सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन हरिष इथापे, संजय इंगळे तिगावकर, मुरलीधर बेलखोडे, जीवन चोरे, महेंद्र भुते, शेखर ठाकरे, सचिन धांडे, विक्रम खडसे, मुकेश लुतडे आदींनी केले आहे.

# सेलडोहकरांची पाणी टंचाई निवारणासाठी नाला खोलीकरणाची मागणी

## एक किलोमीटर नाला खोलीकरणासाठी ग्रामस्थांचे निवेदन

**सेलू/ जनमाध्यम**

एकीकडे कोरड्या दुष्काळाचे सावट, दुसरीकडे पाण्याचा निचरा होऊन होणारी पाण्याची नासाडी! अशा दुहेरी संकटामुळे सेलडोह गावातील पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गावाला पाणीपुरवठा करणारा नालाच गाळ,माती आणि गोट्यांनी बुजल्याने संभाव्य संकट टाळण्यासाठी तातडीने एक किलोमीटर नाला खोलीकरण करण्याची आक्रमक मागणी ग्रामस्थांसह डॉ. कुमारप्पा पाणी वापर संस्थेने केली आहे.

महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केल्यानंतर पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, सेलडोह येथील पाणीपुरवठ्याच्या स्रोताची दुरवस्था कायम असल्याने उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे.

ढिवरा, मथनार आणि खडकी परिसरातील संबंधित प्रकल्पातून बँकिंग व सायफनद्वारे पाण्याचा निचरा होत असल्याने पाणी वाया जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नाल्याचे खोलीकरण झाल्यास पाणीसाठा वाढून गावातील नागरिकांसह जनावरांनाही दिलासा मिळू शकतो.या मागणीचे निवेदन सहाय्यक अभियंता, पांढरा उपविभाग कार्यालय, सेलू यांना देण्यात आले आहे. पालकमंत्री, जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनाही प्रती पाठविण्यात आल्या आहेत.आता प्रशासन किती तत्परतेने दखल घेते, याकडे सेलडोहकरांचे लक्ष लागले आहे.



### सावंगी मेघे येथील ८६ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

वर्धा - सावंगी मेघे येथील समतानगर परिसरातील ८६ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी समोर आली. सुधाकर शिवराम कदम असे मृत वृद्धाचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कदम यांना २३ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास नातेवाइकांनी सामान्य रुग्णालयात आणले. तेथे डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांना मृत घोषित केले. मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट न झाल्याने मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शवागारात ठेवण्यात आला. वर्धा शहर पोलिसांना माहिती देण्यात आली असून, मर्ग नोंदविण्यात आला आहे. मृत्यूमागील नेमके कारण उत्तरीय तपासणी अहवालानंतर स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३२७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### राजमाता पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून सामाजिक प्रबोधन

**आसेगाव पूर्णा-** नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नवयुवक दुर्गा मंडळाच्या वतीने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात राजमाता पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.मनोरंजनासोबतच अंधश्रद्धा निर्मूलन, जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन आणि भारतीय संस्कृतीच्या जतनाचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून दिला. मुख्याध्यापिका पल्लवी उमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी 'अंगात आले देव' या नाटकासह त्यावर आधारित गाण्याचे सादरीकरण केले. समाजातील अंधश्रद्धा आणि गैरसमजुतींवर भाष्य करीत जनजागृतीचा प्रयत्न करण्यात आला. 'पाणी हरवलं' या सादरीकरणातून पाण्याचे महत्त्व व जलसंवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली, तर 'सेव्ह ट्री'च्या माध्यमातून वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. विविध विषयांवरील सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी कला, संस्कृती आणि सामाजिक जाणीव यांचा सुरेख संगम साधला. कार्यक्रमानंतर नवयुवक दुर्गा मंडळाचे पदाधिकारी नंदू भाऊ बोबडे, ज्ञानेश्वरराव खूंटे, प्रशांत नागापुरे आणि राधेश्याम रघुवंशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका पल्लवी उमाळे, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकांनी सहकार्य केले. कलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन आणि संस्कृतीतून संस्कार घडविण्याचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी लक्षवेधी ठरला.

### श्री संत धर्मदास महाराज पुण्यतिथी

**शिराळा-** येथील प्राचीन शिव मंदिर ज्ञानेश्वर संस्थान शिराळा येथे दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी देखील श्री संत धर्मदास महाराज पुण्यतिथी महोत्सव सोहळा पार पडला. तीर्थस्थापना ११ ऑक्टोबर रोजी मंगेश उर्फ गोलू रामाजी कुसटकर ह्यांच्या शुभहस्ते झाली तसेच दैनंदिन कार्यक्रम भजन कीर्तन व २३ ला सकाळी पालखीची शोभयात्रा गावातून निघाली दुपारी कल्याचे कीर्तन ह. भ प. सुंदरकर महाराज निंभी ह्यांच्या अमृतमय वाणीतून पार पडले.तसेच महाप्रसाद चे भव्य आयोजन करण्यात आले होते.गावातील तसेच बाहेरगावातील भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.सर्व धर्मदास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य करुन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.



### जखमी नीलगायीला रेस्क्यू

**शिराळा-** नजिकच्या सावंगा (आसरा),ता.अमरावती गावात जखमी अवस्थेतील नीलगायीने प्रवेश केला. ही नीलगाय गावातील अनेक नागरिकांच्या घरांमध्ये गेल्याने काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले.या परिस्थितीत गावातील युवकांनी पुढाकार घेत नीलगायीला सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न केले आणि वनविभागाला माहिती दिली. त्यानंतर मध्यरात्री वनविभागाची रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली आणि नीलगायीचे रेस्क्यू करण्यात आले.या कार्यात गावातील अजिंक्य उमेकर,भावेश खेडकर, वैभव डवरे, गौरव नागपुरे, रविंद्र राऊत, आशिष तसरे आणि कन्हैया घोंगडे या गावातील युवकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.वनविभागाच्या वतीने मोर्शीच्या RFO मगर, वनपाल प्रदीप बावणे,वनरक्षक प्रतिभा चव्हाण तसेच वनमजूर मेश्राम आणि फिरोज खान यांच्या रेस्क्यू टीमने सहकार्य केले.जखमी वन्यजीवाच्या सुरक्षेसाठी गावातील युवकांनी दाखवलेली तत्परता आणि वनविभागाच्या पथकाने केलेले सहकार्य कौतुकास्पद आहे.



### चारचाकी वाहनाच्या धडकेत रोही ठार

**खल्लार-** खल्लार दर्यापूर रोडवरील लांडी ते खिरगव्हान दरम्यान अज्ञात चार चाकी वाहनाने रोड पार करीत असलेल्या रोही या वन्य प्राण्यास जोरदार धडक दिली यात रोही या वन्य प्राण्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना (२४) ऑक्टोंबर सकाळी अकरा वाजताच्या सुमारास घडली. अज्ञात चारचाकी वाहन हे भरधाव वेगाने दर्यापूरकडे जात होते.



### चोरटयांनी गाय लांबविली

**खल्लार-** नजिकच्या उपराई येथिल गर्भवती असलेली २५ हजार रुपये किंमतीची गाय अज्ञात चोरटयांनी काल (२३) च्या रात्री दोन ते तीन वाजताच्या दरम्यान चोरून नेली.उपराई येथिल साजीद अली राजीक अली यांच्या मालकीची गाय रात्री घराबाहेर इतर जनावराबरोबर गाय खुंट्याला बांधली होती. चोरटयांनी रात्रीचा फायदा घेऊन खुंट्याला बांधलेल्या गायीच्या गळ्यातील दोर कापून गाय चोरून नेल्याने गावात भितीचे वातावरण तयार झाले आहे.



# शिक्षकांवर १५६ प्रकारच्या अशैक्षणिक कामांचा बोजा

## अध्यापनासाठी वेळ अपुरा; समायोजन प्रक्रियेला विलंब; राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी

**अमरावती/का.प्र.**

राज्यात शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासनाकडून विविध योजना आणि उपक्रम राबविले जात असले,तरी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार चिंतेचा विषय ठरत आहे. शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त तब्बल १५६ प्रकारची कामे करावी लागत असल्याचे सांगितले जात आहे. निवडणूकविषयक जबाबदाऱ्या, विविध सर्वेक्षणे, ऑनलाइन माहिती भरणे,मध्यान्ह भोजन योजना,आरोग्यविषयक नोंदी आणि शिष्यवृत्ती प्रक्रियेसह अनेक प्रशासकीय कामांमध्ये शिक्षकांचा वेळ खर्च होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची समस्या निर्माण झाली आहे.

शिक्षकांना निवडणूकविषयक कामे, बांधकामाशी संबंधित जबाबदाऱ्या, शाळास्तरीय सर्वेक्षणे, विविध समित्यांचे कामकाज,मध्यान्ह भोजन योजनेचे व्यवस्थापन,आरोग्यविषयक माहिती संकलन, शिष्यवृत्ती प्रक्रिया तसेच उत्पन्न-खर्चाच्या नोंदी ठेवणे अशी विविध कामे करावी लागतात. याशिवाय विद्यार्थ्यांची नोंदणी, आधार विषयक माहिती अद्ययावत करणे, शासकीय योजनांसाठी तपशील भरणे आणि ऑनलाइन पोर्टलवर माहिती अपलोड करणे यांसारख्या जबाबदाऱ्याही शिक्षकांवर आहेत.

या कामांमुळे शिक्षकांचा बराच वेळ प्रशासकीय प्रक्रियांमध्ये जात असून, नियमित अध्यापनावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.त्यामुळे शिक्षकांना अध्यापनासाठी अधिक वेळ उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.



**दोन लाखांहून अधिक शिक्षक अतिरिक्त?**

राज्यात विद्यार्थ्यांची संख्या घटल्याच्या पार्श्वभूमीवर दोन लाखांहून अधिक शिक्षक अतिरिक्त घोषित करण्यात आल्याचे वृत्त आहे. या शिक्षकांचे समायोजन करण्याची प्रक्रिया सुरू असली, तरी तिला अपेक्षित गती मिळालेली नसल्याचे चित्र आहे. परिणामी, काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता कायम आहे, तर दुसरीकडे अतिरिक्त घोषित झालेल्या शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न प्रलंबित आहे.

शिक्षकांचे समायोजन वेळेत न झाल्याने शाळांमधील मनुष्यबळाचे नियोजन विस्कळीत होत आहे. काही शाळांमध्ये आवश्यक संख्येने शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे कार्यरत शिक्षकांवर अध्यापनासोबत प्रशासकीय कामांचाही अतिरिक्त भार पडत आहे. परिणामी, विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे, वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे यामध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना पुरेसा वेळ आणि आवश्यक सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. केवळ नवीन योजना राबवून शैक्षणिक गुणवत्ता सुधारणे शक्य नसून, शिक्षकांना अध्यापनावर लक्ष केंद्रित करता येईल असे वातावरण निर्माण करणेही आवश्यक आहे.

त्यामुळे शिक्षकांवरील अनावश्यक अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे,समायोजन प्रक्रिया गतिमान करणे आणि प्रत्येक शाळेत गरजेनुसार शिक्षक उपलब्ध करून देणे, या मुद्द्यांकडे शिक्षण विभागाने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.या समस्यांवर प्रभावी उपाययोजना झाल्यास अध्यापनाची गुणवत्ता सुधारण्यास आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मदत होऊ शकते.

## स्वच्छ सर्वेक्षण छायाचित्र



**अचलपूर नगर परिषद अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा अभियानासाठी परतवाडा शहरातील बस स्थानक परिसरातील सुरक्षा भिंतीवर मुंबई येथील पथकाने विविध सामाजिक संदेश देणारे छायाचित्र काढले.**

## राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथे माजी विद्यार्थ्यांचे करिअर मार्गदर्शन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथील माजी विद्यार्थी समितीच्या वतीने 'Alumni Career Talks-My Journey, My Lesson' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आदित्य मदामे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. एस. ए. वाणी, IQAC समन्वयक,समितीच्या समन्वयक प्रा.डॉ.एम.एस.पळसपगार,सहसमन्वक प्रा.डॉ.ए.पी.पाचकवडे सोबतच समितीचे सुनील आंबटकर आणि राहुल खोपे आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.माजी विद्यार्थी आदित्य मदामे यांचे स्वागत व सत्कार आदरणीय प्राचार्य डॉ.पी.आर.वडनेरकर यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.ए.पी. पाचकवडे यांनी केले, तर माजी विद्यार्थी आदित्य मदामे यांचा परिचय प्रा. डॉ.एम.एस. पळसपगार यांनी करून दिला.

प्रमुख मार्गदर्शक आदित्य मदामे यांनी My Journey, My Lesson या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रवासातील अनुभव, करिअरच्या विविध संधी, ध्येयनिश्चिती, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि योग्य निर्णयांचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना करिअर नियोजनासाठी प्रेरणा मिळाली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.माजी विद्यार्थी आणि वर्तमान विद्यार्थी यांच्यात अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन आणि भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरणा देणारा ठरला.कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी किरण खडसे हिने केले, तर गौरी धारपवार हिने आभार केले.या कार्यक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थी समितीच्या समन्वयक प्रा. डॉ.एम.एस. पळसपगार, सहसमन्वयक डॉ.ए.पी. पाचकवडे तसेच समिती सदस्य सुनील आंबटकर आणि राहुल खोपे यांनी केले. प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सक्रिय सहभागामुळे आणि सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# शहराचा झगमगाट सोडून ग्रामीण रुग्णसेवेचा वसा!

## डॉ. रोशन घोडेस्वार यांची २६ गावांसाठी अहोरात्र धडपड



**आसेगाव पूर्णा/वाताहर**

ग्रामीण भागातील मर्यादित आरोग्य सुविधांमध्येही रुग्णसेवेला प्राधान्य देणारे आसेगाव पूर्णा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रोशन घोडेस्वार हे परिसरातील २६ गावांतील रुग्णांसाठी आधार ठरत आहेत. अपुऱ्या सोयी-सुविधा आणि मर्यादित जागेतही ते रुग्णांना उपचार देत असल्याने त्यांच्या कार्याचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

अमरावती-परतवाडा महामार्गालगत हे केंद्र असल्याने अपघातातील जखमींना तातडीने उपचारासाठी येथे आणले जाते. अशा वेळी डॉ. घोडेस्वार तत्परतेने उपचार करण्यासाठी पुढाकार घेतात. रात्री-अपरात्री गंभीर रुग्णांना वैद्यकीय मदतीची गरज भासल्यास ते कर्तव्याला प्राधान्य देत रुग्णसेवेसाठी तत्पर राहत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

आसेगाव पूर्णा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागी २०० खाटांचे ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय उभारण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे सध्या छोट्याशा हॉलमधून आरोग्यसेवा सुरू असून, मर्यादित जागा आणि सुविधांच्या अभावातही २६ गावांतील रुग्णांना उपचार देण्याची जबाबदारी डॉ. घोडेस्वार सांभाळत आहेत.

त्यांच्या प्रामाणिक व समर्पित कार्याची दखल घेत स्वातंत्र्यदिनानिमित्त स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेसाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त होत आहे.

### वेळेवर उपचार मिळणे ही मोठी दिलासादायक बाब!

'ग्रामीण भागातील रुग्णांना प्रत्येक वेळी शहरात जाणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत आसेगाव पूर्णा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तातडीने उपचार मिळणे ही मोठी दिलासादायक बाब आहे. मर्यादित जागेतही डॉ. रोशन घोडेस्वार रुग्णसेवेला प्राधान्य देत असल्याने ग्रामीण नागरिकांना आधार मिळत आहे.'

**प्रा.प्रफुल्ल वानखडे, आसेगाव पूर्णा**

### ग्रामीण आरोग्यसेवेतील समर्पण कौतुकास्पद!

'२६ गावांतील रुग्णांची जबाबदारी सांभाळताना अनेक अडचणी येत असतील. त्यातच नवीन रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने उपलब्ध जागेत आरोग्यसेवा देणे आव्हानात्मक आहे. अशा परिस्थितीतही रुग्णांना उपचार देण्यासाठी तत्पर राहणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.

**गोपाळराव शिरभाते,** सामाजिक कार्यकर्ते



## गुगलच्या तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना दिले कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे

**अमरावती-** पत्रकारितेच्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य पद्धतीने वापर आणि उपयोग विद्यार्थ्यांना करता यावा यासाठी आयआयएमसी तर्फे एकदिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. यात गुगल टीमच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांनी अत्याधुनिक एआय साधनांची माहिती आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात विद्यार्थांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा बातमी लेखन, संपादन आणि तथ्य पडताळणीसाठी विविधांगी उपयोग, त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या ॲपची प्रात्यक्षिकसह माहिती मिळाली. यात गुगल टीमच्या एआय प्रशिक्षक कविता उपाध्याय, एन एस रामनाथ, पंकज खुराणा आणि अँजेलिना शालिनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.गुगल टीमच्या एआय प्रशिक्षकांचे स्वागत क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी शोभवंत रोप देवून केले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी एआय टूल्सच्या माध्यमातून तयार केलेल्या ॲपचे सादरीकरण केले. क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यशाळेत डॉ. विनोद निताळे, जयंत सोनोने, रोहन तायडे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी राजेश कुमार, निशांत अंभोरे, राजेश झोलेकर, नूरुज्जमा शेख, भूषण मोहोकार, अनंत नांदुरकर, नंदा तुप्पट, राहुल पाटमासे आदींनी योगदान दिले.

# २७ ऑक्टोबर रोजी १९ वर्षांच्या मुलांना जंतनाशकाची गोळी द्या

## महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक

**अमरावती/का.प्र.**

शासनाकडून राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम २७ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली जंतनाशक दिन मोहीमेच्या अनुषंगाने टास्क फोर्स कमिटीची सभा शुक्रवार २३ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली होती.

अमरावती शहरामध्ये राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रम २७ ऑक्टोबर रोजी राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींना जंतनाशकाची गोळी देण्यात येणार आहे. सर्व शाळा, महाविद्यालय व शाळाबाह्य १ ते १९ वर्षांच्या मुलांच्या पालकांनी आपल्या मुलांना राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रमाच्या आठवड्यामध्ये जंतनाशकाची गोळी द्यावी, असे आवाहन महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी केले आहे.

१ ते १९ वर्षातील किमान २८ टक्के बालकांमध्ये आढळणारा आतड्यांचा कृमीदोष हा मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतापासून होतो. याचे प्रमुख कारण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचा अभाव असते. कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण आहेच. तसेच बालकांची शारिरीक व बौध्दिक वाढ खुंटण्याचे कारण ठरते. सर्व शालेय वयोगटातील विद्यार्थी (शाळेतील व शाळाबाह्य) यांना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देवून त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती व जीवनाचा दर्जा उंचावणे हा राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रमाचा उद्देश आहे.



### राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम

आरोग्य, शिक्षण, एकात्मिक बाल विकास विभाग या तीन मुख्य विभागांच्या समन्वयाने राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. तर समुदाय स्तरावर आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये घरोघरी जावून शाळेत न जाणाऱ्या मुलांना जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत शहरातील मुलांना सदरचे औषध देण्यात येणार आहे. यामध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अंगणवाडी वयोगट (१ ते ६ वर्षे), शाळेतील (६ ते १८ वर्षे) व शाळाबाह्य मुलांचा समावेश आहे.

महानगरपालिका क्षेत्रात अंगणवाडी, शाळा, शाळाबाह्य बालकांची नोंद असलेल्या १ लाख ७९ हजार ७१६ बालकांना जंतनाशक गोळी देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. या मोहिमेत Albendazole 400 mg ही गोळी चावून खाण्यास देण्यात येईल. त्यातही एक ते दोन वर्षे वय असलेल्या बालकास अर्धी गोळी (२०० मि. ग्रॅ.) पावडर करुन पाण्यात विरघळून, तर दोन ते तीन वर्षे वयाच्या बालकास एक गोळी ( ४०० मि. ग्रॅ.) पावडर करुन पाण्यात विरघळून देण्यात येईल. गोळी घेतांना बालकाने नाश्ता अथवा जेवण केलेले असणे आवश्यक आहे. लाभार्थी संख्येनुसार आवश्यक गोळ्यांचा साठा सर्व केंद्रस्तरावर पोहोचविण्यात आला आहे. आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांचे प्रशिक्षण झाले असून शिक्षकांनाही याबाबत सचेत करण्यात आले आहे,अशीही माहिती यावेळी देण्यात आली. सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी द्यावी व १००% काम करणे. तसेच राहिलेल्या मुलांना ३ नोव्हेंबर २०२६ ला जंतनाशक गोळी देवून सदर मोहीम राबविण्यात यावे असे मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी निर्देश दिले.या सभेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, शिक्षणाधिकारी, बालरोगतज्ञ स्त्रीरोगतज्ञ् शहरी आरोग्य केंद्राचे सर्व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# ट्रकला विजेच्या तारांचा स्पर्श झाल्याने एक ठार, तीन जखमी

### देऊळवाडी येथील घटना

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** दारव्हा तालुक्यातील देऊरवाडी येथे शेतातून कुटार आणण्यासाठी जात असलेल्या ट्रकचा वीज तारांना स्पर्श झाला. यामुळे ट्रकमध्ये वीज प्रवाह शिरल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तिघांनी ट्रक बाहेर उड्या घेतल्याने ते जखमी झाले. हा अपघात आज शनिवार २४ ऑक्टोंबरच्या दुपारी देऊरवाडी येथील पांदण रस्त्यावर घडला. छगन धुमा पवार (वय ५४) असे मृताचे नाव आहे. तर शेख शमशेर खा, शेख हबीब, मोहम्मद तौफिक, अहमद लुचे हे तिघे जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या वर्षी दुष्काळी स्थिती असल्याने जनावरांच्या चाऱ्याला मोठी मागणी आहे. देऊरवाडी येथील शेतकऱ्याच्या शेतातून सोयाबीन कुटार खरेदी करून नेण्यासाठी दारव्हा येथील व्यापारी एमएच-१६/बी-५२९६ क्रमांकाच्या ट्रकने चारा घेऊन देऊरवाडी शिवारात पोहोचले. पांदण रस्त्याने शेतात जात असताना ट्रकचा लोंबकळणाऱ्या वीज तारांना स्पर्श झाला. यावेळी ट्रकमध्ये



असलेल्या मजुरांना विजेचा धक्का जाणवताच त्यांनी ट्रकमधून बाहेर उड्या घेतल्या. मात्र छगन पवार हे बाहेर पडू शकले नाही, त्यामुळे त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला. वीज पुरवठा बंद करे पर्यंत त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी दारव्हा येथे हलविण्यात आले. दरम्यान महागाव पोलिस चौकीतील जमादार आशिष अवझाडे हे घटनास्थळी पोहोचले. या प्रकरणी कांचन छगन पवार (वय २६, रा. आमला) यांनी दिलेल्या तक्रारीवरून लाडखेड पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली आहे. अधिक तपास ठाणेदार विनायक लांबे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

# जिल्हा स्त्री रुग्णालयात पुन्हा शॉर्टसर्किट

## नवजात बालकांच्या कक्षातील वॉर्मर जळून खाक

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालयातील एनएससीआयूमध्ये



लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्यानंतर बंद एनएससीआयु ५९ दिवसानंतर शुक्रवारी सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सुरू करण्यात आला होता. रुग्णालयाच्या कामकाजावर आरोग्य संचालक डॉ. संजय काटकर यांनी समाधानही व्यक्त करत आढवा घेतला होता. त्यानंतरच नव्याने तयार करण्यात आलेल्या लहान बालकांच्या एनएससीयुआय कक्षामध्ये आज शनिवार २४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ७ वाजता पुन्हा शॉर्टसर्किट झाला. यामुळे खळबळ उडाली.या आगीत कक्षातील एक वार्मर पूर्णपणे जळून खाक झाला असून, सुदैवाने त्यावर बालक त्यावेळी नव्हते, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. यामुळे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर एकदा पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचे म्हटले जात आहे. तीन नवजात बालकांच्या मृत्यूनंतरही हा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे येथील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे शॉर्टसर्किटनंतर दिवसभर या कक्षाचा एसी बंद होता. (पान २ वर)

### नवीन बांधकामातच निकृष्ट दर्जाचे काम

हा कक्ष नुकताच लाखो रुपये खर्च करून नव्याने तयार करण्यात आला आहे. मग वारंवार शॉर्टसर्किट का होत आहे? इलेक्ट्रिक वायरिंगचे काम निकृष्ट दर्जाचे झाले का? याची चौकशी कोण करणार? रुग्णालय प्रशासनाने घटनेची माहिती दाबण्याचा प्रयत्न केला, पण कर्मचाऱ्यांनीच ही माहिती बाहेर काढली. जिल्हा शल्य चिकित्सकांनी यावर तातडीने खुलासा करावा आणि संबंधित ठेकेदार व इलेक्ट्रिक विभागाची चौकशी लावावी, अशी मागणी पालकांमधून होत आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५८ वा पुण्यतिथी महोत्सव गुरुकुंजात प्रारंभ





**तिवसा/प्रतिनिधीः-** संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश देणारे युगपुरुष तथा स्वातंत्र्य सैनिक राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ५८ वा पुण्यतिथी महोत्सवास आज दि.२४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ब्रम्हमुहूर्तावर श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे प्रारंभ झाला. सकाळी ४ वाजता राष्ट्रसंतांच्या महासमाधीला अभिषेक करून शंकर महाराजांच्या हस्ते तिर्थस्थापना, चरण पादुका पूजन करून पुण्यतिथी महोत्सवाला विधिवत सुरूवात करण्यात आली. (पान २ वर)

# व्हॉट्स अॅप ग्रुपवर धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट

## -३६ वर्षीय इसमाला अटक, -पोस्टप्रकरणी चांदूर बाजार पोलिसांची कारवाई

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** व्हॉट्स अॅपवरील 'शिवशक्ती व भीमशक्ती' या ग्रुपमध्ये धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट केल्याच्या आरोपावरून चांदूर बाजार पोलिसांनी मासोद येथील ३६ वर्षीय गौरव ओमप्रकाश किटुकले याला अटक केली आहे. २३ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली. शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या दृष्टीने पोलिसांनी तातडीने कारवाई केल्याचे प्रेसनोटमध्ये नमूद आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चांदूर बाजार येथील



'शिवशक्ती व भीमशक्ती' या व्हॉट्स अॅप ग्रुपवर आरोपीने धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. याप्रकरणी पोलीस हवालदार (पान २ वर)

### यापूर्वीही गुन्हा दाखल-

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव किटुकले याच्याविरुद्ध यापूर्वीही चांदूर बाजार पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधानाच्या कलम २९५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणाची न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक संजीव खंडारे, पोलीस अंमलदार रविंद्र बावणे, आशीष राऊत, जितेश सावरकर आणि वैभव आकोटकर यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली.

# एचएसआरपी क्रमांक नसणाऱ्या ९९८ वाहनांवर कारवाई, २ लाख ५० हजाराचा दंड



एचएसआरपी क्रमांकाची प्लेट वाहनांना बसविणे अनिवार्य आहे. याबाबत वाहनांची तपासणी करण्यात आली असून, ज्या वाहनाच्या चालकांनी एचएसआरपी क्रमांकाची प्लेट बसविली नाही. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

**-नंदकिशोर काळे,** सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची प्लेट (एचएसआरपी) बसविण्याबाबत शासनाकडून निर्देश देण्यात आले असताना, निर्धारित क्रमांक प्लेट नसलेल्या वाहनांवर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत अमरावतीमध्ये एचएसआरपी क्रमांक प्लेट नसलेल्या ९९८ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. एचएसआरपी क्रमांक प्लेट ही वाहनाची ओळख निश्चित करण्यासाठी महत्त्वाची असते. वाहनांची सुरक्षित ओळख, नोंदणी क्रमांकातील सुसंगतता आणि वाहनविषयक नियमांची अंमलबजावणी यासाठी अशा क्रमांकपाट्यांना महत्त्व आहे. त्यामुळे संबंधित वाहनधारकांनी आपल्या वाहनाला नियमानुसार उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकपाटी बसवून घेणे आवश्यक आहे. वाहनाला एचएसआरपी क्रमांकपाटी नसल्यास तपासणा दरम्यान (पान २ वर)

# भरधाव अल्टोच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** भरधाव आणि निष्काळजीपणे अल्टो कार चालवून दुचाकीस्वाराला धडक दिल्यानंतर चालक घटनास्थळावरून पळून गेल्याची घटना समोर आली आहे. या अपघातात दुचाकीस्वाराच्या डाव्या पायाचे गुडघ्याखालील हाड फ्रॅक्चर झाले असून, गंभीर दुखापतीमुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. या प्रकरणी जखमीच्या मुलाने दिलेल्या जबाबावरून गुन्हा दाखल करण्यात आला




आहे. प्रज्वल देविदास राजस (वय २३, रा. पार्वती नगर क्रमांक ३, अमरावती) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे वडील दुचाकी क्रमांक एमएच २७ ईई ४४३५ या ऑक्टिव्हावरून संबंधित (पान २ वर)

# बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये वृद्धाचे २० हजार लंपास!

**भरदिवसा चोरी, सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** बँकेतून पैसे काढून थैलीत ठेवलेली २० हजार रुपयांची रोकड अज्ञात व्यक्तीने लंपास केल्याची घटना शुक्रवारी दुपारी २ ते ३ वाजताच्या दरम्यान धामणगाव रेल्वे येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत घडली. (पान २ वर)




### बँकेतील सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

बँकेत पैसे काढण्यासाठी येणाऱ्या वृद्धांसह सर्वसामान्य ग्राहकांच्या रकमेच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे. बँकेसारख्या ठिकाणी भरदिवसा चोरी होत असेल, तर ग्राहकांच्या पैशांच्या संरक्षणासाठी कोणती खबरदारी घेतली जाते, असा सवाल उपस्थित होत आहे. चोरीचा प्रकार नेमका कसा घडला, याचा उलगडा करण्यासाठी सीसीटीव्ही चित्रण महत्त्वाचे ठरू शकते. दरम्यान, या प्रकरणाचा तपास दत्तापूर पोलीस करीत असून, अज्ञात व्यक्तीची ओळख पटविण्यासह चोरीला गेलेली रक्कम शोधण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरू आहे.

# इंस्टाग्रामवर झालेल्या ओळखेनंतर अत्याचार

## -मुलाला मारण्याची धमकी देणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या ३४ वर्षीय महिलेचे प्रेम संबंधातून शोषण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या बाबत कोणाला सांगितल्यास महिलेच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी आरोपीने दिली.महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अहफाज खान अहमद खान (२७, जमील कॉलनी) विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, पीडित महिला कोतवाली ठाणे हद्दीत राहते. तिची ओळख आरोपी अहफाज खान याच्याशी इन्स्टाग्रामवर झाली होती. सुरुवातीला ही ओळख मैत्रीत बदलली आणि नंतर त्यांच्यात प्रेमसंबंध प्रस्थापित झाले. (पान २ वर)

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती अमरावती

# अध्यक्षपदी रजनीश कांबळे तर सचिव पदी सुरेश चक्रे



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती अमरावती नोंदणी क्रमांक महाराष्ट्र २६२५ अमरावती /एफ २६७४ ची त्रैवार्षिक निवडणूक आज दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भीम टेकडी सभागृहात संपन्न झाली.

आजीवन सदस्यांच्या उपस्थितीत झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी इंजिनियर रजनीश कांबळे, सचिव पदावर सुरेश चक्रे, उपाध्यक्ष म्हणून डॉ. भीमराव (पान २ वर)

# दत्तापूरमध्ये नवी पाईपलाईन फुटली

## -हजारो लिटर पाणी रस्त्यावर

**अमरावती/प्रतिनिधीः-** सरकारी निधीची उधळपट्टी आणि ठेकेदारांची मनमानी कशी चालते, याचा जीवंत नमुना दत्तापूर रेल्वे फाटा येथे पाहायला मिळाला. गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी टाकण्यात आलेली नवीन पाईपलाईन साध्या चाचणीचा दाबही सहन न करू शकल्याने फुटली. या निष्काळजीपणामुळे हजारो लिटर पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहून गेले. निकृष्ट कामाच्या पद्धतीवर नागरिकांनी जोरदार ताशेरे ओढले आहेत. नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्याचा आव आणून जेव्हा चाचणी सुरू करण्यात आली, तेव्हा पहिल्याच फटक्यात पाईपलाईनचा चक्काचूर झाला. चाचणीतच पाईप फुटल्याने ठेकेदाराने वापरलेल्या साहित्याचा दर्जा (पान २ वर)



# पठाण चौकात धारदार सत्तूर घेऊन दहशत

## -नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील पठाण चौक परिसरात हातात धारदार लोखंडी सत्तूर घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका इसमाविरुद्ध नागपुरी गेट पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने कारवाई केली. शनिवारी २४ ऑक्टोबर रोजी वजीर पटेल दवाखान्याजवळील गल्लीत ही



कारवाई करण्यात आली. पोलिसांनी संबंधित इसमाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून अंदाजे ५०० रुपये किमतीचा लोखंडी सत्तूर जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागपुरी गेट (पान २ वर)

# मोर्शी, चांदूर रेल्वेत विषारी हातभट्टीचे अड्डे उद्ध्वस्त!

## -५ हजार लिटर मोहाचा सडवा, २ हजार लिटर दारू जप्त

### -ऑपरेशन कवचअंतर्गत ग्रामीण पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन कवच'अंतर्गत मोर्शी आणि चांदूर रेल्वे तालुक्यांत गावठी हातभट्टीच्या दारू अड्ड्यांवर धडक कारवाई करण्यात आली. या दोन्ही कारवायांत एकूण ५ लाख २ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात



आला. यामध्ये सुमारे २ हजार लिटर हातभट्टीची दारू, ६ हजार ४०० लिटर मोहाचा सडवा तसेच दारू (पान २ वर)

### विषारी पदार्थांच्या वापरामुळे आरोग्याचा धोका-

हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी युरिया व अन्य रासायनिक पदार्थांचा वापर केल्याचे मोर्शीतील कारवाईत समोर आले आहे. अशा प्रकारे तयार होणाऱ्या दारूच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अवैध दारू निर्मिती आणि विक्रीविरोधातील कारवायांना महत्त्व प्राप्त झाले आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे (पान २ वर)

# रस्ता अपघातात तरुणाचा मृत्यू

**तिवसा-कुऱ्हा मार्गावरील भामोरा फाट्याजवळ घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** नोकरीवरून घरी जात असताना वाटेत झालेल्या भीषण रस्ते अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला. रोशन अशोक काळे (वय २५, शेंदूरजना खुर्द) असे मृत तरूणांचे नाव आहे.

हा अपघात तिवसा ते कुऱ्हा मार्गावर भामोरा फाट्याजवळ घडला. माहितीनुसार, मृतक रोशन काळे हा भारत फायनान्स कंपनीत कारंजा घाडगे येथे नोकरी करत होता. तो नेहमी (पान २ वर)

सारांश
जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ E-paper-www.janmadhyam.com

# टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण सुरत कनेक्शन समोर



बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबार प्रकरणामध्ये दिवसेंदिवस नवनवीन अपडेट्स समोर येत आहेत. रविवारी १८ ऑक्टोबर रोजी रात्री जुहूमध्ये दोन हल्लेखोरांनी त्यावर हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी आता मुंबई क्राइम ब्रँचकडून कसून चौकशी करत हल्लेखोरांना अटक केली जात आहे. हाय प्रोफाईल प्रकरणाचा तपास करत, पोलिसांनी सुरतमधून दोन शस्त्र आणि १० जिवंत काडतुसं जप्त करण्यात आली आहे. हल्ल्यात वापरल्या गेलेल्या शस्त्रांचा स्रोत आणि पुरवठा साखळीचा तपास सुरू असतानाच, शुक्रवारी, २३ ऑक्टोबर रोजी ही जप्ती करण्यात आली.

काही मिडिया रिपोर्टनुसार, सुरतमध्ये जप्त केलेल्या शस्त्रांचा वापर अभिनेत्याच्या कारवर गोळीबार करताना करण्यात आल्याची माहिती आहे. पण अद्याप मुंबई क्राइम ब्रांचकडून याबद्दलची कोणतीही माहिती मिळालेली नाही. मुंबई क्राइम ब्रँचने केलेल्या कारवाईमध्ये, दोन शस्त्र आणि १० काडतुसांसह तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी अटक केलेल्या आरोपींची एकूण संख्या १० पर्यंत आहे. अवैध शस्त्रे आणि दारुगोळा उपलब्ध करून देणे, टेहळणी करणे आणि गोळीबार करण्यात एका आंतरराज्यीय नेटवर्कच्या भूमिकेची गुन्हे शाखा चौकशी करत आहे.

सुरतमधून अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींची ओळख अंकित उर्फ सरपंच राजेश खटक (१८), समीर हसन खत्री (१९) आणि जतीन कृष्ण पांचाळ अशी पटली आहे. हे तिघेही हरियाणातील रहिवासी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या तिन्ही आरोपींना २२ ऑक्टोबर रोजी दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले आणि २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पोलिसांना संशय आहे की, आरोपीने गोळीबार करणाऱ्यांसाठी शस्त्रे आणि दारुगोळा उपलब्ध करून देण्यास मदत केली. यापूर्वी अटक केलेल्या व्यक्ती आणि इतर संशयितांशी समन्वय साधला. गोळीबाराच्या घटनेशी त्यांचा संभाव्य संबंध आहे का, हे तपासण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून पोलीस आता जप्त केलेल्या शस्त्रांची आणि काडतुसांची तपासणी करत आहेत.

पोलिसांना तपासाअंती असे समोर आले की, अंकित रेकी करण्यासाठी मुंबईला गेला होता. हल्ल्याच्या नियोजनात सहभागी झाला होता. तिन्ही आरोपी कथित मुख्य सूत्रधार अनिल पंडितच्या थेट संपर्कात होते का, याचाही तपास गुन्हे शाखा करत आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम ६१(२) आणि १११, जे अनुक्रमे गुन्हेगारी कट आणि संघटित गुन्हेगारीशी संबंधित आहेत. यासोबतच शस्त्र कायद्याच्या कलम २७ चा वापर केला आहे. एका संघटित गुन्हेगारी नेटवर्कचा कथित सहभाग आणि अवैध शस्त्रांच्या आंतरराज्यीय हल्ल्याचीही तपास यंत्रणा चौकशी करत असल्याने या तरतुदी जोडण्यात आल्या आहेत.गुन्हे शाखा कोठडीतील चौकशीची मागणी करत आहे, जेणेकरून शस्त्रास्त्रांची व्यवस्था कोणी केली, शस्त्रे आणि दारूगोळा कुठून आला, हल्ल्याचा आदेश कोणी दिला आणि अटक केलेल्या व पाहिजे असलेल्या आरोपींनी यात कोणती भूमिका बजावली, हे स्पष्ट झाले.

# रणबीर-यशच्या 'रामायण'चा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ!



बॉलीवूड अभिनेता रणबीर कपूर, साऊथ स्टार यश आणि अभिनेत्री साई पल्लवी यांच्या प्रमुख भूमिका असलेला बहुप्रतीक्षित चित्रपट 'रामायण' सध्या सर्वत्र चर्चेत आहे. दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या या महत्त्वाकांक्षी महाकाव्यावर आधारित चित्रपटाचा पहिला भाग येत्या ५ नोव्हेंबर रोजी दिवाळीच्या मुहूर्तावर जगभरात रिलीज होत आहे. प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाची प्रचंड उत्सुकता पाहायला मिळत असून, चित्रपटाच्या रिलीजच्या १५ दिवस आधीच सुरू झालेल्या अॅडव्हान्स बुकिंगला प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. सॅकनिल्कच्या अहवालानुसार, प्रदर्शनापूर्वीच या सिनेमाने कोट्यवधी रुपयांची कमाई करत बॉक्स ऑफिसवर घोडदौड सुरु केली आहे.

चित्रपटाच्या निर्मात्यांनी मंगळवारी अॅडव्हान्स बुकिंगची घोषणा केली होती. त्यानुसार, गुरुवार सकाळी ८ वाजेपर्यंत 'रामायण'च्या देशभरातील ३,७०७ प्रयोगांसाठी तब्बल १.२५ लाख तिकिटे विकली गेली आहेत. या दमदार प्री-तिकीट विक्रीच्या बळावर सिनेमाने ब्लॉक केलेल्या जागांसह अॅडव्हान्स बुकिंगमधून तब्बल ७.०४ कोटी रुपयांची घसघशीत कमाई केली आहे. यामध्ये केवळ ब्लॉक सीट्ससह प्री-तिकीट विक्रीतून ५.१२ कोटी रुपयांचे संकलन झाले आहे. विविध भाषांमध्ये प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाला सर्वच प्रांतांतून मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये हिंदी भाषा आघाडीवर असून तिने ६.४८ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्याखालोखाल कन्नड आवृत्तीने ४०.९५ लाखांसह दुसरे स्थान पटकावले आहे, तर तेलुगू भाषेने १५.८८ लाखांची कमाई करत तिसरे स्थान मिळवले आहे.

# लाल रंगाच्या साडीत संस्कृतिच्या ग्लॅमरस अदा



फॅशन, नृत्य आणि अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ पाडणारी लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री म्हणजे संस्कृती बालगुडे. तिच्या स्टायलिश अंदाजामुळे ती कायम चर्चेत असते. तिने नुकतेच इंस्टाग्रामवर काही फोटो शेअर केले आहेत.

पारंपरिक आणि आधुनिकतेचा एक अत्यंत सुंदर संगम तिने केला आहे. हिरव्यागार निसर्गरम्य वातावरणात तिने काढलेले फोटो लक्षवेधी ठरत आहेत.

संस्कृतीने या खास फोटोशूटसाठी गडद लाल रंगाची साडी नेसली आहे, ज्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या साडीवर देवनागरी लिपीतील मंत्र किंवा धार्मिक श्लोक छापलेले आहेत, ज्यामुळे या साडीला एक आध्यात्मिक, पारंपरिक आणि अगदी युनिक लूक मिळाला आहे.

या साडीवर तिने केस मोकळे सोडले असून केसांमध्ये हलके वेव्हज देऊन त्यांना एक मॉडर्न टच दिला आहे. त्यात तिचे सुंदर हायलाइट्स तिच्या चेहऱ्यावर अगदी शोभून दिसत आहे.

तिचा मेकअप अतिशय साधा तरीही ग्लॅमरस असा आहे, डोळ्यांना आकर्षक आयलाइनर, मस्करा, नीटनेटके आयब्रोज आणि ओठांवर शोभून दिलेली लिपस्टिक तिच्या चेहऱ्याचे सौंदर्य आणखी खुलवत आहे.

दागिन्यांच्या बाबतीत तिने गळ्यात पारंपरिक आणि आकर्षक असा लाल व सोनेरी डिझाइनचा नेकलेस परिधान केला असून, हातात बोटामध्ये स्टायलिश रिंग घातल्या आहेत.

हिरव्यागार पार्श्वभूमीवर, एका खडकावर बसून कॅमेऱ्याच्या लेन्ससमोर दिलेला हा लूक अत्यंत देखणा, शांत आणि आपल्या समृद्ध सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करणारा भासतो. या संपूर्ण लूकचे मुख्य आकर्षण म्हणजे तिच्या पायातील हेवी ऑक्सिडाइज्ड पैंजण, जे अनवाणी पायांवर अत्यंत सुंदर दिसत आहेत.

# रोहित शेट्टीचा पारा चढला



सध्या 'बिग बॉस २०' हा शो प्रेक्षकांच्या चर्चेचा विषय बनला आहे. घरातील स्पर्धकांची बदलती समीकरणे आणि रोज नवीन होणारे वाद यामुळे चाहत्यांची उत्सुकता दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी माही विज आणि आम्रपाली दुबे यांच्यातील खडाजंगी असो वा माही व काजी यांच्यातील वाद, घरातील वातावरण नेहमीच तापलेले असते. अशातच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारा 'वीकेंड का वार'चा भाग समोर आला आहे. विशेष म्हणजे, या आठवड्यात नेहमीप्रमाणे सलमान खान नाही, तर लोकप्रिय दिग्दर्शक रोहित शेट्टीने शोची धुरा सांभाळली आहे आणि त्यांनी पहिल्याच वारीत घरातील काही सदस्यांना चांगलेच फैलावर घेतले आहे.

रोहित शेट्टीच्या रडारवर आले स्काउट आणि लव गिल

जिओहॉटस्टारवर रिलीज झालेल्या एका नवीन प्रोमोने इंटरनेटवर खळबळ उडवून दिली आहे. या प्रोमोमध्ये दिग्दर्शक रोहित शेट्टी घरातील प्रसिद्ध कंटेस्टंट स्काउटओपी आणि लवप्रीत गिल यांच्यावर कडाडलेले दिसत आहेत. या दोघांमधील वाढती जवळीक आणि सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झालेला त्यांचा 'ब्लँकेट मसाज' हा वादग्रस्त विषय थेट रोहित शेट्टीच्या निशाण्यावर आला. शोच्या मंचावर त्यांनी या दोघांना बोलावून त्यांच्या या विचित्र वागणुकीबद्दल धारेवर धरले आणि कॅमेऱ्यासमोर हे सर्व अजिबात शोभणारे नाही, अशा शब्दांत तंबी दिली.

**'भावासारखा मानते मग हा प्रकार का?' - रोहित शेट्टीचा सवाल**

व्हायरल झालेल्या प्रोमोमध्ये रोहित शेट्टी यांनी लवप्रीत गिलला थेट प्रश्न विचारला की, 'लव, तुझ्यासाठी स्काउट कोण आहे?' यावर लवप्रीतने उत्तर दिले की ती स्काउटला आपल्या भावासारखे मानते. हे ऐकून रोहित आणखी संतापले आणि म्हणाले की, 'जर तो तुझा भाऊ आहे, तर मग कॅमेऱ्यासमोर हे असं काय चाललंय?' त्यांनी लवप्रीतला समजावले की, जेव्हा तो तुझे पाय, हात आणि मान दाबतो, तेव्हा ते टीव्हीवर अजिबात चांगले दिसत नाही. तू त्याला मागे उभे राहून मालिश करायला सांगतेस आणि तो तुझ्या पायाच्या पिंडलिया दाबतो, हे स्क्रीनवर अत्यंत चुकीचे आणि विचित्र वाटते. जिओहॉटस्टारने हा प्रोमो शेअर करताना लिहिले होते- 'रोहित शेट्टीने काढला मसाजचा विषय, आणि लावली स्काउट अन् लव गिलची क्लास!'

**व्हायरल व्हिडिओचे सत्य आणि स्काउटचा बचाव**

नक्की काय घडले होते? काही दिवसांपूर्वी घरातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर आगीसारखा पसरला होता. या व्हिडिओमध्ये स्काउटओपी एका ब्लँकेटच्या (कंबळाच्या) आत बसून लवप्रीतचे हात, पाय आणि पिंडलिया चोळताना किंवा मालिश करताना दिसून आला होता. जेव्हा रोहित शेट्टीने यावर कडक आक्षेप घेतला, तेव्हा स्काउटओपीने स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. त्याने असे स्पष्टीकरण दिले की, तो फक्त लवप्रीतचीच नव्हे, तर घरातील इतर स्पर्धक जसे की माही विज हिने जरी सांगितले, तरी तो तिचीही अशाच प्रकारे मसाज करतो.

मात्र, स्काउटचे हे कारण रोहित शेट्टीने अजिबात ऐकून घेतले नाही. त्यांनी स्काउटला स्पष्ट शब्दांत खडसावले की, लवप्रीतसोबतचे त्याचे हे अतिशय जवळिकीचे वर्तन टीव्ही बघणाऱ्या लाखो प्रेक्षकांसमोर खूप चुकीचा मेसेज देत आहे. 'बिग बॉस २०'च्या या वीकेंडच्या वारीत रोहित शेट्टीच्या या कडक आणि दरारा असलेल्या रूपामुळे घरातील इतर सर्व स्पर्धकही सावध झाले असून, हा 'ब्लँकेट मसाज'चा वाद सध्या सोशल मीडियावर आणि चाहत्यांमध्ये चर्चेचा सर्वात मोठा विषय ठरला आहे!

# 'उड़ता तीर' पाहावा की नाही?

बॉलिवूडमध्ये देश भक्ती, गुप्तहेरगिरी आणि विनोद यांची सांगड घालणारे चित्रपट अनेकदा पाहायला मिळतात. मात्र, हे सगळे घटक एकत्र आणताना प्रेक्षकांचे मनोरंजन करणे सोपे नसते. आयुष्मान खुराना आणि सारा अली खान यांची प्रमुख भूमिका असलेला 'उड़ता तीर' हा चित्रपटही याच प्रकारात मोडतो. गुप्तहेरांचे मिशन, मेमरी हरवलेला नायक आणि त्यातून निर्माण होणारा गोंधळ, अशा गोष्टींमधून चित्रपट विनोदाची फोडणी देण्याचा प्रयत्न करतो.

चित्रपटाची कथा काही ठिकाणी रेंगाळत असली, तरी विनोदी प्रसंग, अनपेक्षित वळणे आणि कलाकारांचा अभिनय यामुळे मनोरंजन होते. त्यामुळे हलकाफुलका चित्रपट पाहण्याची इच्छा असलेल्या प्रेक्षकांसाठी 'उड़ता तीर' हा चित्रपट खास आहे.

**नेमकी काय आहे चित्रपटाची कथा?**

या चित्रपटात आयुष्मान खुराना याने विक्रांतची भूमिका साकारली आहे. विक्रांत स्वतःला भारतीय गुप्तचर यंत्रणा णऊए चा अधिकारी समजतो. मात्र, कथेत एक मोठे वळण येते. तो प्रत्यक्षात बिलाल नावाचा पाकिस्तानी एजंट असतो. एका अपघातानंतर त्याची स्मरणशक्ती जाते आणि तो स्वतःची खरी ओळख विसरतो.

यानंतर सुरू होतो गोंधळ. स्वतःला भारतीय अधिकारी समजणारा विक्रांत आपल्याच लोकांच्या विरोधात उभा राहतो. यातून अनेक मजेशीर प्रसंग घडतात. चुकीची ओळख आणि गुप्तहेरगिरी यांची सांगड घालत चित्रपटात विनोद आणि थोडासा थरार निर्माण केला आहे.




चित्रपटाची सुरुवातीची सुमारे अर्धा तास कथा आणि पात्रांची ओळख करून देण्यात जातो. त्यामुळे सुरुवातीला चित्रपटाची गती थोडी मंद वाटू शकते. मात्र, कथा पुढे सरकताच वेगवेगळे प्रसंग आणि वळणे मनोरंजन करतात.

मध्यंतरानंतर काही भागांत पुन्हा गती कमी होते. तरीही, त्यानंतर चित्रपट पुन्हा रुळावर येतो. कथेत फार मोठे गूढ किंवा प्रेक्षकांना सतत विचार करायला लावणारा भाग नाही. मात्र, मध्येच येणारे विनोदी संवाद आणि प्रसंग हसवण्याचे काम करतात.

**आयुष्मान खुरानाचा वेगळा अंदाज**

आयुष्मान खुराना नेहमीच वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका साकारण्यासाठी ओळखला जातो. 'उड़ता तीर'मध्येही तो एका वेगळ्या भूमिकेत दिसतो. स्वतःची ओळख विसरलेल्या आणि दोन वेगवेगळ्या ओळखींच्या गोंधळात अडकलेल्या व्यक्तीची भूमिका त्याने चांगल्या प्रकारे साकारली आहे.

त्याच्या अभिनयातील निरागसपणा आणि गोंधळलेली देहबोली विनोदी प्रसंगांना अधिक रंगत आणतात. गंभीर प्रसंग आणि विनोद यांच्यात समतोल साधण्याचा त्याचा प्रयत्न दिसून येतो. चित्रपटाची कथा काही ठिकाणी कमकुवत वाटत असली, तरी आयुष्मानचा अभिनय मनोरंजनात भर घालतो.

**राहुल बोसची कॉमेडी ठरते खास**

या चित्रपटातील राहुल बोसचा अभिनय विशेष लक्ष वेधून घेतो. त्यांना अशा प्रकारच्या विनोदी भूमिकेत पाहणे प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव आहे. त्यांच्या विनोदी अभिनयातील सहजता आणि योग्य वेळी आलेले संवाद चित्रपटातील अनेक प्रसंग रंगतदार बनवतात.

काही दृश्यांमध्ये राहुल बोस आयुष्मान खुरानालाही मागे टाकतात, असे चित्रपट पाहताना जाणवते. त्यांच्या भूमिकेमुळे कथेतला विनोद अधिक खुलतो. त्यामुळे चित्रपटातील लक्षात राहणाऱ्या कलाकारांमध्ये राहुल बोसचे नाव नक्कीच घेतले जाऊ शकते.

**दिवंगत मुकुल देव यांची उपस्थिती**

दिवंगत अभिनेते मुकुल देव यांची उपस्थितीही या चित्रपटातील महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्या अभिनयामुळे कथेला आधार मिळतो. पडद्यावर त्यांना पाहणे चाहत्यांसाठी भावूक अनुभव ठरू शकतो. त्यांच्या चित्रपटप्रवासाची आठवण करून देणारा हा चित्रपट त्यांच्या चाहत्यांसाठी विशेष ठरू शकतो. त्यांच्या भूमिकेतील कामामुळे कथेतही वेगळी छाप उमटते.

**सारा अली खानसह इतर कलाकारांची कामगिरी कशी?**

सारा अली खान आणि स्मिता तांबे यांनी आपापल्या भूमिका योग्य प्रकारे साकारल्या आहेत. सुहैल नैय्यर यालाही चांगली भूमिका मिळाली असून, त्याने या संधीचं सोनं केलं आहे.

याशिवाय राम कपूर, बृजेंद्र काला आणि गुलशन ग्रोव्हर यांच्याही भूमिका चित्रपटात रंगत आणतात. सहाय्यक कलाकारांच्या अभिनयामुळे अनेक प्रसंग अधिक मनोरंजक होतात. कलाकारांची फळी चांगली असली, तरी प्रत्येक पात्राला समान संधी मिळतेच असे नाही.

**गाणी सामान्य; पार्श्वसंगीत मात्र प्रभावी**

चित्रपटातील गाणी फारशी लक्षात राहत नाहीत. ती सामान्य स्वरूपाची वाटतात. मात्र, पार्श्वसंगीतामुळे काही प्रसंग अधिक प्रभावी होतात. विनोदी दृश्ये आणि थरार निर्माण करणाऱ्या प्रसंगांमध्ये पार्श्वसंगीताची साथ चांगली मिळते.

छायाचित्रण आणि संकलनही समाधानकारक आहे. मात्र, काही ठिकाणी संकलन अधिक चांगले असते, तर चित्रपटाची गती सुधारली असती. कथेत अनावश्यक वाटणारे काही भाग कमी केले असते, तर मनोरंजनाचा अनुभव आणखी चांगला झाला असता.

**दिग्दर्शकाचा प्रयत्न कितपत यशस्वी?**

दिग्दर्शक आणि लेखक आकाश ए. कौशिक यांनी देशभक्ती, अ?क्शन, गुप्तहेरगिरी आणि विनोद यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. काही प्रसंगांमध्ये कथा अपेक्षित वेगाने पुढे जात नाही. तसेच, चित्रपटात मोठ्या ससपेन्सची अपेक्षा ठेवणाऱ्या प्रेक्षकांची थोडी निराशा होऊ शकते. मात्र, आयुष्मान खुरानाचा वेगळा अभिनय, राहुल बोसची विनोदी शैली आणि काही मजेशीर प्रसंग यामुळे चित्रपट पाहण्याजोगा आहे.

**'उड़ता तीर' पाहावा की नाही?**

एकूणच, 'उड़ता तीर' हा देशभक्ती, गुप्तहेरगिरी आणि विनोद यांचा संगम असलेला हलकाफुलका चित्रपट आहे. कथेत काही ठिकाणी गती कमी होते आणि गाणीही फारशी प्रभावी नाहीत. तरीही, कलाकारांचा अभिनय आणि विनोदी प्रसंग चित्रपटाला मनोरंजक बनवतात.

तुम्हाला गंभीर कथानकापेक्षा हलकेफुलके मनोरंजन आवडत असेल, तर हा चित्रपट पाहण्याचा विचार करू शकता. मात्र, सस्पेन्स, थरार किंवा अतिशय वेगवान कथा अपेक्षित असेल, तर तुमचा अपेक्षाभंग होऊ शकतो.

# विकासाच्या वाटेत चीनचा खोडा...

**चीनने अवजड यंत्रसामग्री आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या निर्यातीवर निर्बंध घालून भारताच्या पायाभूत सुविधा विकासासमोर नवे आव्हान उभे केले आहे.**

आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत थेट समोरासमोर युद्ध न छेडता अर्थकारण, जागतिक पुरवठा साखळी आणि संवेदनशील तंत्रज्ञानाच्या नाड्या आवळून दुसऱ्या देशाची पद्धतशीर कोंडी करणे, ही चीनची प्रदीर्घ काळापासून चालत आलेली खोड आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर लष्करी दबाव निर्माण करणे किंवा आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मुत्सद्दी अडथळे उभे करणे यात अपयश आल्यानंतर आता चीनने आपला मोर्चा भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्राकडे वळवला आहे. टनेल बोअरिंग मशिन्ससह (टीबीएम) आधुनिक पायाभूत उभारणीसाठी अनिवार्य असणाऱ्या अनेक प्रकारच्या अवजड यंत्रसामग्रीच्या निर्यातीवर बीजिंगने जाहीर केलेले कडक निर्बंध हे त्याच छुप्या आर्थिक व तंत्रज्ञान युद्धाचे ताजे पर्व आहे. या निर्णयामागे चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने 'राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वभौम हितांचे रक्षण' हे तकलादू कारण पुढे केले असले, तरी या हालचालींचा खरा रोख वेगाने धावणाऱ्या भारताच्या नागरी आणि सामरिक प्रकल्पांची गती रोखण्याकडेच आहे.

गेल्या दशकात भारताने पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा आमूलाग्र बदलून टाकला. प्रमुख महानगरांत भुयारी मेट्रोचे जाळे विणणे असो, द्रुतगती महामार्ग उभारणे असो, अतिवेगवान रेल्वे मार्गांची आखणी असो वा उत्तरेकडील आणि ईशान्येकडील अतिदुर्गम हिमालयाच्या कुशीत सैन्याच्या वेगवान हालचालींसाठी बोगदे खोदणे असो; भारताने भौगोलिक मर्यादांवर मात करत विकासाचा नवा अध्याय सुरू केला. या अवाढव्य बांधकामांचा केंद्रबिंदू म्हणजे जमिनीच्या पोटात शिरासारखे भुयार खणून एकाच वेळी माती उपसणारी आणि काँक्रीटचे आवरण घालणारी महाकाय 'टनेल बोअरिंग मशिन्स'. चीनने केवळ या यंत्रांवरच निर्बंध लादलेले नाहीत, तर अत्यंत बिकट आणि खडकाळ पर्वतीय भूभागात काम करू शकणाऱ्या 'वॉकिंग एक्स्कव्हेटर्स', अतिउंचीवरील पठारी प्रदेशात काँक्रीटची अचूक फवारणी करणाऱ्या 'वेट शॉटक्रिट मशिन्स' आणि नद्या, बंदरे अथवा जलाशयांच्या तळाशी साचलेला गाळ उपसणाऱ्या उच्च क्षमतेच्या 'ड्रेझर उपकरणां?'वरही निर्बंधांची कुऱ्हाड चालवली आहे.

नव्या नियमावलीनुसार चीनमधून ही उपकरणे आणि त्यांचे मुख्य सुटे भाग निर्यात करणाऱ्या कंपन्यांना चिनी वाणिज्य मंत्रालयाकडून विशेष परवाने घेणे सक्तीचे केले आहे. या साहित्याला नागरी आणि लष्करी अशा ?'दुहेरी वापरा?'च्या श्रेणीत ढकलून चीनने सीमाशुल्क यंत्रणांना अमर्याद अधिकार दिलेत. नियंत्रित वस्तूंशी केवळ तांत्रिक साम्य आढळले तरी तपासणीच्या नावाखाली माल अनिश्चित काळासाठी रोखून धरण्याची मुभा या नियमांत आहे. कागदी घोडे नाचवून आणि लालफितीच्या कारभारात पुरवठ्याची साखळी अडकवून भारताच्या बोगदा प्रकल्पांना वेठीस धरायचे, अशी ही सुनियोजित रणनीती आहे.

या निर्यात निर्बंधांचा सर्वाधिक फटका भारताच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना बसण्याचा धोका संभवतो. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील वांद्रे-कुर्ला संकुल ते शिळफाटा या सुमारे २१ किलोमीटर लांबीच्या समुद्राखालून जाणाऱ्या भूमिगत बोगद्याचे काम सध्या नाजूक टप्प्यावर आहे. या कामासाठी महाकाय जर्मन यंत्रे वापरली जात असली, तरी त्यांचे अनेक सुटे भाग आणि जोडणीचे काम चिनी कारखान्यांशी निगडित असल्याने या पुरवठ्यावर गदा येऊ शकते. याचबरोबर दिल्ली मेट्रोचा



चौथा टप्पा, प्रादेशिक जलद वाहतूक प्रणाली, तसेच चेन्नई, बंगळूर आणि कोलकाता येथील भुयारी मेट्रोच्या मार्गिकांचे कामही अशाच टीबीएम मशिन्सच्या उपलब्धतेवर विसंबून आहे. या प्रकल्पांना उशीर झाल्यास लोकांची गैरसोय वाढेल तसेच प्रकल्प खर्चात हजारो कोटी रुपयांची भर पडेल.

लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि अरुणाचल प्रदेश या हिमालयीन सीमाभागात कोणत्याही ऋतूत लष्कराची रसद अखंडित सुरू राहावी, यासाठी सीमा रस्ते संघटना आणि संबंधित यंत्रणा अहोरात्र बोगद्यांची कामे करत आहेत. 'झोझिला बोगदा', अतिउंचीवर बांधला जाणारा विक्रमी 'शिंकूला बोगदा', अरुणाचल प्रदेशातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या दिशेने जाणारे विविध लष्करी बोगदे आणि उत्तराखंडमधील ऋषिकेश-कर्णप्रयाग रेल्वे मार्गावरील अनेक भुयारी टप्पे हे देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने जीवनरेखा मानले जातात. अतिउंचीवरील खडकाळ भागात बोगदा खोदण्यासाठी लागणारी वॉकिंग एक्स्कव्हेटर्स किंवा काँक्रीट फवारणी यंत्रे चीनने रोखल्यास या लष्करी महत्त्वाच्या प्रकल्पांची गती मंदावू शकते.

ड्रेझर स्लरी पंप, कटरहेडस् आणि ड्रॅगहेडस् यांसारख्या सागरी उत्खनन उपकरणांवरील बंधनांमुळे भारताच्या बंदरांचा विकास, जलमार्गांचे खोलीकरण आणि सागरमाला प्रकल्पातील गाळ उपसण्याच्या कामांमध्ये खोडा घातला जाऊ शकतो. भयानक बाब म्हणजे, अवजड यंत्रसामग्रीवरील या निर्बंधांनंतर लगेचच चीनने कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि सौर ऊर्जेसारख्या १४ अतिमहत्त्वाच्या भविष्यातील तंत्रज्ञानांवरही निर्यात निर्बंध घालण्याचा मसुदा पुढे केला.

भारताने या संकटाची गांभीर्याने दखल घेत दोन आघाड्यांवर अत्यंत वेगाने पावले उचलण्यास सुरुवात केली, ही बाब निश्चितच दिलासादायक आहे. परकीय अवलंबित्व संपुष्टात आणण्यासाठी देशांतर्गत पातळीवर 'भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड' या नवरत्न सार्वजनिक उपक्रमाने आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांशी हातमिळवणी करून भारतातच ६ ते १६.५ मीटर व्यासाच्या महाकाय टीबीएम मशिन्स डिझाईन आणि विकसित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. पहिल्या टप्प्यात नागरी मेट्रोसाठी उपयुक्त ठरणारी साडेसहा मीटर व्यासाची यंत्रे देशातच तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. देशातील अवजड अभियांत्रिकी परिसंस्थेचा विस्तार केला जात असून, एलअँडटी कंपनी टीबीएमच्या बाह्य रचनेची जोडणी भारतातच करत आहे. कटरहेड डिस्क, बेअरिंग्स आणि हायड्रॉलिक सिस्टीम यांसारखे क्लिष्ट सुटे भाग स्थानिक पातळीवर निर्माण करण्यासाठी संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) व खासगी उद्योगांमध्ये ताळमेळ साधला जात आहे. नवीन यंत्रांची वाट पाहण्याऐवजी आधीपासून देशात असलेल्या जुन्या टीबीएम मशिन्सचे आयुष्य वाढवण्यासाठी चेन्नई आणि महाराष्ट्रातील औद्योगिक केंद्रांमध्ये 'रिमॅन्युफॅक्चरिंग' तंत्रज्ञानाचा अवलंब सुरू आहे.

अर्थात, संपूर्ण स्वदेशी बनावटीची टीबीएम यंत्रे तयार होण्यास काही कालावधी लागणार असल्याने, चालू प्रकल्पांचे काम रखडू नये म्हणून भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रदेशांशी सहकार्य वाढवले आहे. जर्मन कंपनी 'हेरनकनेख' हिला चीनमधील कारखान्यांवर विसंबून न राहता भारतातच (विशेषतः चेन्नई परिसरात) असेंब्ली युनिट उभारण्यास प्रवृत्त केले आहे. तसेच जपानच्या 'जायका'च्या सहकार्यातून कावासाकी, कोमात्सू आणि हिताची यांसारख्या विश्वासू जपानी कंपन्यांकडून थेट यंत्रे आणि सागरी ड्रेजिंग उपकरणे मिळवण्याचे मार्ग खुले केले आहेत.

अतिउंचीवरील कामांसाठी इटली, स्वित्झर्लंड आणि दक्षिण कोरियातील पर्यायी पुरवठादारांशी करार केले जात आहेत.

जोपर्यंत अशा अवाढव्य यंत्रसामग्रीच्या बाबतीत स्वतःच्या पायावर उभा राहत नाही, तोपर्यंत ड्रॅगनच्या अशा कुरापतींचे सावट आपल्या विकासावर पडतच राहील. भारताच्या समृद्धीची आणि सुरक्षेची वाट डोंगरांच्या पोटातून जाणाऱ्या बोगद्यांमधून जात असली, तरी ती वाट कोणत्याही शेजाऱ्याच्या कृपेवर अवलंबून असता कामा नये. चीनच्या या ताज्या निर्बंधांनी भारताच्या स्वावलंबनाची गती अधिक तीव्र करण्याची वेळ आणली आहे.

# कॅसिनोंचे आकर्षण अन् डोकेदुखी



**गोव्यातील मांडवी काठचे कॅसिनो स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. वाहतूक कोंडीपासून मांडवी नदीच्या प्रदूषणापर्यंत अनेक विषय आहेत. आता उच्च न्यायालयानेच वाहतुकीवर निर्बंध आणले आहेत.**

गोव्यातील मांडवी काठचे कॅसिनो स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. वाहतूक कोंडीपासून मांडवी नदीच्या प्रदूषणापर्यंत अनेक विषय आहेत. आता उच्च न्यायालयानेच वाहतुकीवर निर्बंध आणले आहेत.

निळा समुद्र, सोनेरी वाळू, पोर्तुगीज वास्तुकला यासाठी प्रसिद्ध गोवा आणखी एका कारणासाठी विख्यात झाला आहे, मांडवीकाठच्या कॅसिनोंसाठी. उत्तर भारतापासून दक्षिण भारतापर्यंत त्याची एक वेगळीच क्रेझ आहे. पूर्वी गोव्यात उतरल्यावर कळंगुट, हरमल किनाऱ्यासंबंधी विचारणारे पर्यटक आता कॅसिनोचा पत्ता विचारतात. मांडवीच्या पात्रात उभ्या त्या चमकदार, भव्य कॅसिनो नौका पर्यटनाच्या पोस्टरवर आकर्षक दिसतात; पण या कॅसिनोंमुळे पणजीत राहणाऱ्या आणि रोज कामानिमित्त शहरात येणाऱ्या सामान्य माणसाचे आयुष्य कठीण होत चालले आहे. दयानंद बांदोडकर मार्ग हा पणजीचा मुख्य रस्ता. १५ ऑगस्टचा मुख्य कार्यक्रम, जुने सचिवालय, पणजी मार्केट, कला अकादमी, आयनॉक्स कोर्टयार्ड, मिरामार, दोनापावलाकडे याच मार्गावरून जावे लागते. कार्निव्हलचे चित्ररथ याच मार्गावरून जातात. संध्याकाळ झाली की या रस्त्याचे रूपच बदलते. संध्याकाळी सात ते दहाच्या दरम्यान इथे पाय ठेवायला जागा नसते.

कॅसिनोवर जाणाऱ्या गाड्या, टॅक्सी, खासगी वाहनांमुळे दोन लेनचा रस्ता एका लेनचा होतो. वाहतूक पोलिस बघ्याची भूमिका घेतात, असा स्थानिकांचा थेट आरोप आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे सुरक्षिततेसाठी लावलेल्या लोखंडी ग्रील्सची तोडफोड.

वाहतूक सुरळीत राहावी, पादचाऱ्यांनी कुठेही रस्ता ओलांडू नये म्हणून सरकारने लाखो रुपये खर्च करून हा दुभाजक आणि ग्रील्स बसवले; पण प्रत्यक्षात काय घडले? कॅसिनोच्या प्रवेशद्वारासमोर नेमके जिथे ग्राहकांना सोयीचे आहे, तिथेच या ग्रील्स कापून थेट एन्ट्री केली आहे. सरकारी मालमत्तेची नासधूस करून धंद्यासाठी रस्ता बनवायचा, हा प्रकार एक-दोन ठिकाणी नाही, तर मांडवी किनाऱ्यावरील जवळजवळ प्रत्येक मोठ्या कॅसिनो ऑफिससमोर दिसतो. सामान्य माणसाने आपल्या घरासमोरचा फुटपाथ अडवला, तरी महापालिका कारवाई करते; पण इथे भर रस्त्यात लोखंडी ग्रील्स कापले जातात आणि कोणी काहीच बोलत नाही. अखेर या सगळ्या प्रकाराची दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाला स्वतःहून घ्यावी लागली.

खंडपीठाने या परिसरात पार्किंगवर कडक निर्बंध लागू केले असून, त्यासंबंधीचा अंमलबजावणी अहवाल चार आठवड्यांत देण्याचे निर्देशही दिले आहेत.

वाहतूक हा एक भाग झाला; पण दुसरा आणि अधिक गंभीर मुद्दा आहे, तो मांडवी नदीच्या प्रदूषणाचा. मांडवी ही गोव्याची जीवनवाहिनी आहे; पण गेल्या काही वर्षांपासून तिच्या पाण्याची गुणवत्ता खालावल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

कॅसिनो नौकांवर दररोज हजारो लोक येतात, जेवणावळी होतात, शौचालये वापरली जातात. मग या नौकांचे सांडपाणी जाते कुठे? कॅसिनो कंपन्यांचा दावा आहे की त्या सांडपाणी नदीत सोडत नाहीत.

त्यांच्या नौकांवर सांडपाणी साठवण्यासाठी टाक्या आहेत आणि ते गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळ कर्मचाऱ्यांच्या आणि बंदर कप्तानाच्या देखरेखीखाली सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात पाठवले जाते, याची लॉगबुकमध्ये नोंद असते.

प्रदूषण मंडळाने नुकत्याच उच्च न्यायालयात सादर केलेल्या अंतरिम अहवालातही म्हटले आहे की, २४ ऑगस्ट २०२६ रोजी मांडवीच्या २२ ठिकाणी भरती-ओहोटीच्या वेळी घेतलेल्या ४४ पैकी सर्व ४४ नमुन्यांमध्ये मलातील जिवाणूंचे, फिकल कॉलिफॉर्मचे प्रमाण १०० एमपीएनच्या मर्यादेपेक्षा जास्त आढळले;

पण त्यासाठी कॅसिनो जबाबदार नाहीत, तर सांत इनेज नाल्यासारख्या शहरी नाल्यांमधून येणारे प्रक्रिया न केलेले घरगुती सांडपाणी जबाबदार आहे. सांडपाणी किनाऱ्यावर आणले जाते, तर ते नेणारा टँकर कधीही कॅसिनोच्या जेटीसमोर का दिसत नाही? सरकारने या टँकरच्या फेऱ्या, त्यांचे जीपीएस रेकॉर्ड, याचे पुरावे द्यावेत, केवळ लॉगबुकवर विश्वास ठेवणे कठीण आहे, असे लोकांचे म्हणणे आहे. कॅसिनोंमधून गोवा सरकारला दरवर्षी शेकडो कोटींचा महसूल मिळतो, हे खरे आहे; पण गोव्याची संस्कृती ही जुगाराची नाही.

पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी कॅसिनो हवेत, पण स्थानिकांचे जगणे वेठीस धरून नव्हे; अन्यथा पर्यटकांचे आकर्षण असलेले हे दिवे एक दिवस मांडवीची आणि पणजीची ओळखच पुसून टाकतील.

**आधुनिक युद्धांमध्ये ड्रोन, इलेक्ट्रॉनिक युद्धतंत्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. या पार्श्वभूमीवर भारत स्वदेशी ड्रोननिर्मिती, ड्रोनविरोधी शस्त्र प्रणाली आणि बहुस्तरीय हवाई संरक्षण जाळे उभारण्यावर भर देत आहे.**

# भारताची ड्रोन सज्जतेकडे वाटचाल

आधुनिक युद्धांमध्ये ड्रोन, इलेक्ट्रॉनिक युद्धतंत्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. या पार्श्वभूमीवर भारत स्वदेशी ड्रोननिर्मिती, ड्रोनविरोधी शस्त्र प्रणाली आणि बहुस्तरीय हवाई संरक्षण जाळे उभारण्यावर भर देत आहे.

रशिया-युक्रेन युद्धाने आधुनिक युद्धतंत्राचे अनेक प्रस्थापित निकष बदलून टाकले. काही लाख रुपये किमतीचे छोटे ड्रोन कोट्यवधी रुपयांच्या अत्याधुनिक शस्त्र प्रणालींना आव्हान देत आहेत. शत्रूच्या हालचाली टिपणे, लष्करी तळांची टेहळणी, अचूक लक्ष्यभेदन आणि हवाई संरक्षण व्यवस्थेला चकवा देणे अशा जबाबदाऱ्या ड्रोन पार पाडत आहेत. युक्रेनने रशियाच्या लष्करी तळांवर आणि सामरिक ठिकाणांवर केलेल्या ड्रोन हल्ल्यांनी या तंत्रज्ञानाची परिणामकारकता सिद्ध केली. इलेक्ट्रॉनिक जॅमिंग, जीपीएस संकेतांमध्ये हस्तक्षेप आणि संप्रेषण यंत्रणा निकामी करण्याच्या तंत्रामुळे युद्धाला नवे परिमाण प्राप्त झाले. रणांगणावरील संघर्ष आता जमिनीवर, आकाशात आणि समुद्रात लढला जात असतानाच विद्युत चुंबकीय स्पेक्ट्रममध्येही त्याची स्वतंत्र आघाडी उघडली गेली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्येही या बदलत्या युद्ध तंत्राचे महत्त्व अधोरेखित झाले. चीन आणि पाकिस्तानकडून वाढणारी लष्करी आव्हाने लक्षात घेता भारताने ड्रोननिर्मिती, ड्रोनविरोधी संरक्षण व्यवस्था आणि इलेक्ट्रॉनिक युद्धतंत्राच्या विकासाला वेग दिला. पाकिस्तानने तुर्कियेच्या 'कॉर्कुट ३५ एमएम' तोफा, साहिन काऊंटर प्रणाली आणि चिनी 'एचक्यू-१७' क्षेपणास्त्रांचा समावेश सशस्त्र दलात केला आहे. 'ऑपरेशन सिंदू'मध्ये मानवरहित प्रणालींनी लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रांइतकेच महत्त्वाचे काम केले. त्यामुळे भारतीय दलांची संरचनाच झपाट्याने बदलत असून, ड्रोनसिद्धतेकडे वाटचाल सुरू आहे.

भारतीय सैन्याच्या सुमारे ३८५ पायदळ बटालियन्सना आता स्वतःच्या अश्नी प्लाटून्स' मिळणार आहेत. यात प्रत्येक 'प्लाटून'मध्ये दहा ड्रोन असतील. चार ड्रोन निरीक्षणासाठी, तर सहा आत्मघाती शस्त्रे म्हणून असतील. कमांडरला लक्ष्यावर प्रहार करण्यासाठी वरच्या परवानगीची गरज राहणार नाही. तो स्वतः लक्ष्य शोधून हल्ला करू शकतो. 'शौर्य स्क्वॉड्रन्स' नावाच्या 'ड्रोन युनिट'चा समावेश आता 'टी-९०' आणि 'अर्जुन' रणगाड्यांच्या रेजिमेंटमध्ये केला आहे. झाशीजवळ 'अमोघ ज्वाला?' सरावात याची चाचणी झाली. यामुळे रणगाडा दलाची क्षमता वाढली. तोफखाना दलासाठीही



'दिव्यास्त्र' बॅटऱ्या हीच भूमिका पार पाडत आहेत. वेगवान ड्रोन कारवायांसाठी 'भैरव कमांडो बटालियन' उभारल्या जात आहेत. प्रत्येक लढाऊ शाखेकडे स्वतःची सेंद्रिय ड्रोन क्षमता असावी, ही कल्पना यामागे आहे. भारताने किमान ६० टक्के स्वदेशी घटकांसह ८७ 'एमएएलई' ड्रोननिर्मितीचा कार्यक्रम सुरू केला आहे. यामुळे इस्रायली आयातीवरील दशकांपासूनचे देशाचे अवलंबित्व कमी होणार आहे. 'एमएएलई' प्रकारातील ड्रोनमध्ये अनेक तास सीमाक्षेत्रांवर घिरट्या घालण्याची क्षमता असून, त्यांना धावपट्टीची आवश्यकता नसते. ते एकाच वेळी निरीक्षण व प्रहार अशा दोन्ही भूमिका बजावू शकतात.

'डीआरडीओ'चे प्रमुख ड्रोन प्रकल्प

'आर्चर-एनजी' : या ड्रोनची निर्मिती सुरुवातीला निरीक्षणासाठीच करण्यात आली होती. मात्र, आता त्यावर अचूक लक्ष्यभेदन करणारे बॉम्ब आणि हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे बसवली आहेत. त्यामुळे हा ड्रोन आता लक्ष्य हेरण्यासोबतच त्याचा नाशही करू शकतो.

**'घातक' :** हा भारताचा 'स्टेल्थ' लढाऊ ड्रोन आहे. तो शत्रूच्या हवाई संरक्षण व्यवस्थेला चकवा देऊन शत्रुप्रदेशात खोलवर घुसखोरी करू शकतो. तसेच, हल्लाही करू शकतो.

**'तपास-बीएच' :** ही भारताची दीर्घकाळ निरीक्षण करणारी स्वदेशी प्रणाली असून, विशेषतः प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आणि नियंत्रण रेषेवरील देखरेखीसाठी तिची निर्मिती करण्यात आली आहे. हे तिन्ही प्रकल्प आता प्रत्यक्ष सेवेत दाखल होण्याच्या टप्प्याकडे वाटचाल करीत आहेत.

**'एचएएलई' ड्रोन :** 'एचएएलई' श्रेणीचे ड्रोन अधिक उंचीवरून अनेक दिवस अखंड उड्डाण करू शकतात. तसेच, संपूर्ण सीमाक्षेत्र किंवा सागरी क्षेत्रावर एकाच वेळी नजरही ठेवू शकतात. भारताकडे स्वदेशी 'एचएएलई' श्रेणीचे ड्रोन नाहीत. सध्या अमेरिकेकडून भाडेतत्त्वावर घेतलेले एमक्यू-९ बी सी गार्डियन ड्रोन ही पोकळी भरत आहेत. हे ड्रोन हिंदी महासागर क्षेत्रावर ५० हजार फुटांहून अधिक उंचीवरून सतत गस्त घालू शकतात.

ड्रोनना रोखण्याची क्षमताही महत्त्वाची

शत्रूच्या ड्रोनना रोखण्यासाठी भारतीय सैन्याने 'आकाशतीर' या स्वयंचलित हवाई संरक्षण प्रणालीचा विकास केला. ही प्रणाली रडार, तोफा आणि क्षेपणास्त्र बॅटऱ्यांना एकाच प्रणालीत आणते. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान तिने पाकिस्तानी ड्रोन व रॉकेट रोखण्याच्या प्रभावी कामगिरीचे दर्शन जगाला घडवले. नुकतीच मंजुरी मिळालेली 'आकाश तरंग' प्रणाली आणि सुधारित 'एल-७०' तोफा या संरक्षण कवचाला आणखी बळकटी देतील. ही संपूर्ण व्यवस्थाच आता 'मिशन सुदर्शनचक्र'अंतर्गत विकसित होत आहे. २०३५ पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेने सक्षम असलेले बहुस्तरीय राष्ट्रीय हवाई संरक्षण जाळे उभारण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. यामुळे लष्करी तळांपासून ते शहरांपर्यंत संरक्षण शक्य होईल.

### इलेक्ट्रॉनिक प्रणालीही निर्णायक

ड्रोनना मार्गदर्शन करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक प्रणालीही निर्णायक आहेत. अलीकडील उपग्रह चित्रांनुसार, पाकिस्तान सीमेजवळ 'इलेक्ट्रॉनिक वॉरफेअ' क्षमता वाढवत आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील दाग्याल येथे यासाठीचे मदत केंद्र उभारले जात असल्याचा संशय आहे. सिंधमध्येही इलेक्ट्रॉनिक बुद्धिमत्ता केंद्रांचा विकास पाकिस्तान करत आहे.

या प्रणाली भारतीय सैन्याच्या हालचाली, हवाई दलाच्या कारवाया आणि संपूर्ण संप्रेषण नेटवर्कवर लक्ष ठेवू शकतात. 'अश्नी ड्रोन', 'लॉईटरिंग म्युनिशन्स', 'आकाशतीर नेटवर्क' या सर्व प्रणाली 'जीपीएस' आणि रेडिओ संप्रेषणावरच अवलंबून असतात. एक शक्तिशाली इलेक्ट्रॉनिक युद्ध नेटवर्क त्यांना जॅम करू शकते, त्यांच्या माध्यमातून खोटे संकेत देऊ शकते किंवा त्यांचे संदेश अडवू शकते.

# सतत ढेकर येताहेत?

एका निरोगी व्यक्तीला दिवसभरात साधारणपणे ३० वेळा ढेकर येणे सामान्य समजले जाते. कार्बोनेटेड शीतपेये, मद्यपान, तसेच राजमा, बीन्स, कांदा, कोबी आणि ब्रोकोली यांसारख्या वायू निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या सेवनाने याचे प्रमाण वाढू शकते.



याव्यतिरिक्त मानसिक ताण, भीती किंवा अस्वस्थतेमुळेही ढेकरांचे प्रमाण वाढते. अशावेळी व्यक्ती नकळत जास्त हवा गिळते. काही प्रकरणांमध्ये ही हवा जठरात पोहोचण्यापूर्वीच घशातून परत बाहेर ढकलली जाते, ज्याला वैद्यकीय परिभाषेत 'सुप्रागॅस्ट्रिक बेल्चिंग' म्हटले जाते. तर काही व्यक्तींमध्ये नकळत वारंवार हवा गिळण्याची सवय असते, ज्यामुळे पोट फुगणे, पोटात ताण निर्माण होणे आणि गॅस बाहेर पडणे अशा तक्रारी सुरू होतात.

मात्र, ढेकरांचे प्रमाण वाढण्यासोबतच शरीरात इतरही काही त्रास जाणवत असतील, तर ते साधे अपचन नसून तातडीने वैद्यकीय तपासणीची गरज दर्शवणारे धोक्याचे संकेत असतात.

पहिले महत्त्वाचे लक्षण म्हणजे पोटात किंवा छातीत जाणवणारे अनाकलनीय दुखणे.

वारंवार ढेकर येण्यासोबत जर छातीत अस्वस्थता, जडपणा किंवा पोटाच्या वरच्या भागात सातत्याने दाब व वेदना जाणवत असतील, तर तो पचनसंस्थेच्या गंभीर विकाराचा संकेत असू शकतो.

दुसरे गंभीर लक्षण म्हणजे अन्न गिळताना होणारा त्रास. जेवताना घास घशाखाली उतरवताना वेदना होणे, छातीत अन्न अडकल्यासारखे वाटणे किंवा जेवणानंतर वारंवार उलट्या होणे हे पचनमार्गातील अडथळ्याचे लक्षण असू शकते.

सर्वांत चिंताजनक लक्षण म्हणजे पचनसंस्थेतून होणारा अंतर्गत रक्तस्राव.

जर शौचाचा रंग गडद काळा झाला असेल किंवा उलट्यांमधून रक्त पडत असल्याचे दिसून आले, तर हा तातडीने उपचार घेण्याचा धोक्याचा इशारा ठरतो. याकडे एका क्षणाचाही विलंब न करता डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते.

याशिवाय, कोणतेही स्पष्ट कारण नसताना अचानक वजन वेगाने घटणे, सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवणे, हलका ताप राहणे आणि भूक अचानक मंदावणे ही लक्षणेही ढेकरांच्या समस्येमागे जठर किंवा अन्न नलिकेचा गंभीर आजार असण्याची शक्यता वर्तवतात. यावर घरगुती उपाय करून वेळ काढण्यापेक्षा वेळीच तज्ज्ञ डॉक्टरांकडून पोटाची तपासणी करून घेणे हितावह ठरते.

# दिवाळीत चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो...हवा?

दिवाळीच्या सणात चेहरा तजेलदार आणि चमकदार दिसावा, यासाठी अनेक जण महागड्या फेशियलचा पर्याय निवडतात. मात्र, त्वचेची काळजी घेण्यासाठी नेहमीच पार्लरमध्ये जाण्याची गरज नसते. घरात सहज उपलब्ध असलेल्या काही पदार्थांचा वापर करूनही त्वचेची निगा राखता येते. बेसन, दही, हळद आणि टोमॅटोचा गर यांपासून तयार केलेला फेसपॅक हा त्यापैकीच एक पर्याय आहे.



सणासुदीच्या काळात घराची साफसफाई, सजावट, खरेदी आणि इतर कामांमुळे त्वचेच्या काळजीकडे दुर्लक्ष होते. धूळ, प्रदूषण आणि थकव्यामुळे चेहरा निस्तेज दिसू शकतो. अशावेळी त्वचा स्वच्छ ठेवण्यासोबतच तिला योग्य मॉइश्चरायझिंग देणेही महत्त्वाचे आहे.

**फेसपॅक तयार करण्यासाठी लागणारे साहित्य-** दीड चमचा बेसन चिमूटभर हळद थोडासा टोमॅटोचा गर एक चमचा दही असा तयार करा घरगुती फेसपॅक सर्वप्रथम एका स्वच्छ वाटीत दीड चमचा बेसन घ्या. त्यात चिमूटभर हळद, थोडासा टोमॅटोचा गर आणि एक चमचा दही घाला. सर्व पदार्थ व्यवस्थित मिसळून त्याची एकसारखी पेस्ट तयार करा.

फेसपॅक लावण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुऊन घ्या. त्यानंतर तयार केलेली पेस्ट चेहऱ्यावर पातळ थरात लावा. साधारण १० मिनिटांनंतर चेहरा साध्या पाण्याने स्वच्छ धुवा. चेहरा धुतल्यानंतर त्वचेला अनुकूल मॉइश्चरायझर लावा.

**फेसपॅक वापरताना कोणती काळजी घ्यावी?**

प्रत्येकाच्या त्वचेचा प्रकार वेगळा असल्याने एकच फेसपॅक सर्वांना सारखाच परिणाम देईल असे नाही. टोमॅटोमधील आम्लीय घटकांमुळे काही व्यक्तींना जळजळ होऊ शकते. त्यामुळे संवेदनशील त्वचा असल्यास टोमॅटोचा गर टाळावा. कोणताही नवीन पदार्थ चेहऱ्यावर लावण्यापूर्वी त्वचेच्या छोट्या भागावर पॅच टेस्ट करावी.

फेसपॅक लावल्यानंतर खाज, लालसरपणा किंवा जळजळ जाणवल्यास तो त्वरित धुऊन काढावा. चेहऱ्यावर जोरात घासणेही टाळावे. दिवाळीपूर्वी त्वचा तजेलदार दिसण्यासाठी पुरेशी झोप, संतुलित आहार, पाणी पिणे आणि नियमित त्वचा स्वच्छ ठेवणे या सवयीही महत्त्वाच्या आहेत.

# नसांच्या वेदना आणि त्याचे निवारण

काही आजारांमुळे मज्जासंस्थेच्या कार्यात बिघाड होतो व रुग्णाला असह्य वेदना होऊ लागतात. असे आजार मधुमेह, नागिणीनंतरच्या वेदना, किमोथेरपीमुळे होणाऱ्या वेदना, चेहऱ्याच्या नसेच्या वेदना ज्याला वैद्यकीय भाषेत ट्रायजेमिनल न्यूराल्जिया म्हणतात. मेंदूचे काही आजार जसे स्ट्रोक, प्रमाणाबाहेरचे मद्यपान व 'ब' जीवनसत्वाची कमतरता ऑपरेशननंतरच्या नसांच्या वेदना, मनगटातील नसेचे दुखणे (कार्पल टनेल सिंड्रोम), कुष्ठरोग, सी आर पी एस, शरीराचा एखादा अवयव काढून टाकल्यानंतर होणाऱ्या वेदना या आहेत. या आजारांचे वार्षिक १००० नवीन रुग्णांमध्ये हे प्रमाण ८.२ असे आहे. सर्वसाधारणपणे या आजाराचा प्रभाव ७-१० टक्के आहे.



स्त्रियांमध्ये पुरुषांपेक्षा या आजाराचे प्रमाण जास्त आहे. असे रुग्ण सुई टोचल्यासारखे, पिन टोचल्यासारखे, जळजळ, दाह, निर्माण करणाऱ्या वेदना, बधिरपणा किंवा तो भाग थंडगार पडणे अशा स्वरूपाच्या तक्रारी घेऊन ओपीडीला येत असतात. आजाराचे निदान व तपासण्या करताना प्रथम रुग्णाची सर्व माहिती घेतली जाते. नेहमीच्या तपासण्यांबरोबरच नसांची संवेदना वाहून नेण्याची क्षमता, तीव्रता व स्नायूंची कार्यक्षमता या तपासण्या केल्या जातात.

भारतामध्ये डायबेटीसचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. मधुमेहामुळे होणाऱ्या नसांची वेदना चार प्रकारची असते.

**१. परिधीय मज्जातंतू कमजोरी (पेरिफेरल न्यूरोपॅथी)** – हा कॉमन प्रकार आहे. सुरुवात पायांपासून होते व नंतर हातापर्यंत पसरते (स्टॉकींग – ग्लोव्ह पॅटर्न) यामध्ये स्नायूंमध्ये अशक्तपणा हातापायाला मुंग्या, जळजळ, झिणझिण्या येतात.

**२. स्वायत्त मज्जासंस्था कमजोरी (ऑटोनॉमिक न्यूरोपॅथी)** - यामध्ये शरीरांतर्गत अवयवांवर ण्दहूदत् ठेवणाऱ्या नसांना इजा पोहोचते. त्यामुळे हृदयाचे ठोके, रक्तदाब, पचनक्रिया, लघवीवर नियंत्रण यावर परिणाम होतो.

**३. प्रॉक्सिमल न्यूरोपॅथी** - हा तसा दुर्मीळ प्रकार आहे. यात कटिप्रदेशातील नसांना इजा होते.

**४. फोकल मोनोन्यूरोपॅथी** - एखाद्या विशिष्ट नसेला अचानक इजा होते. उदा. मनगटाची नस.

साखरेचे प्रमाण सतत जास्त असणे हेच यामागचे मुख्य कारण असते.

तिसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे ट्रायजेमिनल न्यूराल्जिया - चेहऱ्याच्या नसेच्या वेदना या प्रकारात रुग्णाला त्याच्या चेहऱ्याला अचानक तीव्र स्वरूपाच्या इलेक्ट्रिक शॉक बसल्यासारख्या वेदना होतात. थंड पदार्थ खाल्ले, ब्रश करताना, दाढी करताना, चावताना, गार वाऱ्याची झुळूक आली की प्रामुख्याने कळ येते. कळ काही सेकंद ते काही मिनिट राहते. रुग्ण वेदनेने हैराण होतो. खाताना खूप त्रास होतो, त्यामुळे अन्न नको वाटते. वजन कमी होऊ लागते. विशेष म्हणजे दाढेचे दुखणे समजून दाढ ही काढली जाते व परिणाम शून्य. अचूक निदानासाठी मेंदूचा MRI केला जातो. हे झाले कॉमन न्यूरोपॅथिक पेनचे प्रकार साधारण सर्वच प्रकारांमध्ये रुग्णाला झिणझिण्या येणे, मुंग्या येणे, इलेक्ट्रिक शॉक इ. प्रकारच्या वेदना होतात.

दीर्घकालीन वेदना निवारण (क्रॉनिक पेन मॅनेजमेंट) ही भूलशास्त्राची विस्तारलेली शाखा आहे. भूलतज्ज्ञ ऑपरेशन दरम्यान होणाऱ्या वेदना तर दूर करतातच, पण त्याचबरोबर दीर्घकालीन वेदना निवारण या विषयाचे ज्यांनी विशेष प्रशिक्षण घेतलेले असते, असे डॉक्टर नक्कीच मदत करू शकतात. सुरुवातीला वेदना कमी करण्यासाठी काही गोळ्या, मलम, तेल इ. दिले जाते, जे नेहमी वापरल्या जाणाऱ्या पेन किलर गोळ्यांपेक्षा वेगळे असते. कधीकधी औषधी पॅचही दिले जाते. औषधाबरोबरच नर्व्ह ब्लॉक, गॅलिऑन ब्लॉकचे इंजेक्शन दिले जाते. भूलतज्ज्ञ डॉक्टर यामध्ये निष्णात असतात. हे इंजेक्शन ऑपरेशन थिएटरमध्ये सी आर्म नावाचे मशिन किंवा सोनोग्राफीचे मशिन वापरून दिले जाते. या इंजेक्शनमुळे नसांची मेंदूकडे वेदना वाहून न्यायची क्षमता कमी होते. याबरोबरच रुग्णाला सलाईनमधूनही काही औषधे दिली जातात.

# घरचेच जेवण खाताय, तरीही लिव्हरला धोका?

घरचे जेवण आरोग्यासाठी चांगले मानले जाते. मात्र, रोजच्या आहारात तेल, तूप, साखर आणि कॅलरीयुक्त पदार्थांचे प्रमाण जास्त असेल, तर लिव्हरमध्ये चरबी जमा होण्याचा धोका वाढू शकतो. घरचे जेवण खात असूनही फॅटी लिव्हरची समस्या का उद्भवू शकते? जाणून घ्या, स्वयंपाक करताना आणि जेवताना कोणत्या चुका टाळायला हव्यात. घरचे ताजे आणि पौष्टिक जेवण खाण्याचा सल्ला नेहमी दिला जातो. मात्र, जेवण घरी बनवलेले आहे म्हणून ते प्रत्येक वेळी आरोग्यासाठी फायदेशीर असेलच, असे नाही. पदार्थांमध्ये वापरले जाणारे तेल, तूप, साखर, जेवणाचे प्रमाण आणि दिवसभरातील शारीरिक हालचाली यांचाही आरोग्यावर परिणाम होतो. आहारातून शरीराला गरजेपेक्षा जास्त कॅलरी मिळत असतील आणि वजन वाढत असेल, तर लिव्हरमध्ये अतिरिक्त चरबी जमा होण्याचा धोका वाढतो. या स्थितीला फॅटी लिव्हर असे म्हणतात. त्यामुळे घरचे जेवण खाताना केवळ पदार्थांच्या चवीकडेच नव्हे, तर त्यांच्या पौष्टिक मूल्यांकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.



**१. जास्त तेल-तुपात बनवलेले पदार्थ खाण्याची सवय ठरू शकते घातक**

गरमागरम पराठे, पुरी, भजी आणि तळलेले पदार्थ अनेकांच्या आवडीचे असतात. मात्र, हे पदार्थ वारंवार आणि मोठ्या प्रमाणात खाल्ल्यास शरीराला गरजेपेक्षा जास्त कॅलरी मिळू शकतात. जेवणात तेल, तूप आणि लोणी यांचा अतिवापर केल्यामुळे वजन वाढण्याची शक्यता असते. वजन वाढणे आणि शरीरातील चयापचयाशी संबंधित समस्या यांचा फॅटी लिव्हरच्या वाढत्या धोक्याशी संबंध आहे. याचा अर्थ कधीतरी पराठा किंवा पुरी खाल्ल्याने लिव्हर खराब होते, असा नाही. मात्र, रोजच्या आहारात तेलकट पदार्थांचे प्रमाण जास्त असेल आणि व्यायामाचा अभाव असेल, तर धोका वाढू शकतो. स्वयंपाकात तेल आणि तुपाचा मर्यादित वापर करा. आहारात डाळी, पालेभाज्या, इतर भाज्या आणि प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करा.

**२. घरच्या मिठाईमुळेही वाढू शकते फॅटी लिव्हरची रिस्क**

घरात बनवलेला शिरा, हलवा, खीर आणि इतर गोड पदार्थ चवीला उत्तम असतात. चहामध्ये जास्त साखर घालण्याची सवयही अनेकांना असते. मात्र, साखरेचे सेवन वारंवार आणि गरजेपेक्षा जास्त होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. साखरयुक्त पेये आणि अतिरिक्त साखरेचे सेवन यांचा वजन वाढण्याशी आणि लिव्हरमध्ये चरबी जमा होण्याच्या धोक्याशी संबंध आहे. त्याचप्रमाणे मैद्यापासून बनवलेले पदार्थ आणि प्रक्रिया केलेले, रिफाइंड कार्बोहायड्रेट्स असलेले पदार्थ वारंवार खाणे टाळावे. याचा अर्थ रोटी, भात किंवा पराठा पूर्णपणे बंद करावा, असा नाही. पदार्थांची निवड, खाण्याचे प्रमाण आणि संपूर्ण आहाराचा समतोल महत्त्वाचा असतो. साखरेचे प्रमाण कमी ठेवा. आहारात फळे, भाज्या, डाळी आणि शक्य तिथे संपूर्ण धान्यांचा समावेश करा.

**३. भूक नसतानाही खात राहण्याची सवय पडू शकते महागात**

दिवसभर वारंवार काहीतरी खाणे, मोठ्या प्रमाणात जेवणे किंवा पोट भरल्यानंतरही खाणे सुरू ठेवणे यामुळे शरीराला आवश्यकतेपेक्षा जास्त कॅलरी मिळू शकतात. अशा सवयी दीर्घकाळ कायम राहिल्या आणि वजन वाढले, तर फॅटी लिव्हरचा धोका वाढू शकतो. विशेषतः बैठी जीवनशैली, कमी शारीरिक हालचाल आणि असंतुलित आहार यांचा एकत्रित परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. जेवणाचे प्रमाण नियंत्रित ठेवा. हळूहळू खा आणि पोट भरल्याची जाणीव झाल्यावर खाणे थांबवा. भूक लागल्यास फळे किंवा पौष्टिक पर्याय निवडा.

**४. जास्त मीठ खाल्ल्याने थेट लिव्हरमध्ये चरबी जमा होते का?** मीठाचे अतिसेवन आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. मात्र, जास्त मीठ खाल्ल्याने थेट लिव्हरमध्ये चरबी जमा होते, असे सरसकट म्हणणे योग्य नाही. मीठाचे अतिसेवन उच्च रक्तदाबाचा धोका वाढवू शकते. तसेच, लिव्हरचा गंभीर आजार असलेल्या आणि शरीरात पाणी साचण्याची समस्या असलेल्या काही रुग्णांना डॉक्टर मीठाचे सेवन कमी करण्याचा सल्ला देतात.

# 'स्मार्टफोन ब्रेन' म्हणजे काय?

स्मार्टफोनचा वापर आपण काम, अभ्यास, संवाद, खरेदी आणि मनोरंजनासाठी करतो. जेव्हा फोन तपासणे ही एक स्वयंचलित सवय बनते, तेव्हा या सततच्या उत्तेजनाचा मेंदूवर काय परिणाम होतो, असा प्रश्न निर्माण होतो. अनेक रुग्ण एकाग्रतेचा अभाव, अपुरी झोप आणि वारंवार होणाऱ्या डोकेदुखीची तक्रार करतात. या सर्वांचा थेट संबंध दैनंदिन स्मार्टफोनच्या वापराशी असल्याचे दिसून येते. या समस्येत केवळ स्क्रीनवर घालवलेला एकूण वेळच नव्हे, तर फोनमुळे वारंवार विचलित होणारे लक्ष आणि त्याचा सतत होणारा वापर अधिक महत्त्वाचा ठरतो.



# केसांचा रंग दीर्घकाळ टिकवण्यासाठी 'हे' करून पहा



केसांची चमक कायम ठेवण्यासाठी सल्फेटमुक्त शॅम्पू वापरा. रंगवलेल्या केसांसाठी खास बनवलेले आणि Sulfate-free शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. सल्फेटमुळे रंगाचा थर लवकर निघून जातो.

कोमट किंवा थंड पाण्याने केस धुवा. गरम पाण्यामुळे केसांची क्युटिकल्स उघडतात, ज्यामुळे रंग लवकर फिका पडतो. त्यामुळे नेहमी कोमट किंवा थंड पाण्याचा वापर करा. रोज केस धुण्याऐवजी आठवड्यातून फक्त दोन ते तीन वेळाच केस धुवा. जास्त वेळा केस धुण्याने रंग लवकर निघून जातो.

# गर्भवती महिलांनी हळदीचे दूध प्यावे का?

भारतीय घरांमध्ये हळदीच्या दुधाचा वापर अनेकदा घरगुती उपाय म्हणून केला जातो. सर्दी-खोकल्यापासून ते शरीरातील सूज कमी करण्यापर्यंत हळदीच्या विविध फायद्यांविषयी बोलले जाते. मात्र, गर्भावस्थेत हळदीचे दूध पिणे सुरक्षित आहे का, याबाबत अनेक महिलांच्या मनात प्रश्न असतात. गर्भधारणेदरम्यान आहाराची काळजी घेणे आवश्यक असल्यामुळे हळदीचे दूध पिताना त्याचे प्रमाण आणि वैद्यकीय स्थिती लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**गर्भावस्थेत हळदीचे दूध पिता येते का?**

मर्यादित प्रमाणात हळदीचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. मात्र, गर्भावस्थेत हळदीचे दूध नियमितपणे पिण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

सामान्यतः जेवणात मसाला म्हणून वापरली जाणारी हळद मर्यादित प्रमाणात घेणे सुरक्षित मानले जाते. त्यामुळे गर्भवती महिलांनी रोजच्या जेवणातील हळद पूर्णपणे टाळण्याची आवश्यकता नसते. मात्र, दुधात वेगळी हळद मोठ्या प्रमाणात घालून रोज पिणे किंवा हळद आणि करक्यूमिनची पूरक औषधे घेणे याबाबत अधिक काळजी घ्यावी.

हळदीमध्ये करक्यूमिन नावाचे संयुग असते. त्यामध्ये सूज कमी करणारे आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळतात. मात्र, गर्भावस्थेत हळदीचे दूध प्यायल्याने नेमके कोणते आरोग्यविषयक फायदे होतात आणि अधिक प्रमाणात त्याचे सेवन कितपत सुरक्षित आहे, याबाबत पुरेसे वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे हळदीच्या दुधाला कोणत्याही आजारावरील उपचार समजू नये.

**गर्भावस्थेच्या तीनही तिमाहींमध्ये काय काळजी घ्यावी?**

पहिली तिमाही : पहिल्या ते तिसऱ्या महिन्यापर्यंत

गर्भधारणेच्या सुरुवातीच्या काळात बाळाच्या अवयवांची निर्मिती होत असते. त्यामुळे या काळात संतुलित आहार घेणे महत्त्वाचे आहे. जेवणात सामान्य प्रमाणात हळद वापरता येऊ शकते. मात्र, नियमितपणे दुधात अतिरिक्त हळद घालून पिण्याची सवय सुरू करण्यापूर्वी स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**दुसरी तिमाही :** चौथ्या ते सहाव्या महिन्यापर्यंत

या काळातही पौष्टिक आणि संतुलित आहाराला प्राधान्य द्यावे.



जेवणात वापरली जाणारी हळद आणि औषधी स्वरूपात जास्त प्रमाणात घेतली जाणारी हळद यांमध्ये फरक आहे. एका ग्लास दुधात अर्धा चमचा हळद घालून पिणे प्रत्येक गर्भवती महिलेसाठी सुरक्षित आहे, असे सांगण्यासाठी पुरेसे वैज्ञानिक पुरावे नाहीत. त्यामुळे हळदीच्या दुधाचे प्रमाण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ठरवावे.

**तिसरी तिमाही :** सातव्या ते नवव्या महिन्यापर्यंत

गर्भावस्थेच्या शेवटच्या महिन्यांतही आहाराविषयी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हळद किंवा करक्यूमिनचे जास्त प्रमाण आणि रक्तस्राव याबाबत काही चिंता व्यक्त केली जाते; मात्र, नेहमीच्या आहारातील हळदीमुळे प्रसूतीदरम्यान रक्तस्राव वाढतो, असे सिद्ध करणारे पुरेसे पुरावे नाहीत. तरीही प्रसूतीची तारीख जवळ आली असताना हळदीचे पूरक पदार्थ किंवा औषधी स्वरूपातील अधिक मात्रा घेणे टाळावे आणि डॉक्टरांच्या सूचना पाळाव्यात.

**हळदीच्या दुधाचे कोणते फायदे होऊ शकतात?**

हळदीतील करक्यूमिनमध्ये सूज कमी करणारे आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म आहेत. मात्र, गर्भावस्थेत हळदीचे दूध प्यायल्याने हे फायदे प्रत्यक्ष मिळतात, हे पुरेशा वैज्ञानिक संशोधनातून सिद्ध झालेले नाही.

दुधातून कॅल्शियम आणि प्रथिने मिळतात.

गर्भवती महिला दूध सहन करू शकत असल्यास ते संतुलित आहाराचा भाग ठरू शकते. कोमट दूध प्यायल्याने काही महिलांना आरामदायी वाटू शकते. मात्र, हळदीचे दूध प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती निश्चितपणे वाढते, बद्धकोष्ठता दूर होते, वजन नियंत्रित राहते किंवा शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात, या दाव्यांना पुरेसा वैज्ञानिक आधार नाही.

**हळदीचे दूध पिताना या गोष्टी लक्षात ठेवा**

प्रमाण मर्यादित ठेवा: जेवणातील सामान्य प्रमाणापेक्षा अधिक हळद घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

औषधे घेत असल्यास सावध राहा: रक्त पातळ करणारी औषधे घेत असल्यास किंवा पित्ताशयातील खड्यांचा त्रास असल्यास हळदीचे अधिक प्रमाण घेण्यापूर्वी डॉक्टरांना विचारा.

पूरक औषधे स्वतःहून घेऊ नका: हळद किंवा करक्यूमिनच्या कॅप्सूलचा वापर गर्भावस्थेत डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय करू नये.

गर्भावस्थेत आई आणि बाळाच्या आरोग्यासाठी संतुलित आहार, नियमित तपासण्या आणि डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. हळदीचे दूध पिणे आवश्यक नाही; ते घ्यायचे असल्यास वैयक्तिक आरोग्यस्थितीनुसार डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य ठरेल.

# वाढत्या उत्पादन खर्चाचा कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम

हिंदुस्थानातील वाढत्या उत्पादन खर्चामुळे कंपन्यांच्या नफ्याच्या मार्जिनवर दबाव येण्याची शक्यता असून, त्याचे प्रतिबिंब सप्टेंबर तिमाहीच्या आर्थिक निकालांमध्ये उमटू शकते, असा अंदाज फ्रँकलिन टेम्पलटन इंडिया म्युचुअल फंडाने व्यक्त केला आहे. कंपनीने हिंदुस्थानी शेअर बाजार, म्युचुअल फंड आणि कर्जरोखे बाजारातील घडामोडींचा आढावा घेणारा 'इक्विटी मार्केट स्नॅपशॉट' अहवाल प्रसिद्ध केला आहे.

हिंदुस्थानी आणि अमेरिकेतील व्याजदरांमधील अंतर कमी झाल्यास परदेशी गुंतवणुकीच्या प्रवाहावर परिणाम होऊन रुपयावर दबाव येऊ शकतो, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. अलीकडील बाजारातील घसरणीमुळे शेअर बाजारातील मूल्यांकन अधिक वाजवी झाले आहे. दरम्यान, निश्चित उत्पन्नाच्या बाजारात कडक पतधोरणाची शक्यता गृहीत धरून व्यवहार होत आहेत. सध्याच्या अनिश्चित वातावरणात गुंतवणुकीतील शिस्त आणि विविधीकरणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**हिंदुस्थानी आणि अमेरिकी व्याजदरांतील अंतर कमी होण्याचे परिणाम**

महागाईचा दर सातत्याने उच्च पातळीवर राहिल्याने विविध देशांच्या मध्यवर्ती बँकांनी पुन्हा एकदा व्याजदरवाढीचा मार्ग स्वीकारला आहे. अमेरिकेची फेडरल रिझर्व्ह, युरोपियन सेंट्रल बँक आणि बँक ऑफ जपान यांनी प्रत्येकी २५ बेसिस पॉइंट्सने धोरणात्मक व्याजदर वाढवले. परिणामी, सरकारी रोख्यांवरील परतावा अनेक वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचला. महिनाअखेर अमेरिकेतील १० वर्षांच्या सरकारी रोख्यांवरील परतावा ५.३ टक्के, तर हिंदुस्थानातील परतावा ७.२ टक्के होता.

शेअर बाजाराच्या दृष्टीने याचा अर्थ भांडवलाचा खर्च वाढणे आणि गुंतवणुकीसाठी रोख्यांकडून मिळणाऱ्या परताव्याशी स्पर्धा निर्माण होणे, असा आहे. या दबावाचा परिणाम केवळ हिंदुस्थानी बाजारावर नव्हे, तर जागतिक बाजारांवरही जाणवत आहे.

हिंदुस्थानात किरकोळ महागाईचा दर सुमारे ४.५ टक्क्यांवरून ४.८ टक्क्यांपर्यंत वाढला. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींमुळे महागाईत सुमारे ३० बेसिस पॉइंट्सची भर पडली. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ऑक्टोबर २०२६ च्या सुरुवातीला झालेल्या बैठकीत रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची वाढ करून तो ५.५० टक्क्यांवर नेला. तसेच, भविष्यात टप्प्याटप्प्याने आणखी व्याजदरवाढ होण्याची शक्यता असल्याचे संकेत दिले.

व्याजदरात हळूहळू आणि मर्यादित वाढ झाल्यास मागणीवर फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही. मात्र, व्याजदरवाढीचा वेग अधिक राहिल्यास ती चिंतेची बाब ठरू शकते. याशिवाय, हिंदुस्थान आणि अमेरिकेतील व्याजदरांमधील अंतर कमी झाल्यास परदेशी गुंतवणुकीच्या प्रवाहावर परिणाम होऊन रुपयावर दबाव येऊ शकतो.

> **हिंदुस्थानातील वाढत्या उत्पादन खर्चामुळे कंपन्यांच्या नफ्याच्या मार्जिनवर दबाव येण्याची शक्यता असून, त्याचे प्रतिबिंब सप्टेंबर तिमाहीच्या आर्थिक निकालांमध्ये उमटू शकते, असा अंदाज फ्रँकलिन टेम्पलटन इंडिया म्युचुअल फंडाने व्यक्त केला आहे. कंपनीने हिंदुस्थानी शेअर बाजार, म्युचुअल फंड आणि कर्जरोखे बाजारातील घडामोडींचा आढावा घेणारा 'इक्विटी मार्केट स्नॅपशॉट' अहवाल प्रसिद्ध केला आहे.**



**वाढत्या उत्पादन खर्चामुळे कंपन्यांच्या नफ्याच्या मार्जिनवर दबाव**

उत्पादन खर्चात वाढ होत असतानाही आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत कंपन्यांच्या नफ्यातील वाढीचा कल समाधानकारक राहिला. यामागे कंपन्यांकडे उपलब्ध असलेला तुलनेने स्वस्त साठा आणि उत्पादनांच्या किमती वाढवण्याची क्षमता ही प्रमुख कारणे होती.

मात्र, आता वाढीव किमतीच्या कच्च्या मालाचा वापर उत्पादन प्रक्रियेत अधिक प्रमाणात होऊ लागल्याने कंपन्यांच्या नफ्याच्या मार्जिनवर दबाव येऊ शकतो. विशेषतः उत्पादनांच्या किमती वाढवण्याची मर्यादित क्षमता असलेल्या क्षेत्रांना याचा अधिक फटका बसण्याची शक्यता आहे.

वाढलेल्या खर्चाचा किती भाग कंपन्या ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकतात, याबाबत व्यवस्थापनाकडून दिल्या जाणाऱ्या स्पष्टीकरणाकडे बाजाराचे लक्ष असेल. त्यामुळे सप्टेंबर तिमाहीतील कंपन्यांचे आर्थिक निकाल महत्त्वाचे ठरणार आहेत.

अलीकडील बाजारातील घसरणीमुळे हिंदुस्थानच्या शेअर बाजारातील मूल्यांकन अधिक वाजवी पातळीवर आले आहे. गेल्या दोन वर्षांत हिंदुस्थानी शेअर बाजारातील परतावा एकूणच मर्यादित राहिला आहे. मात्र, कंपन्यांच्या नफ्यातील सुधारणा आणि त्यांच्या ताळेबंदातील स्थिरतेमुळे बाजारातील काही कंपन्यांचे मूल्यांकन गुणोत्तर कमी झाले आहे.

निवडक क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या संधी अधिक आकर्षक झाल्याने गुंतवणूकदारांना बाजारातील संधींचा विचार करता येऊ शकतो.

**अनिश्चिततेत गुंतवणुकीतील शिस्त आणि विविधीकरण महत्त्वाचे**

सध्याच्या अनिश्चित वातावरणात गुंतवणुकीत शिस्त राखणे आणि विविध मालमत्ता प्रकारांमध्ये गुंतवणुकीचे विभाजन करणे महत्त्वाचे ठरते. बाजारातील विविध कंपन्यांच्या आकारमानानुसार गुंतवणूक करणाऱ्या वैविध्यपूर्ण फंड श्रेणींमुळे एकाच विभागावर अवलंबून न राहता बाजारातील संधींचा लाभ घेता येऊ शकतो.

गुंतवणूकदारांनी आपली आर्थिक उद्दिष्टे, गुंतवणुकीचा कालावधी आणि जोखीम स्वीकारण्याची क्षमता लक्षात घेऊन गुंतवणुकीचा दृष्टिकोन निश्चित करावा. सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) आणि सिस्टिमॅटिक ट्रान्सफर प्लॅन (एसटीपी) यांसारख्या योजनांद्वारे टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करता येते. तथापि, अशा पर्यायांमुळे बाजारातील जोखीम पूर्णपणे नाहीशी होत नाही किंवा अधिक परताव्याची हमी मिळत नाही.

हायब्रिड फंडांच्या माध्यमातून त्यांच्या गुंतवणूक धोरणानुसार विविध मालमत्ता प्रकारांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी मिळू शकते. मात्र, प्रत्येक फंडाशी संबंधित जोखीम आणि गुंतवणुकीची उद्दिष्टे लक्षात घेणे आवश्यक आहे.

निश्चित उत्पन्नाच्या बाजारात कडक पतधोरणाची शक्यता गृहीत धरून व्यवहार होत आहेत. मनी मार्केटमधील व्याजदरांच्या वक्रातील वाढत्या चढउतारांतून हे स्पष्ट होते. अलीकडील ट्रेझरी बिल्स आणि सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट (सीडी) यांच्यावरील परताव्याचे संकेत पाहता, रिझर्व्ह बँक व्याजदरवाढ आणि तरलता कमी करण्याच्या उपाययोजनांद्वारे पतधोरण अधिक कडक करू शकते, अशी बाजाराची अपेक्षा आहे.

# ऊन 'पिणारी' फुले!

खूप वर्षांपूर्वी मुंबईबाहेरच्या जवळच्याच लोकल स्टेशनांवर मधोमध जतन केलेली मोठी झाडं किंवा काही फुलझाडंही दिसायची. त्यापैकी एका स्टेशनवरच चाफ्याचे झाड आठवतंय. मर्यादित पानं आणि टोकाला भरपूर फुलं असलेलं हे झाड भरउन्हातही टवटवीतपणे 'ऊन पीत' उभं असायचं आणि ऊन पिऊन सर्वत्र सुगंध पसरवायचे. चाफा किंवा वनस्पतीशास्त्रात 'मॅग्नोलिका चम्पका' म्हणून नोंदलं गेलेलं हे झाड मुळातच उष्ण कटिबंधातलं आणि ब्युनिद किंवा आर्द्र वातावरणात फुलणारं. भरपूर उष्णता सहन करून सुगंध देणारं, खरं तर ते उष्ण वातावरणातच अधिक बहरतं. अगदी ४० ते ४२ अंश सेल्सियस तापमानापर्यंत त्याला काही त्रास होत नाही. त्याहून जास्त उन्हाळा असेल आणि वेळेवर पाणी मिळालं नसेल तर कोणतंही झाड सुकणारच.



निसर्ग माहिती

परंतु कॅक्टस आणि सॅक्युलॅन्ट प्रजातीची बरीच झाडंझुडपं ऊन सोसून तग धरतात. आपल्याकडेही ऑक्टोबर हीटमध्ये किंवा मे महिन्याच्या उन्हाळ्यात शेताच्या बांधावरचे निवडुंग हिरवे असतात.

त्यांची उत्क्रांतीच तशी झालेली असते. पाणी मिळतं तेव्हा ते साठवण्याची नैसर्गिक यंत्रणा आणि सूर्यप्रकाश अधिकाधिक परावर्तित करून उष्णतेपासून बचाव करण्याची क्षमता त्याना निसर्गाने बहाल केलेली असते. त्यामुळे दुष्काळात इतर झाडं बेहाल होतात तेव्हा या प्रजातींच्या झाडाझुडुपांना कमीत कमी त्रास होतो.

**कॅलेंडर पहा**

याशिवाय आपल्या माहितीतली आणि औषधी उपयुक्तता असलेलीही अनेक झाडं किंवा पिंपळ, वड, कडुलिंब यासारखे वृक्ष उन्हाळा सहन करू शकतात. चिंचेचे झाड किंवा बाभूळचं झाड अथवा अर्जुनवृक्ष जर न्याहाळला असेल तर त्यांच्या खोडांचा घेर मोठा असलेला दिसेल. भरगच्च पर्णसंभार त्यांच्या मुळातली जमीन, सावलीमुळे थंड ठेवतोच, पण खोलवर गेलेली मुळंसुद्धा भूमिमध्ये दडलेला ओलावा खेचून वर झाडाच्या संवर्धनाकडे पाठवतात.

त्यामुळे उन्हाळय़ाच्या काळातही अशी झाडं शीतलता देतात.

आता चाफ्याप्रमाणे उष्णता सहन करून फुलणा-या काही जागतिक फुलांमध्ये झिनिॲस, मॉस, रॉझ, निन्का, मेरीगोल्ड, सेलोसिआ ब्लॅन्केट फ्लॉवर आणि आपल्या नेहमीच्या परिचयातली जास्वंदीची फुलं अशी कितीतरी आहेत.

त्यातलं चाफा आणि जास्वंदीची फुलं थोडा शोध घेतला तर सध्या उन्हातही कुठेतरी दिसतील. तापत्रयामध्ये मनाला थंडावा देतील.

# युरोपात तरुण आणि ज्येष्ठांमध्येच जुंपलीय!

गेल्या काही वर्षांत जनरेशन झेड म्हणजेच तरुण पिढी एक मोठी राजकीय ताकद म्हणून उदयास आली आहे. बांगलादेश, नेपाळ, पेरू आणि मादागास्करमध्ये तरुणांच्या आंदोलनांमुळे सरकारं कोसळली. भारतातही अनेक आंदोलनांमध्ये तरुणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

आता युरोपमध्येही तरुण आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरू लागले आहेत. फ्रान्समध्ये शाळांची दुरवस्था, स्पेनमध्ये बेरोजगारी आणि ब्रिटनमध्ये पेन्शन धोरणांवरून नाराजी वाढत आहे. तरुणांसाठी नोकरी मिळवणं, चांगलं शिक्षण घेणं आणि परवडणाऱ्या किमतीत घर खरेदी करणं दिवसेंदिवस कठीण होत आहे.

जगभरात तरुणांचा आवाज बुलंद होताना दिसत असला तरी युरोपात मात्र तरुण आणि ज्येष्ठांमध्ये एक वेगळाच संघर्ष सुरू झाला आहे. तरुणांच्या मागण्या वेगळ्या आहेत आणि ज्येष्ठांच्या मागण्या वेगळ्या आहेत. यामुळे युरोपात तरुण आणि ज्येष्ठ यांच्यातच संघर्ष सुरू झाला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या संघर्षात तरुणांवर ज्येष्ठ मंडळी भारी पडताना दिसत आहेत.

अर्थात त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे ज्येष्ठांची संख्या आणि त्यांचा दबावगट. युरोपात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत असताना राजकारणातील त्यांचा प्रभावही मजबूत झाला आहे. दुसरीकडे, तरुणांची संख्या दिवसेंदिवस घटत असल्यानं आपल्या मागण्यांसाठी सरकारवर दबाव आणणं तरुणांसाठी अधिक कठीण बनत आहे.

फ्रान्समध्ये तरुणांसमोर रोजगाराचा मोठा प्रश्न आहे. बेरोजगारीचा दर २० टक्क्यांवर पोहोचला आहे. दुसरीकडे, सरकारच्या एकूण खर्चापैकी जवळपास २५ टक्के रक्कम पेन्शनवर खर्च होते. म्हणजेच सरकारी अर्थसंकल्पाचा मोठा हिस्सा ज्येष्ठ नागरिकांच्या पेन्शनसाठी वापरला जातो.

काही वर्षांपूर्वी राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी निवृत्तीचं वय ६२ वरून ६४ वर्षे करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविरोधात देशभर आंदोलनं झाली आणि सरकारला तो निर्णय स्थगित करावा लागला. आता सत्ताधारी किंवा विरोधक, पेन्शनमध्ये कपात करण्याबाबत उघडपणे कोणीच बोलत नाही.

तरुणांची मागणी आहे की शाळांची स्थिती सुधारावी आणि शिक्षणावर अधिक पैसा खर्च करावा. मात्र, यासाठी पैसा आणायचा कुठून, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे दोन्ही पिढ्यांच्या मागण्या पूर्ण करणं सरकारसमोर मोठं आव्हान बनलं आहे.

स्पेनमध्येही घरांची कमतरता आणि वाढतं भाडं यांविरोधात अलीकडे आंदोलनं झाली. देशात बेरोजगारीचा दर २२ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. घरांच्या किमती वेतनाच्या तुलनेत वेगानं वाढत आहेत. त्यामुळे अनेक तरुणांना वयाची तिशी ओलांडल्यानंतरही आई-वडिलांसोबत राहावं लागत आहे.

दुसरीकडे, आधीपासून घर असलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या मालमत्तेचं मूल्य वाढत आहे. या आर्थिक दरीमुळे दोन्ही पिढ्यांमधील तणाव वाढत आहे.

ब्रिटनमध्येही बेरोजगारी आणि महागड्या घरांमुळे तरुण त्रस्त आहेत, तर ज्येष्ठ नागरिकांची पेन्शन सातत्यानं वाढते आहे. यामुळे दोन्ही पिढ्यांत संघर्ष सुरू आहे. मात्र ज्येष्ठांचं समाजातील मजबूत संख्याबळ आणि राजकारणावरील त्यांची मजबूत पकड, यामुळे त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणं सरकार, नेत्यांना कठीण जातं आहे, तर तरुणांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे.

# रानफुलांचा फिका रंगोत्सव

पावसाळा ओसरू लागला की, कोकणातील अनेक पठारे जणू निसर्गाच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रासारखी दिसू लागतात. मात्र यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने या निसर्गचित्रातील रंगच फिके पडले आहेत. अनेक माळरानांवर फुलणाऱ्या रानफुलांची संख्या मोठय़ा प्रमाणात घटली असून काही ठिकाणी तर नेहमी दिसणारी फुले यंदा गायब झाली.

निसर्गदेवतेने दोन्ही हाताने भरून दिलेले सृष्टीसौंदर्य म्हणजे कोकण. मात्र पावसाळय़ानंतर पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असलेला रानफुलांचा रंगोत्सव यंदा फिका पडला आहे. वेंगुर्ले तालुक्यातील खवणे, म्हापण, कणकवली तालुक्यातील तरंदळे, भरणी, मिनी कास पठार म्हणून ओळख असलेल्या कोल्हापूर-सिंधुदुर्गच्या सीमेवरील विस्तीर्ण रांगणागडाच्या परिसरात पाहावयास मिळणारी रंगीबेरंगी फुलांची झलक यंदा लवकरच कोमेजून गेली.

कोकण म्हटले की, डोळय़ांसमोर उभे राहतात ते हिरवेगार डोंगर, खळाळणारे ओहोळ, धुक्याची चादर आणि पावसाळय़ानंतर माळरानांवर उमलणारी असंख्य रंगीबेरंगी रानफुले. पावसाळा ओसरू लागला की, कोकणातील अनेक पठारे जणू निसर्गाच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रासारखी दिसू लागतात. मात्र यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने या निसर्गचित्रातील रंगच फिके पडले आहेत. अनेक माळरानांवर फुलणा ?या रानफुलांची संख्या मोठय़ा प्रमाणात घटली असून काही ठिकाणी तर नेहमी दिसणारी फुले यंदा गायब झाली.

दरवर्षी पावसाच्या सरींनी माती ओली झाली की, कोकणच्या माळरानांवर निसर्गाचा एक अनोखा उत्सव सुरू होतो. काही दिवसांसाठी का होईना, परंतु हिरव्या गवताच्या कुशीत असंख्य छोटय़ा-छोटय़ा फुलांचा बहर येतो. वेंगुर्ले तालुक्यातील म्हापण येथील पठार हे अशाच नैसर्गिक फुलोत्सवासाठी ओळखले जाते. मात्र यंदा परिस्थिती वेगळी आहे. कमी पावसामुळे जमिनीमध्ये आवश्यक ओलावा निर्माण झाला नसल्यामुळे रानफुलांच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार झाले नाही. पठारावर दरवर्षी दिसणारा फुलांचा सडा यंदा अत्यंत विरळ झाला आहे.

रानफुलांचे आयुष्य तसे अल्प असते. पावसाच्या काही सरी, जमिनीतील पुरेसा ओलावा आणि अनुकूल वातावरण मिळाले की ही फुले उमलतात आणि काही दिवसांतच पुन्हा निसर्गात विलीन होतात. त्यामुळे त्यांचा प्रत्येक बहर हा विशेष असतो. दरवर्षी या फुलांची छायाचित्रे टिपण्यासाठी, निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी आणि माळरानाचा हा रंगोत्सव पाहण्यासाठी निसर्गप्रेमी पठारांकडे धाव घेतात. यंदा मात्र त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले. ज्या माळरानावर दरवर्षी हजारो छोटय़ा फुलांचा नजराणा मानवी डोळय़ांना तृप्त करतो, तेच माळरान यंदा काहीसे उदास आणि ओसाड भासत आहे.

रानफुले केवळ सौंदर्य नव्हे, जैवविविधतेची ओळख. ती केवळ डोळय़ांना आनंद देणारी नाजूक फुले नाहीत. तर कोकणच्या समृद्ध जैवविविधतेचा महत्त्वाचा भाग आहेत. या फुलांवर अनेक प्रकारचे कीटक, फुलपाखरे आणि मधमाशा अवलंबून असतात. त्यामुळे रानफुलांची संख्या कमी होणे हा केवळ सौंदर्याचा विषय नसून स्थानिक परिसंस्थेतील बदलाचा संकेत आहे.

# 'एआय' एक व्यसन!

काही वर्षांपूर्वी एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पुस्तक उघडावे लागायचे किंवा इंटरनेटवर अनेक वेबसाइट तपासाव्या लागायच्या. आता मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय आपल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर काही क्षणांत देते. निबंध लिहिण्यापासून स्वयंपाकाच्या पाककृतींपर्यंत, प्रवासाचे नियोजन करण्यापासून वैयक्तिक समस्यांवर चर्चा करण्यापर्यंत अनेक कामांसाठी लोक एआय ची मदत घेत आहेत. विशेष म्हणजे आता एआय केवळ माहिती देणारे साधन राहिलेले नाही. ते माणसाशी संवाद साधते, त्याच्या प्रश्नांना उत्तरे देते, त्याच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करते आणि कधी कधी एखाद्या जवळच्या मित्राप्रमाणे गप्पाही मारते. त्यामुळे एक नवा प्रश्न निर्माण झाला आहे. माणूस एआय च्या आहारी जात आहे का?

माणसाला आपले बोलणे कोणीतरी शांतपणे ऐकावे, आपल्या विचारांना प्रतिसाद द्यावा आणि आपल्याशी मनमोकळा संवाद साधावा, असे नेहमी वाटते. मात्र प्रत्येक वेळी मित्र किंवा कुटुंबातील व्यक्ती उपलब्ध असेलच असे नाही. अशा वेळीं घ् सहज उपलब्ध असते. मध्यरात्री एखादी शंका आली, मनात एखादा विचार आला किंवा कुणाशी बोलावेसे वाटले तरी एआय सोबत संवाद सुरू करता येतो. ती कंटाळत नाही, रागावत नाही आणि बहुतेक वेळा आपल्याशी नम्रपणे बोलते. यामुळे काही लोकांना तिच्याशी बोलताना अधिक मोकळेपणा जाणवतो. विशेषत एकटेपणा अनुभवणा-या किंवा आपल्या भावना इतरांसमोर व्यक्त करण्यास संकोच वाटणा-या व्यक्तींना एआय चा आधार वाटू शकतो. मात्र याच सोयीमुळे माणूस प्रत्यक्ष मित्रांशी बोलण्याऐवजा एआय कडे अधिकाधिक वळू लागला, तर त्यातून भावनिक अवलंबित्व निर्माण होण्याची शक्यता असते.

मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर एखादी गोष्ट वारंवार करण्याची इच्छा होणे आणि तिचे व्यसन लागणे यात महत्त्वाचा फरक आहे.एआय् चा रोज वापर करणे म्हणजे व्यसन लागले, असे म्हणता येणार नाही. मात्र त्याच्याशी संवाद साधण्यात तासन्तास घालवणे, कामे बाजूला ठेवणे, झोपेची वेळ चुकवणे किंवा प्रत्यक्ष माणसांशी असलेला संपर्क कमी होणे, ही काही सावध करणारी लक्षणे ठरू शकतात.



एखाद्या व्यक्तीने एआय वापरणे कमी करण्याचा प्रयत्न केला तरी तिला ते जमत नसेल आणि त्यामुळे तिच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम होत असेल, तर ही बाब अधिक गांभीर्याने पाहावी लागते. एआय वरील अशा अवलंबित्वाचा अभ्यास अजून सुरू आहे. त्यामुळे त्याला स्वतंत्र मानसिक आजार किंवा सर्वमान्य व्यसन म्हणून घोषित करणे घाईचे ठरेल.

या तंत्रज्ञानाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे एआय माणसाच्या बोलण्याच्या पद्धतीनुसार आपली उत्तरे बदलू शकते. वापरकर्ता विनोदी भाषेत बोलत असेल तर ती विनोद करते, गंभीर विषयावर चर्चा करत असेल तर गंभीरपणे प्रतिसाद देते. त्यामुळे समोर कोणीतरी आपल्याला खरोखर ओळखते आणि समजून घेते, असा भास निर्माण होऊ शकतो. प्रत्यक्षात मात्र एआय ला माणसाप्रमाणे भावना किंवा वैयक्तिक अनुभव नसतात. ती शिकलेल्या माहितीच्या आणि भाषेतील नमुन्यांच्या आधारे उत्तरे तयार करते. तिचा प्रतिसाद समजूतदार वाटला, तरी तो एखाद्या जिवलग माणसाच्या सहवासाची पूर्ण जागा घेऊ शकत नाही. शिवाय एआय ने दिलेला प्रत्येक सल्ला अचूक असेलच असे नाही. विशेषत आरोग्य, मानसिक ताण, आर्थिक निर्णय किंवा नातेसंबंध यांसारख्या विषयांमध्ये तिच्या उत्तरांवर आंधळा विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते.

एआय मुळे शिक्षण, संशोधन, लेखन आणि दैनंदिन कामांमध्ये मोठी मदत होत आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानापासून दूर राहणे हा उपाय नाही. त्याऐवजी त्याचा वापर किती आणि कशासाठी करायचा, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. एआय सोबत गप्पा मारण्यात गैर काही नाही, पण त्या गप्पांमुळे मित्रांच्या भेटी टळत असतील, आवडीचे छंद मागे पडत असतील किंवा घरातील माणसांशी संवाद कमी होत असेल, तर आपल्या सवयी तपासण्याची वेळ आली आहे. तंत्रज्ञानाने माणसाचे आयुष्य अधिक समृद्ध करायला हवे, त्याला प्रत्यक्ष जगापासून दूर न्यायला नको. कारण एआय कितीही हुशार झाले तरी मित्राच्या खांद्यावरचा हात, कुटुंबातील आपुलकी आणि माणसांच्या सहवासातील आनंद यांची जागा कोणतेही यंत्र पूर्णपणे घेऊ शकणार नाही.

**प्रसाद ताम्हनकर**